

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

फेब्रुवारी २०११ । किंमत १५ रुपये







# रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वती, लोकमान्यनगर तर्फे
# दिवाळी अंक स्पर्धा २०१०




## ‘रोटरी लोकमान्य पुरस्कार’ प्राप्त
## मेहता मराठी ग्रंथजगत दीपावली २०१०



◆ फेब्रुवारी २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक दोन

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १४ |
| दखल | ६० |
| पुस्तक परिचय | |
| द स्टार प्रिन्सिपल : अनु.श्याम भुर्के | ६४ |
| सीविच : अनु : अशोक पाध्ये | ७२ |
| चला जाणून घेऊ या | |
| स्वयंप्रेरण : अनु. मीना टाकळकर | ७८ |
| आवा मारु : अनु. चारुलता पाटील | ८६ |
| पुरस्कार | ९१ |
| वाचकांचा प्रतिसाद | १०५ |
| श्रद्धांजली | १०६ |
| बालनगरी | ११० |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## ब्रँड नेम - लेखकाची नाममुद्रा महत्त्वाची की प्रकाशकाची?

आपण एखादे पुस्तक खरेदी करायला जातो तेव्हा काय म्हणतो?

''मला स्वामी हे पुस्तक हवेय. तुमच्याकडे आहे का?''

''मला विश्वास पाटील यांचे पानिपत हवे आहे.''

''नुकतीच प्रसिद्ध झालेली हिंदू कादंबरी तुमच्याकडे आहे का?''

''बालाजी तांबे यांचे गर्भसंस्कार मिळेल का?''

''नवीन कादंबऱ्या कुठल्या आल्या आहेत?''

''जीएंच्या कथासंग्रहांच्या नवीन आवृत्त्या आल्या आहेत का?''

''पाडगावकरांच्या छोरी या काव्यसंग्रहाची एक प्रत मिळेल का?''

ग्राहक म्हणून एखादे पुस्तक खरेदी करायला जाताना आपण विशिष्ट लेखक किंवा विशिष्ट पुस्तक यांचे नाव घेतो. लेखकाचे नाव किंवा पुस्तकाचे नाव घेतले की ग्रंथविक्रेता आपली मागणी पूर्ण करतो. त्याला तो लेखक किंवा पुस्तक यांचे नाव ठाऊक असते. कारण गाजलेला लेखक हा एक ब्रँड असतो. गाजलेल्या पुस्तकाचे नाव हा ब्रँड असतो. त्यामुळे तो ग्राहकाला तसेच विक्रेत्याला ठाऊक असतो. जाहिरातीमुळे, वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांमुळे, वादग्रत ठरल्यामुळे, पुरस्कार मिळाल्यामुळे वा अशाच काही कारणामुळे काही लेखक आणि काही पुस्तके 'ब्रँडनेम' बनतात. त्यांना चांगली मागणी येते. सर्वच लेखकांना किंवा पुस्तकांना ब्रँडनेमचे भाग्य लाभते असे नाही. हॅरी पॉटर हे ब्रँडनेम बनते तेव्हा जगभर त्याच्या लक्षावधी प्रती झपाट्याने विकल्या जातात. त्याची लेखिका जे. के. रोलिंग ही इंग्लंडच्या सम्राज्ञीपेक्षाही अधिक श्रीमंत होते. हॅरी पॉटरच्या प्रतिकृती वा प्रतिमा असणाऱ्या भेटवस्तू बाजारात येतात. त्याच्या जीवनातील विविध घटना चित्रित करणाऱ्या थीमपार्कची उभारणी होते. त्यातील क्विडिच या खेळावर आधारित व्हिडिओ गेम्स तयार होतात. हॅरी पॉटर हे ब्रँडनेम बनल्याने निरनिराळे व्यावसायिक त्याचा लाभ उठवतात. ब्रँडनेम प्रस्थापित करणाऱ्या कंपन्या व उत्पादक जागतिक बाजारपेठेवर आपले प्रभुत्व गाजवतात. उत्पादकांना गडगंज

संपत्ती मिळवून देतात. पुस्तकांच्या संदर्भात बोलायचे झाले तर गाजलेली पुस्तके लेखक-प्रकाशकाला पैसा मिळवून देतात. बेस्टसेलर लेखकाला नाव मिळवून देतात. त्याच्या पुढच्या पुस्तकाची वाचक ग्राहक उत्सुकतेने वाट पाहत राहतात. जेम्स बाँड हे ब्रँडनेम झाले. जेम्स बाँडवर चित्रपट निघाले. त्याची पुस्तके लाखोंनी विकली गेली. त्याची नक्कल करणारे गुप्तहेर नायक अनेक लेखकांनी निर्माण केले. लेखक इआन फ्लेमिंग याचा मृत्यू झाल्यावरही त्याच्या ट्रस्टला कोट्यवधी पौंडांचे उत्पन्न होत आहे. युरोप-अमेरिकेत अशा बेस्टसेलर लेखकांना आणि पुस्तकांना अमाप कमाई होते. तो लेखक व त्याने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा यांना ब्रँडनेमची स्टेटस मिळावी म्हणून प्रकाशक त्यांच्या जाहिरातीसाठी थैल्या मोकळ्या सोडतात. ब्रँडनेम म्हणून ज्याचे नाव लोकांना चिरपरिचित होते त्याची प्राप्ती सतत वाढत जाते. असा एखादा बेस्टसेलर आपल्या प्रकाशनाकडे असला तर त्या प्रकाशनसंस्थेचे भाग्य फळफळते. एकापेक्षा जास्त बेस्टसेलर आपल्या यादीमध्ये असले तर त्या प्रकाशन संस्थेचा दरारा आणि दबदबा प्रचंड वाढतो. भाषांतर, चित्रपट, सीरियल्स, ॲनिमेशन, कॉमिक्स, भेटवस्तू यांच्या हक्कापोटी लक्षावधी डॉलर्स मिळतात. ती प्रकाशनसंस्था स्वत:च ब्रँड बनते.

परंतु बहुसंख्य प्रकाशनसंस्था या लेखकाच्या ब्रँडवर अवलंबून असतात. तो लेखक दुसऱ्या संस्थेकडे गेला की त्या प्रकाशकांची कमाई घटते. ते अडचणीत येतात.


जागतिकीकरणाच्या सद्य:कालीन स्पर्धेत अनेक अग्रगण्य प्रकाशन संस्था लेखकाच्या ब्रँडवर आपले अस्तित्व आणि प्रभाव अवलंबून आहे या जाणिवेने अस्वस्थ आहेत. त्यांना स्वत:च ब्रँडनेम होण्याची गरज भासू लागली आहे.

वाचक-ग्राहक लेखकाच्या किंवा पुस्तकाच्या नावाने दुकानात मागणी करतात, प्रकाशकाच्या नावाने नाही हे बऱ्याच प्रकाशकांना आता खटकू लागले आहे. ''मला मौज प्रकाशनाची नवीन पुस्तके बघायची आहेत,'' ''पॉप्युलरची समीक्षेवरची पुस्तके मिळतील का?'' ''सानेगुरुजींच्या समग्र पुस्तकाचा सेट आहे का?'', ''पद्मगंधाने काढलेला ॲगाथा ख्रिस्तीच्या रहस्यकथांचा संच मिळेल का?'' अशी प्रकाशनाचे नाव घेऊन ग्राहकांनी मागणी केली तर त्या प्रकाशनाला ब्रँड म्हणून ओळख लाभलेली आहे असे म्हणता येते. स्वामी, हिंदू, विश्वास पाटील, जीए, पाडगावकर अशी पुस्तकांची किंवा लेखकांची नावे घेऊन जेव्हा मागणी होते तेव्हा ती ब्रँड म्हणून मान्यता मिळाल्याची निदर्शक असते. अर्थात कुठल्याही लेखकाचा ब्रँड म्हणून प्रतिमा झाली तरी त्याचे प्रत्येक पुस्तक ब्रँड या पदवीला पात्र असतेच असे नाही. परंतु प्रकाशकाला ब्रँडची स्टेटस मिळणे हे एकूण

अवघडच असते. एखाद्या प्रकाशनाने काढलेल्या कुठल्याही पुस्तकाला भरपूर मागणी असेल असे क्वचितच घडते. 'पेंग्विन क्लासिक्स'चे उदाहरण या बाबत उद्‌बोधक ठरते. नामवंत लेखकांची उत्तमोत्तम दर्जेदार पुस्तके पेंग्विन क्लासिक्स या मालिकेत अंतर्भूत असतात. पेंग्विनच्या ब्रँडनेमच्या विश्वासामुळे जगभरचे चोखंदळ वाचक या मालिकेतील पुस्तके आवर्जून घेतात. लेखक अपरिचित असला तरी आदराने आणि औत्सुक्याने त्यांचे वाचन-अध्ययन करतात. पेंग्विनच्या संपादकीय संस्कारांची आणि निर्मितीमूल्यांची ग्वाही या पुस्तकांना साहित्यविश्वात अग्रगण्य पंक्तीत विराजमान करते. पेंग्विनसारखी ब्रँडनेमची पुण्याई फार मोजक्या प्रकाशनसंस्थेच्या वाट्याला येते. हर्लेक्विन मिल्स अँड बून या प्रकाशनालाही असेच ब्रँडनेम प्राप्त झालेले आहे. टीनएजर्ससाठी प्रेमकथा प्रसिद्ध करणे ही मिल्स अँड बून्सची खासियत. लेखकाच्या नावाला त्यात महत्त्व नसते. वेगवेगळ्या लेखक या प्रेमकथा लिहितात... ह्या प्रेमकथा मिल्स अँड बूनच्या म्हणजे प्रकाशकाच्या नावावरच जगभर खपतात. महिन्याला पाचदहा पुस्तके निघतात. त्यावर कुमार वाचकांच्या उड्या पडतात. मिल्स अँड बूनच्या प्रेमकथा भारतात वर्षाला १०० कोटी रुपयांचा धंदा करतात. सोप्या इंग्रजीत लिहिलेल्या या प्रेमकथा इंग्लिश मिडियममध्ये शिकणाऱ्या मुलामुलींना सुलभ वाचनाचा आणि रोमँटिक स्वप्नांचा खुराक देत राहतात. लेखकाचा ब्रँड येथे नगण्य असतो.

यापुढच्या डिजिटल पुस्तकांच्या काळात लेखकाच्या ब्रँडवर अवलंबून राहून चालणार नाही, प्रकाशकांनी स्वत:चा ब्रँड निर्माण केला तरच निभाव लागेल अशी जाणीव आता अमेरिका-युरोपमधील प्रकाशकांना तीव्रतेने होत आहे. संपादकीय गुणवत्ता, विषयांचे नावीन्य, अपेक्षित वाचकांची अभिरूची आणि वयोगट वगैरे बाबी लक्षात घेऊन विशिष्ट प्रकारची दर्जेदार पुस्तके सातत्याने प्रकाशित करणे आणि आपला स्वत:चा ब्रँड निर्माण करणे हे या पुढच्या काळात प्रकाशकांपुढे एक आव्हान असणार आहे. पुस्तक हे बुकसेलरसाठी, विक्रेत्यासाठी नसून पुस्तक हे थेट ग्राहकासाठी आहे आणि ते ग्राहकापर्यंत पोचवण्याचे इंटरनेट हे प्रभावी माध्यम आहे हे ॲमेझॉनने दाखवून दिले आहे. ॲमेझॉनने दिलेला हा धडा प्रकाशकांना 'ब्रँड' स्टेटस मिळवण्याची प्रेरणा देणारा आहे.

मराठीतील प्रकाशनसंस्थांनीही या विषयाकडे लक्ष देणे आत्मकल्याणाचे ठरेल.



## मेहता पब्लिशिंग हाऊस

नुकतीच प्रकाशित झालेली पुस्तके

### कादंबरी

| | | |
|---|---|---|
| **नथिंग टू लूज :** ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५०/- |
| **डिजिटल फॉर्ट्रेस :** डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४४०/- |
| **द मिसिंग रोझ :** सरदार ओझकान | अनु. श्रीकांत परांजपे | १५०/- |
| **आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद :** मायकेल हेस्टिंग्ज | अनु. अंजनी नरवणे | २५०/- |
| **जोहार माय बाप जोहार** | मंजुश्री गोखले | ३००/- |
| **द प्रायव्हेट पेपर्स ऑफ ईस्टर्न ज्युवेल** : मॉरीन लिंडले | अनु. ऋजुता कुलकर्णी | २८०/- |

### कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **भावकल्लोळ :** के. सत्यनारायण | अनु.प्रा.एन.आय.कडलास्कर | १२०/- |
| **उधाण** | पांडुरंग कुंभार | १३०/- |

### ललितलेख

| | | |
|---|---|---|
| **एक दिवस** | शोभा चित्रे | १४०/- |

### व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **वुमन ऑन टॉप :** सीमा गोसावी | अनु. शोभना शिकनीस | १५०/- |

### आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **इनसाइड द गॅस चेंबर** : श्लोमो व्हेनेत्सिया,संपादन : जीन माउटापा | अनु. सुनीति काणे | २००/- |
| **आनंदाचं पासबुक** | श्याम भुर्के | ३००/- |


### मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **द स्टार प्रिन्सिपल :** रिचर्ड कोच | अनु. श्याम भुर्के | १८०/- |
| **फिट फॉर ५०+ फॉर विमेन** : शेन गुड | अनु. सुभाष जोशी | ८०/- |
| **फिट फॉर ५०+ फॉर मेन** : ग्रेग चॅपल | अनु. सुभाष जोशी | ८०/- |

### चिकन सूप मालिका

| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द पेरेंट्स सोल :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, किंबर्ली किर्बर्जर, रेमंड आरॉन | अनु. प्रज्ञा ओक | २५०/- |
| **चिकन सूप फॉर द सोल भाग-४ :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, हॅनाह मॅकार्टी, मेलडी मॅकार्टी | अनु. उषा महाजन | २५०/- |
| **चिकन सूप फॉर द सोल भाग-५ :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन | अनु. उषा महाजन | ३००/- |

**आगामी**




# ती दोघं

**डॉ. रमा मराठे**

ती दोघं! वेगवेगळ्या स्वभावांची... वेगवेगळ्या काळातली...
नातं एकच – पती-पत्नी, नर-मादी, प्रियकर-प्रेयसीचं!
पण भावबंध अनेकविध...
...कधी यौवनाचं, सौंदर्याचं आकर्षण... कधी तिचं विशाल आईपण...
कधी त्याच्या मनाचं मोठेपण... कधी त्याचं फक्त व्यवहारी मन...
कधी दोघांचं एकमेकांत विरघळून जाणं... कधी एकमेकांना ओळखून असणं...
कधी त्रिकोण प्रेमाचा... कधी खेळ दुर्दैवाचा...
कधी न संपणारं रितेपण... तर कधी जगावेगळं समर्पण...
कधी प्रेमाला झालर मनमोकळेपणाची... कधी किनार काळी, संशयाची, प्रतारणेची...
कधी दोघांची फक्त समांतर रेषा, कधी शब्दावीण फक्त डोळ्यांचीच भाषा...
कधी ओढ फक्त शरीराची... भोगवादी कधी ती दोघं फक्त नर आणि मादी...
क्वचित इतर नाती विविधरंगी...
नाती व्यक्त करणारी भाषा काळानुरूप,
संदर्भ आणि प्रसंग त्या त्या वेळच्या सामाजिक संकेतानुसार!
पण 'भावना' त्याच... आदिम!
एकविसाव्या शतकात वावरणाऱ्या तरुणतरुणींसाठी
भारतीय परंपरांचे, संस्कृतीचे काठ लेवून वाहणारा हा कथांचा ओघ,
मन सुस्नात करणारा...

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

**आगामी**

# लोकल
## माझी सखी

**मधुवंती सप्रे**




मुंबईच्या एस.एन.डी.टी विद्यापीठात पर्यावरणावर झालेल्या चर्चासत्रात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला गेला. तो होता, 'मुंबईचा लोकल-प्रवास' – लोकल प्रवासावर संशोधन करून वाचलेला पेपर. त्यात म्हटलं होतं की 'मुंबईचा लोकल-प्रवास हे संथ मरणाचं सावट आहे'.
या एका वाक्याने लेखिका दचकली. कारण तीही रोज लोकलने प्रवास करत होती. लोकलमध्ये रोज घडणाऱ्या, घाबरवणाऱ्या घटनांची ती साक्षीदार होती.
त्यामुळे 'संथ मरणाचं सावट' या संकल्पनेनं ती मुळापासून हादरली. मुंबईसारख्या प्रचंड गर्दीच्या महानगरात, सामाजिक, राजकीय अशा बेमुर्वत घटनांनी लोकल-प्रवाशांना बसणारा फटका, उदा. रेलरोको, बॉम्बस्फोट, आगी लागणे, झोपडपट्टीवाल्यांची दादागिरी,
सिग्नल-यंत्रणा ठप्प होणे. परिणामी चाकरमान्यांना कार्यालयात पोहोचायला होणारा उशीर, लेटमार्क होणे वगैरे.
या गोष्टी प्रवाशांच्या आवाक्यातल्या नसतात. यातून वैयक्तिक समस्या निर्माण होतात. आयुष्याचा समतोल बिघडत जातो.
सत्य घटनांवर आधारित कादंबरी.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आगामी




# दिवा

**प्रमोदिनी वडके-कवळे**

गेल्या पन्नास-साठ वर्षांत भारतीय स्त्रियांचं मनोविश्‍व खूप वेगाने बदललं आहे. पण तरीही त्यांच्याभोवतीचं वातावरण मात्र बदललेलं नाही.

समाजाच्या अपेक्षा बदललेल्या नाहीत.

जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना पारंपरिक बाज स्त्रियांनीच सांभाळावा आणि मध्यममार्गी जगण्याच्या चौकटीतून बाहेर न पडताच त्यांनी जगाचा वेध घ्यावा, असा समाजाची अपेक्षा असते.


अशा तळ्यातमळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपल्या परीने सोडवलेल्या काही सामाजिक गणितांचा वेध सहजसुंदर भाषा आणि ओळखीचं वातावरण, यामुळे या कथांतली पात्रं अलगद मनाचा ठाव घेतात.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

आगामी

# युथनेशिया

**स्वाती चांदोरकर**





'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक:।
न चैनं क्लेद्यन्त्यापो न शोषयति मारुत:॥

असं असलं तरी 'मृत्यू' म्हटलं की
भय, दु:ख, वेदना काही टळत नाहीत.
जगण्याचा मोह सुटत नाही.
'आयुष्य नको आता'
असं म्हणणारी माणसं जास्त जगतात.
विकलांग झालेली शरीरंही त्रास,
अपमान सहन करतात.
अशा केसेसमध्ये दयामरण (युथनेशिया)
हा पर्याय का स्वीकारू नये?

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

## ओशो यांचे साहित्य





### माझे माझ्यापाशी काही नाही

**अनु. भारती पांडे**

योग आणि साधना याबाबत कबीरांच्या सुंदर दोह्यांचे ओशोंनी केलेले रसाळ विवेचन

**१२०रु. पोस्टेज २०रु.**

---





### हसत खेळत ध्यानधारणा

**अनु. मीना टाकळकर**

ध्यान माणसाचे मन निरोगी व निकोप बनवते. ओशोंचे ध्यानविषयक विचारधन

**७०रु. पोस्टेज २०रु.**

---




### मुग्ध कहाणी प्रेमाची

**अनु. मीना टाकळकर**

कबीरांच्या सुंदर आणि भावात्म दोह्यांचे ओशोंनी केलेले रसाळ विवेचन

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

---




### मृत्यू अमृताचे द्वार

**अनु. भारती पांडे**

मृत्यू आणि संपूर्ण सत्य याबाबत कबीरांच्या सुंदर दोह्यांचे ओशोंनी केलेले रसाळ विवेचन

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

## ओशो यांचे साहित्य





# एक एक पाऊल

**अनु. भारती पांडे**

जीवनात योग्य दिशेनं पाऊल उचलण्यासाठी
बहुमोल मार्गदर्शन

**१००रु. पोस्टेज २०रु.**

---





# म्हणे कबीर दिवाणा

**अनु. भारती पांडे**

आपल्या विलक्षण वाणीने ओशोंनी उलगडून
दाखवलेला कबीर

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

---





# भक्तीत भिजला कबीर

**अनु. भारती पांडे**

भक्ती मार्गाचे महत्त्व सांगणाऱ्या कबीरांच्या सुंदर
दोह्यांचे ओशोंनी केलेले रसाळ विवेचन

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

---



# हा शोध वेगळा

**अनु. भारती पांडे**

गुरू आणि ज्ञान याबाबत कबीरांच्या सुंदर दोह्यांचे
ओशोंनी केलेले रसाळ विवेचन

**१२०रु. पोस्टेज २०रु.**

# साहित्यवार्ता



*** विकिपिडिया - दीड कोटी नोंदी**

'ए टू झेड' या आद्याक्षरांपासून सुरू होणाऱ्या दीड कोटी संज्ञांची माहिती पुरविणारा विश्वकोश म्हणजे अर्थात विकिपिडिया. अवघ्या तीस सेकंदात आपण सर्च दिलेल्या शब्दांची माहिती आपल्याला या साइटवर मिळते. फायनान्समध्ये पदवीधर असलेल्या जिमी वेल्सने २००१मध्ये जगाला माहितीचे दालन खुले केले. त्याने केवळ ज्ञानाचा प्रसार करणे या उद्देशाने ही साइट सुरू केली. त्यामागे नफा कमवण्याचा कोणताही उद्देश त्याने ठेवला नाही. त्यामुळे त्याच्या या साइटवर जाहिराती न घेण्याच्या निर्णयाचे अनेकांना आश्चर्य वाटले होते. त्याने म्हटले होते की, व्यापार करणे, जाहिराती मिळवणे हे वाईट नाही पण विकिपिडिया हे माहिती देणारे मंदिर किंवा सार्वजनिक केंद्र आहे. इथं येणारा प्रत्येकजण ज्ञानाची भूक भागवण्यासाठी आलेला असतो. हा एक अनोखा प्रयोग आहे.

साइटचा आवाका आणि कार्यक्षमताही वाढल्यानंतर तिच्या खर्चात देखील वाढ झाली. १६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची गरज असल्याचे सांगून वेल्सने मदतीसाठी आवाहन केले. विकिपिडियाला भेट देणाऱ्या ४० कोटी युजर्सनी प्रत्येकी एक डॉलर्सची मदत केली तरी गरजेच्या २० पट अधिक निधी जमा होईल आणि ही ज्ञानगंगा अखंड वाहत राहील असा विश्वास त्याने व्यक्त केला.

*** ८४ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन - ग्रंथदिंडी**

ठाणे शहरातील प्रमुख मार्गांवर काढलेल्या भव्य रांगोळ्या, अग्रभागी असलेल्या बग्गीतून निनादणारे सनईचे मंजूळ स्वर, मराठीतील आद्य ग्रंथ लीळाचरित्र आणि अन्य ग्रंथ असलेली पालखी, आदिवासींचे तारपा नृत्य, ढोल व ताशांचा गजर आणि मराठीचा जयघोष यांनी ठाणे शहरातील वातावरण संमेलनमय झाले. साहित्य संमेलनाच्या दरवर्षीच्या परंपरेनुसार ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाली, तरी ग्रंथदिंडीत एकूणच उत्साहाचा अभाव आणि नियोजनाचा गोंधळ दिसून आला. जनकवी पी. सावळाराम यांच्या निवासस्थानाहून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. सावळाराम यांच्या निवासस्थानाबाहेर त्यांचे छायाचित्र आणि त्यांना मिळालेले पुरस्कार, सन्मानचिन्हे मांडून ठेवण्यात आली होती. खासदार संजीव नाईक, संमेलनाचे पदाधिकारी आणि

रसिक साहित्यप्रेमी उपस्थित होते.

संमेलनाचे नियोजित अध्यक्ष उत्तम कांबळे, त्यांच्या पत्नी, संयोजक समितीचे पदाधिकारी गाडीत बसले होते. वसंत डावखरे, महापौर अशोक वैती, आमदार एकनाथ शिंदे, 'भाजप'चे संदीप लेले आदी नेते दिंडीत सहभागी झाले.

गोखले मार्गावरून निघालेली ही दिंडी राम मारुती मार्ग, तलावपाळी परिसरातून मराठी ग्रंथसंग्रहालयाची मुख्य इमारत, ठाणे नगरपालिकेचे जुने कार्यालय या मार्गाने दादोजी कोंडदेव प्रेक्षागृहात पोचली. उत्तम कांबळे यांचे सुवासिनींकडून औक्षण करण्यात आले. साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि अन्य लेखक यांच्या पुस्तकांच्या प्रतिकृती घातलेले शालेय विद्यार्थी ग्रंथदिंडीचे आकर्षण ठरले होते.

*** बालमेळाव्यात अनिल अवचट यांचे लहानग्यांना आवाहन**

प्रत्येकाच्या हातात कला असते. आपण जेव्हा आपले हात चालवतो, तेव्हा त्या हातांतली कला अधिकच फुलत जाते, विकसित होत जाते आणि ती आपल्याला जीवनाचा खरा आनंद देते. केवळ या खऱ्या आनंदासाठीच आपल्या हातांतील कला फुलवा, तिला कुठल्याही स्पर्धेच्या किंवा परीक्षेतील गुणांच्या कोंदणात अडकवू नका, असे आवाहन अनिल अवचट यांनी साहित्य संमेलनात केले.

अनिल अवचट यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच आपण येथे केवळ मज्जा करण्यासाठी जमलो आहोत, असे जाहीर करून चित्रकला, ओरिगामी, दोरीच्या करामती दाखवित मुलांशी संवाद साधत त्यांना या कलांमधील गंमत उलगडून दाखवली. सुरुवातीला फळ्यावर हत्ती, गणपती, कुत्रा, ससा, घोडा, गाय ही सहज चित्रे कशी काढता येतात, याची प्रात्यक्षिके दाखविली. रेघांची ही गंमत उलगडताना ते म्हणाले, ''कमीत कमी रेघांचा वापर करीत चित्र काढा. रेघ सरळ येईल की वाकडी, याची फारशी चिंता बाळगू नका. मी या कागदाचा राजा आहे, या भावनेने चित्र काढा आणि आपल्या हातातील कला फुलवल्याचा मनसोक्त आनंद घ्या. रेघा, गोल यांच्यामधून कोणते आकार काढता येतील, याचाच सतत विचार करत राहा.''

एका साध्या कागदातून ओरिगामीची कला कशी फुलविता येते, याची प्रात्यक्षिके अनिल अवचट यांनी दाखविली. उडणारा पक्षी, कागदांच्या पट्ट्यांतून साकारलेला मासा, चोच हलविणारा पक्षी तसेच दोरीच्या सहाय्यानं तयार केलेलं नारळाचं झाड, घर, रुमालाचा ससा, उंदीर, नाचणारी मुलगी अशा अनेक गमती-जमती त्यांनी करून दाखविल्या. बोटांच्या कलात्मक हालचालींमुळे मुलांच्या मेंदूची वाढ उत्तम होते. ही कला मुलांमध्ये जोपासणे आवश्यक आहे, या कलेने आपल्यालाही वेड लावले आहे, रात्रंदिवस आपण या कलेत रमतो, अशी कबुली दिली. शेवटी ते म्हणाले, ''एकवेळ मला विसरलात तरी चालेल, पण या आनंददायी कलांचा अजिबात विसर पडू देऊ नका.''

*** महाचर्चा : मराठी चित्रपटांची संख्या वाढली, पण दर्जाचे काय?**

मराठी चित्रपटांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे तसेच त्यांचा गुणात्मक दर्जा, त्यांच्या प्रसार आणि प्रचारासाठी केलेल्या उपाययोजना याही अत्यंत महत्त्वाच्या असल्याचा सूर 'मराठी चित्रपटांची संख्या वाढली, पण दर्जाचे काय?' या चर्चासत्रात व्यक्त झाला. दिग्दर्शक परेश मोकाशी, गजेंद्र अहिरे, विजय कोंडके आणि उमेश कुलकर्णी या सर्वांना लोकसत्ताचे वरिष्ठ सहसंपादक श्रीकांत बोजेवार आणि पत्रकार मंदार जोशी यांनी बोलते केले. या चर्चासत्रामध्ये नव्या आणि जुन्या पिढीमधील चित्रपट समीक्षक म्हणून सुधीर नांदगावकर, दिनकर गांगल, रघुवीर कुल आणि सुनील डिंगणकर हेही सहभागी झाले होते.

शासनाकडून मिळत असलेल्या सानुग्रह अनुदानामुळे सध्या मराठी चित्रपटांची संख्या वाढत आहे, पण त्यामध्ये गुणात्मक दर्जाचा अभाव असतो, असे बोजेवार म्हणाले. मराठी चित्रपटाच्या क्षेत्रामध्ये नवीन प्रयोग करण्याची आवश्यकता आहे मात्र अशा कलाकृती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतील याची खात्री देता येत नाही, या मोकाशी यांच्या भूमिकेला गजेंद्र अहिरे तसेच उमेश कुलकर्णी यांनी टेकू दिला. पण विजय कोंडके यांनी मात्र प्रेक्षक हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवूनच कलाकृतींची निर्मिती व्हावी, असे मत व्यक्त केले. रसिकानुरंजन हा कलाकृतीचा स्थायीभाव असला तरी त्या पलीकडे जाऊन प्रायोगिक पातळीवर नवीन आणि सकस निर्मिती व्हावी, याकडे युवा दिग्दर्शकांचा कल असल्याचे गजेंद्र अहिरे यांनी सांगितले. या क्षेत्रामध्ये 'पॅशन' म्हणून नवीन पिढी आकर्षित होत आहे. हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असले तरी बॉक्स ऑफिसवर त्याला अत्यंत थंडा प्रतिसाद होता. पण यामुळे खचून न जाता आम्ही यापुढेही अशा वेगळ्या व नावीन्यपूर्ण धाटणीच्या कलाकृती तयार करणारच, असा ठाम आशावाद परेश मोकाशी यांनी व्यक्त केला. पूर्वी एखादा चित्रपट निर्मिती अवस्थेत असतानाच त्याबद्दलची माहिती प्रेक्षकांपर्यंत पोहोचत असे. पण आता हे सर्व बंद झाल्याने त्याचा फटका मोठ्या प्रमाणात बसतो असे विजय कोंडके म्हणाले. भविष्यात मराठी चित्रपटाला आशादायक स्थिती असल्याचा सूर या चर्चासत्रामध्ये व्यक्त करण्यात आला.

*** पाडगावकरांच्या कवितांमध्ये न्हाऊन निघाले रसिकजन**

*फुलपाखरं झाल्याखेरीज फूल नसतं आपलं*
*कोऱ्या कोऱ्या कागदावर असलं जरी छापलं*
*ओठात आल्याशिवाय गाणं नसतं आपलं...*

कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या कवितांची मैफल ठाण्याच्या गडकरी रंगायतन-मध्ये रंगली. पाडगावकर यांच्या साहित्यावर पुण्यातील अनन्वय फाऊंडेशनच्या

विद्यार्थ्यांनी 'आनंदयात्री मी' कार्यक्रम सादर केला.


'अनन्वय'चे हर्षवर्धन जतकर, ऋतुराज गोवईकर, परिमल केळकर, शिवांगी गुडसुरकर, सौरभ दप्तरदार, प्राची ओक यांनी जयश्री करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली महफिल गाजवली.

सौरभ दप्तरदार व प्राची ओक यांनी 'तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे' गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात केली. श्रावणात घननिळा बरसताना, जाहल्या काही चुका, शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलापरी, दिवस तुझे हे फुलायचे, आले कशाला माझे मला कळेना अशी एकापेक्षा एक सदाबहार गीते यावेळी सादर करण्यात आली.

*** 'गावाकडच्या कवितां'ना मिळाली मनमुराद दाद**

कवी प्रा. प्रवीण दवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कविसंमेलनासाठी २४ कवींना निमंत्रित करण्यात आले होते. मात्र सौमित्र, गुरू ठाकूर, नारायण कुळकर्णी-कवठेकर आदी कवी शुभेच्छा पाठवून अनुपस्थित राहिले. डॉ. नरेंद्र जाधव यांनी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची त्यांनी अनुवादित केलेली छत्रपती शिवाजी महाराजांवरची कविता वाचून दाखवली. गावाकडून नव्या जाणिवा घेऊन आलेल्या कवींना रसिकांकडून मनमुराद दाद मिळाली. कवी सतीश सोळांकुरकर यांनी या संमेलनाचे सूत्रसंचालन केले.

अध्यक्ष प्रवीण दवणे यांनी 'शब्द गृहीत धरत नाही' ही कविता वाचून या मैफलीचा आरंभ केला. सिसिलिया कार्व्हालो (ठसा), निकिता भागवत (प्रतीक्षा), सुरेश पाचकावडे (बैलांना नसतो कळत त्यांचा जीवनाचा अर्थ), प्रदीप पाटील (ज्याचे कष्ट वारेमाप), सुनंदा पाटील (चामड्याची कुलपं), इंद्रजित भालेराव (कविता), अस्मिता जोगदंड (विसंगती), बाळासाहेब गर्कळ (शेतकरी), मार्तंड कुलकर्णी (जगतो माझा बाप), डॉ. प्रज्ञा पवार (बोलून चालून नादान बाई मी), बालाजी इंगळे (बापाचं कम्युनिकेशन), नरेंद्र शेलार (आगमन क्रांतीचे), चंद्रकांत वानखडे (गंध फुलवली जाई जाई), संतोष शेणई (मोबाईलवर बोलणारी मुलगी), वंदना किणीकर (ऐक पोरा), देवीदास फुलोरे (काचकातऱ्यांचा खेळ), रेषा आकोटकर



**बकुळा**

**सुधा मूर्ती** अनु. लीना सोहोनी

बकुळीच्या साक्षीने जन्मलेली श्रीमती आणि श्रीकांत यांची अनोखी प्रेमकहाणी....

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

(राजा आहे, प्रजा नाही), दासू वैद्य (कसं वाटतंय आता), शिवाजी चाळके (दिगंबर), माणिक वांगडे (शीळ रानात घुमली), दत्ता नाईक (धन्य धन्य तू समाजपुरुषा), एकनाथ मुंबईकर (पाऊस), कैलास पगारे (घस्टी), गिरिजा मुरगुडी (आतबाहेर), किरण केंद्रे (शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारा अभंग), प्रसन्नजीत गायकवाड (दूरध्वनींचे उंच मनोरे अवतीभोवती) यांनी आपल्या कविता या मैफलीत सादर केल्या.

दुर्गेश सोनार यांच्या 'तेव्हा जरी लाईट नव्हती, स्थिती एवढी वाईट नव्हती' किंवा 'प्रकाशाच्या दरबारी आता पॉवरफुल दादा आहे. २४ तास वीज द्यायचा त्याचा म्हणे दावा आहे.' अशासारख्या पंक्तींना रसिकांना दाद दिली.

प्रदीप पाटील (ज्याचे कष्ट वारेमाप), लता आयवळे यांनी गाऊन सादर केलेल्या बाप या कवितेचेही कौतुक झाले. अजीम नवाज राही (कविता व्यवहाराच्या काळ्या घोड्याची), डॉ. सुहास देवळीकर (मुलाचा पतंग), वीरधवल परब (वय वाढतंय जातंय आपलं), सतीश सोळांकुरकर (भाकरी), प्रा. प्रशांत मोरे (घरातले ओळखीचे किती दूर दूर गेले) आणि डॉ. सई लळित यांनी सादर केलेल्या मालवणी भाषेतील कवितेवरही रसिकांच्या पसंतीची मोहोर उमटली.

### * बालसाहित्य संमेलनाची अध्यक्षा दक्षता लिंगायत

''साहित्य आणि संस्कृतीचा दिवा तेवत ठेवण्यासाठी वाचनसंस्कृती रुजविली पाहिजे; तसेच मुलांनी थोर विचारवंतांची चरित्रे, शास्त्रज्ञांचे साहित्य वाचले पाहिजे. हे बालसाहित्य संमेलन म्हणजे मोठ्यांनी लहानांसाठी दिलेले व्यासपीठ आहे'' असे या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात रत्नागिरीच्या दक्षता लिंगायत हिने म्हटले. महाराष्ट्राची भूमी ही देवदेवतांची भूमी असून सरस्वती ही साहित्याची अधिष्ठाती देवता आहे. मराठी भाषा प्रत्येकाच्या मनात रुजविणे आवश्यक असल्याचे तिने सांगितले.

लहान मुलांनी लिहिलेले साहित्य हे बालपठडीतले आहे. हे साहित्य व्यापक आहे. लहान वयात मुले चंद्र, सूर्य यांच्यावर कविता करतात, पण किशोरवयात आल्यावर त्यांच्या लिखाणाची शैली बदलते. किशोरवयातच मौलिक विषयांवर लेखन केले पाहिजे; तसेच लिखाण करताना भाषा आणि रंजकता याकडे लक्ष दिले पाहिजे, असे सांगून दक्षताने 'तव शौर्याचा एक अंश दे, तव धैर्याचा स्पर्श दे' या काव्यपंक्तींनी अध्यक्षीय भाषणाची सांगता केली.

### * लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळेच मराठी न्यायालयाबाहेर!

राज्यघटनेत तरतूद असूनही लोकप्रतिनिधींनी न्यायालयीन कामकाजात देशी भाषांचा वापर होण्याबाबत कायदा न केल्यामुळे स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे होऊन गेली तरी न्यायालयीन कामकाजात केवळ इंग्रजीचाच वापर होत आहे. तालुका अथवा

जिल्हाच नव्हे, तर उच्च न्यायालयाच्या कामकाजामध्ये मराठीचा वापर होणे आवश्यक आहे. त्याबाबत विधिमंडळात कायदा करून घेणे ही शासनाची जबाबदारी होती. तसे न झाल्याने इंग्रजी न्यायदान पद्धत सर्वसामान्यांवर लादली गेली, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. एन. देशमुख यांनी 'मराठीच्या अध:पतनास जबाबदार कोण?' या विषयावरील अभिरूप न्यायालयात केले.

ज्येष्ठ पत्रकार नितीन केळकर आणि वृत्तनिवेदिका वासंती वर्तक हे वकील तर फिर्यादी म्हणून पत्रकार नीला उपाध्ये, संगीतकार कौशल इनामदार, शुभदा चौकर, ॲड. गजानन चव्हाण, खासदास श्रीनिवास पाटील, 'स्टार माझा' वृत्तवाहिनीचे राजीव खांडेकर, मनसेचे शिरीष पारकर, अशोक नायगावकर, शिक्षणतज्ज्ञ भाऊ गावंडे आणि भारतकुमार राऊत हे आरोपी होते.

बेजबाबदार प्रसारमाध्यमांनी मराठीचा सत्यानाश केला, असा आरोप नीला उपाध्ये यांनी केला. शुभदा चौकर यांनी गेल्या पाच वर्षांत एकाही मराठी शाळेस मान्यता न देणाऱ्या शासनाने या कालावधीत अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मात्र परवानगी दिली. मातृभाषेतून शिक्षण घेणे अधिक चांगले हे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध होऊनही मराठी शाळांबद्दल शासन दुजाभाव का करते, असा प्रश्न चौकर यांनी विचारला.

परिस्थितीप्रमाणे जे बदलते, तेच टिकते, भाषाही त्यास अपवाद नाही. यापूर्वीही मराठी भाषा अनेक परकीय शब्द आत्मसात करीत समृद्ध झाली. संवाद साधणे अधिक सुलभ व्हावे म्हणून काही इंग्रजी शब्द वापरण्यात गैर असे काहीच नाही, असे ठाम मत आपल्या बचावात भारतकुमार राऊत यांनी मांडले. राजीव खांडेकर यांनीही प्रसारमाध्यमांवरील आरोप फेटाळून लावत उलट मराठीची अधोगती जर होत असेल, तर तिला समाजच जबाबदार आहे, असे म्हटले. वृत्तवाहिन्यांमुळे मराठीच्या विविध बोलीभाषांचा प्रसार झाला. देशाच्या तसेच जगाच्या कानाकोपऱ्यांतील मराठी जनांच्या कानी मराठी भाषा पोहोचविण्यात वाहिन्यांचे मोठे योगदान आहे, असे ते म्हणाले. तीन तास सुरू असलेल्या या अभिरूप न्यायालयात फिर्यादी, आरोपी आणि वकिलांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले.

*** प्रा. शंकर वैद्य आणि शं. ना. नवरे यांचा सत्कार**

साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि संमेलनाध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी प्रा. शंकर वैद्य, नाटककार आणि साहित्यिक शं. ना. नवरे आणि ग्रंथालय चालक श्यामसुंदर जोशी यांचा सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानपत्र असे त्याचे स्वरूप होते.

सत्काराला उत्तर देताना प्रा. वैद्य म्हणाले की, सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरा मी मानतो. त्याच परंपरेच्या आधारावर मी वाढलो, तिचे ऋण मी विसरू शकत

नाही. परंपरा माणसाला जोडण्याचे काम करते. मी गुणगुणणारे मन घेऊन जन्माला आलो आणि या गुणगुणण्यातूनच माझ्या कवितेने जन्म घेतला.

नवरे म्हणाले की, आयुष्यात चांगली माणसेही मला भेटली. पुस्तके वाचण्याचा छंद मला माझ्या आईमुळे लागला. आपल्याकडे करण्यासारखे आणि वाटण्यासारखे काही आहे हे जाणवते तेव्हा माणूस लिहायला लागतो. आजचा हा सत्कार माझ्या आईचा, गुरूंचा, शाळेचा, मित्र, नातेवाईक आणि माझ्या गावाचा आहे. आज मी जो काही आहे तो या साहित्यामुळे आहे.

बदलापूर येथे 'ग्रंथसखा' वाचनालय चालविणारे श्यामसुंदर जोशी यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

### * 'मराठी लेखनकलेसाठी संवाद तंत्रज्ञान लांबच'

टाक, लेखणी जाऊन आलेल्या संगणकाच्या कळफलकाचा मराठी लेखनकलेवर काय परिणाम होईल, याचा विचार करण्यासाठी जमलेल्या तज्ज्ञांनी पुढील पिढ्याच मराठी लेखनकलेची स्वत:च्या पद्धतीने जपणूक करतील, अशी आशा प्रकट केली.

समीरण वाळवेकर यांनी आभासी विद्यापीठाची संकल्पना मांडून संवाद तंत्रज्ञान कला प्रत्येकाने आत्मसात केली पाहिजे, असे सांगितले; पण यमाजी मालकर यांनी त्यावर आक्षेप घेतला. ७० टक्के जनता अजून या तंत्रापासून लांबच आहे, राज्यात अनेक ठिकाणी १० तास वीज नसते, प्राथमिक शिक्षण अजून अनेक मुलांपर्यंत पोचले नाही, अशी संगणकाच्या कळफलकाची कमकुवत बाजू त्यांनी मांडली.

संवादासाठी शास्त्रशुद्ध मराठीची गरज नाही, तर तंत्रज्ञानाचा वापर मुले कसा करतात आणि ती आपल्यापेक्षाही संवादात कशी पुढे गेली आहेत, हे राजीव तांबे यांनी सांगितले.

मंदार जोगळेकर यांनी ई-बुकचे प्रात्यक्षिक दाखवून लेखक, प्रकाशक व वाचक यांच्यातील दरी कशी कमी करता येईल याचे विवेचन केले. आधुनिक 'इंडिया' आणि मागासलेला 'भारत' यांच्यातील दरी कमी झाली तरच हे शक्य आहे. मुले तर संगणकीय तंत्रामुळे निष्क्रिय आणि करमणूकप्रधान झाली तर मोठा धोका आहे, असा इशारा निरंजन घाटे यांनी दिला.

### * साहित्य संमेलनात ११ ठराव

महाराष्ट्राबाहेरील मराठी संस्कृती; संस्थात्मक, सार्वजनिक व सांस्कृतिक जीवनाचे जतन, जोपासना व अभिवृद्धी यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत; त्यासाठी भरीव तरतूद करून स्वतंत्र विभाग निर्माण करावा, या ठरावासह ११ ठराव मंजूर करून ८४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सूप वाजले.

मराठी विद्यापीठाची स्थापना करण्याची मागणी एका ठरावाद्वारे करण्यात आली.

साहित्य महामंडळ आणि त्याच्या घटक संस्थांच्या अनुदानामध्ये ५ लाख रुपयांवरून २५ लाख रुपयांची वाढ करण्याबरोबरच राज्याबाहेरील समाविष्ट आणि संलग्न संस्थांना प्रत्येकी ५ लाख रुपयांचे अनुदान सरकारने द्यावे, असाही एक ठराव करण्यात आला.

सरकारी व्यवहाराबरोबरच सार्वजनिक व्यवहारामध्ये मराठी भाषेच्या वापराचा आग्रह धरणाऱ्या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, वाङ्मयीन नियतकालिकांसाठी समितीची स्थापना करावी, शालेय ग्रंथालयांना अनुदान वाढवावे, ग्रंथपालांना वेतनश्रेणी देण्याबरोबरच शिक्षणसेवक कायदा रद्द करून मराठी विषय सक्तीचा करावा, विज्ञान, ज्ञानशाखा यांच्या प्रचारासाठी डोळस प्रयत्न करावेत, विविध संस्थांवर महामंडळ व घटक संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करावा, संमेलनाध्यक्षांना निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्त करावे, वगैरे ठराव संमत करण्यात आले.

*** लोकसंस्कृती**

महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीने मराठीच्या विविध बोली जतन करून ठेवल्या आहेत. या बोलीच्या विविधरंगी सादरीकरणाने नारायण सुर्वे सभामंडप दणाणून गेला. ठाणे येथील लोकरंग संस्थेच्या डॉ. प्रकाश खांडगे व महाराष्ट्रातील इतर कलाकारांनी हा कार्यक्रम सादर केला.

प्रा. गणेश चंदनशिवे यांनी सादर केलेल्या गोंधळाने या सत्राची सुरुवात झाली. सुखदा खांडगे हिने संत नामदेवांच्या दोन विराण्यांवर नृत्य सादर केले. गाडगे महाराज आणि तुकडोजी महाराजांची परंपरा सांगणारे हरहुन्नरी वैदर्भीय लोककलाकार सत्यपाल महाराज यांनी सारे सभागृह डोक्यावर घेतले.

*** समारोप**

मायमराठीला समृद्ध करणाऱ्या, भाषासमृद्धीचे तेज:पुंज वलय निर्माण करणाऱ्या अजरामर व अभिजात कलाकृतींचा आत्मीयतेने उल्लेख करीत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी संमेलनाच्या समारोपाच्या भाषणामध्ये साहित्यातील कंपूशाही, सांस्कृतिक




**पावसाआधीचा पाऊस**

**शान्ता शेळके**

मनुष्य स्वभावांचे विविध कंगोरे दाखविणाऱ्या दर्जेदार कथा...

**१३०रु. पोस्टेज २५रु.**

दहशतवाद, भाषेचे भवितव्य टिकविण्याची जबाबदारी वगैरे बाबींचा परामर्श घेतला. साहित्यातील 'होयरे'चा एक गट स्वत:ला हवे तेच मिळविण्यासाठी सांस्कृतिक दहशतवादाचे पाळणे किती दिवस हलवणार, असा सडेतोड प्रश्न विचारून अर्थसंकल्पातील तरतुदी वाढवून कलात्मक प्रयोजन प्राप्त होत नाही, दुकानांवर मराठी पाट्या लावण्यापेक्षा मराठी मनाची पाटी कोरी करून त्यावर भाषेच्या गौरवशाली परंपरेची बाराखडी गिरवायला हवी असे त्यांनी बजावले.

साहित्य अन् कंपूशाहीचे नाते जुने आहे; मात्र गटातटाचे राजकारण करून गावकुसाबाहेरील किती कोवळी बीजे कापली जात आहेत, गटबाजीने कोण कोणाला मारतो आहे, यासाठी अंतरंगात डोकावून पाहायला हवे, साहित्यबाह्य गोष्टींना अधिक महत्त्व तर प्राप्त होतेय का, याचा शोध घेण्याचा सल्ला मुख्यमंत्र्यांनी दिला. पुरस्कार, प्रकाशक, नव्या प्रयोगांच्या मांदियाळीमध्ये काही छोट्या माणसांच्या सावल्या मोठ्या होऊ लागल्या की सूर्यास्ताची वेळ नजीक आली आहे असे समजावे, असे सांगून वाद उकरून काढण्यासाठी संमेलनाच्या व्यासपीठाचा वापर होत असेल तर या व्यासपीठावर यायचे की नाही, याचाही विचार करावा लागेल असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी समारोप करताना पुन्हा एकदा मातीतल्या माणसांची भूमिका घेण्याची कळकळ व्यक्त केली.

संमेलनात गोडसे व स्टेडियमचे नाव बदलण्यावरून वाद निर्माण झाले होते. काळाने ठेवलेल्या आरशामागील पारा आपल्या सर्जनशीलतेच्या जोरावर इतका गडद करावा की इतिहासातील कलहांचे प्रतिबिंब त्यातून दिसणार नाही, या 'ज्ञानपीठ' विजेते नरेश मेहता यांच्या विचाराचे स्मरण करून दिले. मराठीसाठी सुरू असणारी लढाई ही एकांड्या शिलेदाराची न राहता सर्व स्तरांवरील सामान्यांची झाली पाहिजे, या विचाराने त्यांनी सांगता केली.

साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी सांगितले, ''आगामी ८५व्या साहित्य संमलनासाठी मराठवाडा साहित्य परिषदेची उंडणगाव शाखा, बडोदे वाङ्मय मंडळ व वसई येथील शैक्षणिक संस्था अशी तीन निमंत्रणे आली आहेत. आणखी निमंत्रणे येण्याची शक्यता असून, महामंडळाची समिती लवकरच याविषयी निर्णय घेईल.'' दिल्ली येथील महाराष्ट्र मंडळाला महामंडळामध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न चालू असल्याचेही त्यांनी सांगितले.

*** समतावादी साहित्य संमेलन**

समतावादी साहित्य चळवळीतर्फे आयोजिलेल्या दुसऱ्या समतावादी साहित्य संमेलनाला लक्ष्मण माने, वामन होवाळ, पालकमंत्री रामराजे नाईक निंबाळकर, आमदार बाळासाहेब पाटील, प्रतिमा जोशी, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. रा. गो. प्रभुणे,

डॉ. मच्छिंद्र सकटे, ॲड. रवींद्र पवार उपस्थित होते.

'पहिली ते बारावीपर्यंतच्या शिक्षणात समतावादी विचारांचा समावेश करून मुलांचे बौद्धिक मस्तक संपन्न करण्याची गरज आहे,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक बा. ह. कल्याणकार यांनी कऱ्हाड येथे व्यक्त केले. 'उपेक्षित घटकांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात साहित्यिकांना आवाज उठवून यांना न्याय देण्याची वेळ आली आहे,' असे आवाहनही त्यांनी केले.

श्री. कल्याणकर म्हणाले, ''समाजातील शिक्षण व्यवस्था बंद पडली आहे. सामाजिक मूल्यांच्या शिक्षणाचा ऱ्हास होत आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा सांगताना त्यांच्या कार्याचा आपल्याला विसर पडतोय हे सांगण्याची वेळ आली आहे. केवळ भाषणबाजीतून समतावादी विचार जपत असल्याने अनेकजण चळवळींच्या पातळीवर मागे पडत आहेत. त्यामुळे खरा समतावादी विचार लोकांपर्यंत पोचत नाही.''

लक्ष्मण माने म्हणाले, ''समता साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा माझ्यासाठी बहुमान आहे. समता हे मानवाच्या उन्नत अवस्थेतील मूलभूत मूल्य आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता यावर मानवी जीवन व समाज उभा राहावा, यासाठी जगभर प्रयत्न चालू आहेत. या वास्तवतेचे भान आपण ठेवले पाहिजे. ज्येष्ठ नेते यशंवतराव चव्हाण यांच्या कऱ्हाडात हे संमेलन होत आहे ही विशेष आनंदाची बाब आहे.''

*** राष्ट्रवादी ग्रंथालय प्रतिनिधी संमेलन**

दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनातील एकदिवसीय राष्ट्रीय ग्रंथालय प्रतिनिधी संमेलनात देशभरातील सुमारे दोन हजार प्रतिनिधी सहभागी झाले होते. गेल्या दहा वर्षांत या माध्यमातून महाराष्ट्रात १४ हजार गावांत अनुदानित, तर १२ हजार गावांत विनाअनुदानित ग्रंथालये सुरू करण्यात आल्याचे सांगण्यात आले. खासदार गोविंदराव आदिक, माजी खासदार निवेदिता माने, ग्रंथालय चळवळीचे समन्वयक बी. जी. देशमुख आदी उपस्थित होते.

ग्रंथालय अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी संपर्क साधण्यात येईल, असे केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सांगितले. देशातील ग्रंथालय चळवळीला बळ देण्याची गरज स्पष्ट करून पवार म्हणाले की, आपल्या देशातील बहुतेक लोक गरीब आहेत. त्यांना प्रगतीच्या वाटेवर नेण्यासाठी साक्षरतेबरोबरच त्यांची पुस्तकांची भूक भागविणे हाच प्रभावी मार्ग आहे. पुस्तकांमध्ये एक जबरदस्त ताकद असते. गावागावात ग्रंथालये सुरू करून त्या ताकदीचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्नशील आहे. राजकारणाबरोबरच समाजाला ज्ञानवान करणेही तेवढेच महत्त्वाचे 'गाव तेथे ग्रंथालय' ही मोहीम देशभरात राबवायला हवी.

अन्य ठरावांमध्ये गावागावात कृषी सूचना केंद्रांची स्थापना करण्यात यावी, ग्रंथालय अधिनियम देशभरात त्वरित लागू करावा, ग्रंथालय कर्मचाऱ्यांना नियमित वेतन व उचित सन्मान दिला जावा, सर्व राज्यांनी सार्वजनिक ग्रंथालय कायदा मंजूर करावा, राष्ट्रीय सार्वजनिक पुस्तकालय बोर्डाची स्थापना करावी यांचा समावेश होता..

*** भारतीय वंशाच्या व्यक्तीचा जिनोम तयार करण्यात यश**

भारतीय व्यक्तीची जनुकीय संकेतावली (जिनोम) नेहमीपेक्षा वेगळ्या तंत्राने तयार करण्यात यश आले असून, या संशोधनात डॉ. जय शेंदुरे व रुपाली पटवर्धन या मराठी वैज्ञानिकांनी मोठी भूमिका पार पाडली आहे.

जनुकीय संकेतावली तयार करण्यात आलेली व्यक्ती म्हणजे अमेरिकेत वास्तव्यास असलेली एक गुजराथी महिला आहे.

दहा वर्षापूर्वी पहिला मानवी जनुकीय आराखडा तयार करण्यात आला होता. त्या प्रकल्पाला काही अब्ज डॉलर्स खर्च आला होता. अलीकडच्या काळात जनुकीय संकेतावली तयार करण्याचा खर्च २५ हजार डॉलर इतका कमी झाला आहे. गेल्या काही वर्षांत चिनी, जपानी, कोरियन, युरोपियन व आफ्रिकी वंशाच्या लोकांची जनुकीय संकेतावली तयार करण्यात आली. आता तिच्यात भारतीय वंशाची भर पडली आहे. आई आणि वडील यांच्याकडून संक्रमित झालेल्या गुणसूत्रांतील घटकांचा थेट समुच्चय करून हॅप्लोटाईपस पद्धतीने ही संकेतावली तयार केली आहे. भारतीय उपखंड हा सांस्कृतिक व वांशिक बहुविधता असलेला आहे. तेथील लोकांचा इतिहासही वेगळा आहे. त्यामुळे या आराखड्याला विशेष महत्त्व आले आहे.

या संशोधनात प्रमुख भूमिका पार पाडणारे डॉ. जय शेंदुरे हे वॉशिंग्टन विद्यापीठात जनुकशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक आहेत. ट्रान्सलेशन जिनॉमिक्स हा त्यांचा प्रमुख विषय आहे. त्यांनी अत्यंत आधुनिक अशा डीएनए सिक्वेन्सिग पद्धतीवरच डॉक्टरेट केली असून, २००९ मध्ये एक्झोम सिक्वेन्सिग ही पद्धत शोधली आहे. विशेष म्हणजे त्यांनी पुण्यातील ससून रुग्णालयात डॉ. मृदुला फडके यांच्या नेतृत्वाखाली संशोधन केले आहे.

दुसऱ्या संशोधिका रुपाली पटवर्धन या मुंबईच्या असून, त्यांनी डॉ. शेंदुरे यांच्या प्रयोगशाळेत पदव्युत्तर विद्यार्थी म्हणून काम केले आहे.

*** 'सत्यजित राय आणि भारतीय मन्वंतर' चे प्रकाशन**

राष्ट्रीय फिल्म संग्रहालय आणि फेडरेशन सोसायटी ऑफ इंडियातर्फे आयोजित चित्रपट रसास्वाद शिबिरामध्ये डॉ. श्यामला वनारसे लिखित 'सत्यजित राय आणि भारतीय मन्वंतर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ दिग्दर्शक किरण शांताराम, अभिनेते डॉ. मोहन आगाशे, शब्दपर्व प्रकाशनाचे सुधीर नांदगावकर, सतीश जकातदार

यावेळी उपस्थित होते.

श्यामला वनारसे म्हणाल्या, राय यांचे साहित्य, चित्रपटातील विषय यांचा संस्कार माझ्या मनावर होत गेला. राय यांच्या चित्रपटांची सांधेजोड व्यवस्थित केली तर हिंदुस्थानचे दर्शन होते.

सत्यजित राय यांच्या चित्रपटांमधून मुख्य व्यक्तिरेखांचे सामाजिक, राजकीय संदर्भही प्रगट होतात. ते जो विचार करायचे तो त्यांच्या चित्रपटांमधून प्रतिबिंबित व्हायचा, असे मत ज्येष्ठ दिग्दर्शक गोविंद निहलानी यांनी व्यक्त केले.

डॉ. आगाशे म्हणाले, सत्यजित राय यांना जबरदस्त सामाजिक भान होते. त्यामुळे त्यांचे चित्रपट मनाला भावतात. राय हे मनापर्यंत पोहचतात. मनाचे कंगोरे ते वस्तुदर्शीपणे टिपतात.


शांताराम म्हणाले, माझे वडील व्ही. शांताराम आणि ज्येष्ठ दिग्दर्शक सत्यजित राय यांनी विविध चित्रपट वेगवेगळ्या पद्धतीने केले. राय यांच्या चित्रपटांचे पुनर्मुद्रण आमच्या राजकमल स्टुडिओमध्ये झाले होते.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'सत्यजित राय' आणि 'गोष्ट पथेर पांचालीची' हे लघुपट दाखविण्यात आले. रेखा साने-इनामदार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

*** 'दर्शन'चे प्रकाशन**

''देशामध्ये अनेक विषयांवर आंदोलने चालली आहेत. या सर्व आंदोलनांना दिशा व पाठबळ देण्यासाठी जनसंसद तयार होणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाओ आंदोलनातील सक्रिय कार्यकर्ते दिवंगत संजय संगवई यांनी लिहिलेल्या 'दर्शन' या पुस्तकाचे प्रकाशन करताना केले.

पाटकर म्हणाल्या की, देशामध्ये विकासाच्या नावाखाली अन्याय, अत्याचार चालू आहे. त्याविरुद्ध स्वतंत्र आंदोलने चालू आहेत. पण या आंदोलनांची ताकद शासनासमोर कमी पडत आहे. त्यांना पाठबळाची गरज आहे. म्हणूनच व्यासपीठ तयार होणे आवश्यक आहे. जनसंसदेच्या रूपात ते तयार झाले तर या आंदोलनांना




**ताजमहालमध्ये सरपंच**

**शंकर पाटील**

खुसखुशीत विनोदाआडून दर्शन घडवणाऱ्या वास्तवदर्शी ग्रामीण विनोदी कथा म्हणजेच 'ताजमहालमध्ये सरपंच'

**१००रु. पोस्टेज २०रु.**

दिशा मिळेल व त्यांची ताकदही वाढेल.

पाटकर म्हणाल्या की, नर्मदा आंदोलन हे विद्यापीठाप्रमाणे आहे. या आंदोलनाने नवीन आयाम समोर आले. सरदार सरोवराच्या पुनर्वसनाचाच हा प्रश्न नव्हता तर वर्ल्ड बँकेचा यातील हस्तक्षेप, पुनर्वसनात झालेला भ्रष्टाचार, विकासाची चुकीची नीती या सर्वांमुळे हे आंदोलन महत्त्वाचे बनले. अडवणुकीचे सर्व अनुभव या आंदोलनाने दिले. देशभरातून संवेदनशील उच्चशिक्षित तरुण या आंदोलनाला जोडले गेले. एक मोठे जनआंदोलन म्हणून यापासून प्रेरणा घेऊन अनेक कार्यकर्त्यांनी देशभर आंदोलने उभी केली. आदिवासींच्या लढ्याला मिळालेल्या या साथीने हे आंदोलन सक्षम झाले. श्रीराम लागू, नाना पाटेकर हेदेखील याचे हितचिंतक आहेत. आज या आंदोलनाचा अभ्यास अनेक विद्यापीठांत केला जातो. त्यावर अनेक लघुपट, चित्रपट निर्माणही झाले आहेत.

पाटकर म्हणाल्या की, समाजवादी विचारांच्या चळवळींमध्ये असणारा दुजाभाव आंदोलनाची ताकद कमी करते. म्हणूनच लवासा, आदर्श, जैतापूरसारखे प्रश्न तयार होतात. या समाजवादी चळवळींनी एकत्र येण्याची गरज आहे. नर्मदा आंदोलन आजही सुरू आहे. पुनर्वसनात झालेला पाचशे कोटींचा भ्रष्टाचार, लाभार्थींची संख्या व विकासाच्या नावाखाली अपयशी ठरलेल्या या प्रकल्पाविरोधी आजही लढा चालू आहे. संगवईचे योगदान हे अविस्मरणीय आहे. या आंदोलनाला शब्दबद्ध करणे, पुरावे गोळा करणे, नोंद ठेवणे, शासनाच्या विरोधात लिहिणे हे काम त्यांनी केले. आजही नर्मदा खोऱ्याने त्यांच्या आठवणी जपल्या आहेत.

### * 'शिंडलर्स लिस्ट'च्या लिलावाला मान्यता

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हिटलरच्या नाझी सैन्याचे घडवलेल्या वांशिक नरसंहारापासून सुमारे एक हजार ज्यूंचा बचाव करणाऱ्या ऑस्कर शिंडलर याच्या यादीच्या ('शिंडलर्स लिस्ट')च्या मूळ प्रतीच्या लिलावाला कोर्टाने मान्यता दिली आहे. शिंडलरच्या पत्नीची वारस असलेल्या मोर्टा रोझेनबर्ग हिने या लिलावाविरोधात कोर्टाकडे धाव घेतली होती. ही लिस्ट खोटी असल्याचा आरोपही तिने केला होता. गॅरी झिमेट या वितरकाने १३ पानी शिंडलर्स लिस्टच्या लिलावाचा घाट घातला होता. या यादीला लिलावात २० लाख डॉलर्स किंमत मिळण्याचा अंदाज आहे. या लिलावावर घातलेली तात्पुरती बंदी अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने उठवली. झिमेटने या निर्णयाबाबत आनंद व्यक्त केला आहे. या लिस्टच्या अन्य काही प्रती उपलब्ध असून त्या संग्रहालयांमध्ये आहेत. स्टीव्हन स्पिलबर्गच्या १९९३च्या 'शिंडलर्स लिस्ट' या ऑस्करविजेत्या सिनेमामुळे या लिस्टची आणि ज्यूंचा जीव वाचवण्याच्या शिंडलरच्या प्रयत्नाची जगभरात पुन्हा नव्याने चर्चा सुरू झाली. शिंडलर्स आर्क या थॉमस केनेलीच्या पुस्तकावर हा सिनेमा बेतलेला होता.

## * नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदी विलास सपकाळ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदी अमरावती विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. विलास सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कुलपती व राज्यपाल बी. शंकरानंद यांनी डॉ. सपकाळ यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केले. गेल्या काही महिन्यांपासून विद्यापीठाचे कुलगुरूपद रिक्त होते. विभागीय आयुक्त बी. व्ही. गोपाळ रेड्डी यांच्याकडे होता. प्रभारी कुलगुरूचा अतिरिक्त कार्यभार होता.

५० वर्षीय डॉ. विलास सपकाळ रातुम नागपूर विद्यापीठाला लाभलेले सर्वात तरुण कुलगुरू आहेत.

## * दुसरे दुर्गसाहित्य संमेलन

गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने आयोजित केले जाणारे द्वितीय दुर्गसाहित्य संमेलन यंदा ५, ६ फेब्रुवारी २०११ रोजी राजमाची किल्ल्यावर होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी इतिहास संशोधक डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांची तर स्वागताध्यक्षपदी केंद्र सरकारचे वैज्ञानिक सल्लागार रवींद्र अभ्यंकर यांची निवड करण्यात आली.

राज्यभरातील दुर्गप्रेमी, अभ्यासक, लेखक, गिर्यारोहक यांच्या सहभागातून तयार झालेल्या गो. नी. दांडेकर दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने सन २००९ पासून दरवर्षाआड दुर्गसाहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. यंदाचे हे दुसरे संमेलन लोणावळ्याजवळील राजमाची किल्ल्यावर आयोजित केले आहे. या संमेलनाचे उद्‌घाटन प्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांच्या हस्ते होणार आहे.

## * सोलापुरात विभागीय साहित्य संमेलन

''साहित्य म्हणजेच प्रकाश. प्रकाश जसा आगीतून निर्माण होतो अन् आग दाह देते अगदी त्याचप्रमाणे साहित्य हे देखील वेदनेचा दाह आणि आशेचा प्रकाश देण्याचे कार्य करते...'' असे प्रतिपादन गीतकार गुलजार यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या विभागीय साहित्य संमेलनात केले. उद्‌घाटन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले.

गुलजार म्हणाले की, अन्य भाषांमधील साहित्य चळवळीमध्ये चर्चासत्रे, परिसंवाद, मुशायरे आदी होत असतात; पण साहित्य संमेलनाचा उपक्रम हा फक्त मराठी साहित्यक्षेत्रातच आहे. ही संकल्पना खूपच सुंदर आहे. साहित्य संमेलन म्हणजे मला प्रकाशाचे झाड वाटते.

शिंदे म्हणाले, दलित, विद्रोही साहित्याने साहित्याच्या प्रेरणा बदलून टाकल्या. ख्रिस्ती-मराठी, मुस्लीम मराठी असे अनेक प्रवाह मराठी साहित्यात आले. त्यामुळे एकूणच मराठी साहित्य समृद्ध झाले आहे. विभागीय साहित्य संमेलनाचा उपक्रम

महत्त्वाचा आहे. यामुळे खेड्यातील बहुजनलेखक-कवींना संधी मिळते,

प्रा. निशिकांत ठकार यांनी साहित्याचे कार्य भावनात्मक नसून ज्ञानात्मक असल्याचे अध्यक्षस्थानावरून स्पष्ट केले.

*** महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे मराठी अभ्यासवर्ग**

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे मराठी भाषेचे प्राथमिक स्वरूपाचे अभ्यासवर्ग सुरू करण्यात येत आहेत. अमराठी भाषक आणि इंग्लिश मीडियम शाळा व कॉलेजचे विद्यार्थी यांना हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल. जानेवारी २०११ पासून हे वर्ग संस्थेच्या कार्यालयात सुरू होणार आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क - कार्यवाह, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, ११३३ सदाशिव पेठ, खुन्या मुरलीधर चौक, पुणे ३०. फोन नं. २४४७२२८०

*** उत्तम कांबळे यांच्यावरील माहितीपट**

''स्वत:बरोबर इतरांच्याही जगण्याला अर्थ दिला तर ते जगणे सार्थ आणि सुंदर होते. ही सर्जनशीलता अस्वस्थतेतूनच येत असते. उत्तम कांबळे यांच्या आतापर्यंतच्या जीवनपटात याची प्रचिती येते,'' असे मत रावसाहेब कसबे यांनी व्यक्त केले.

उत्तम कांबळे यांच्या जीवनप्रवासावरील 'अस्वस्थ नायक' या माहितीपटाचे प्रकाशन कसबे यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले, ''साहित्यिक, विचारवंत पत्रकार आणि कार्यकर्ता अशी कांबळे यांची कार्यकर्ता तीन रूपे पाहायला मिळतात. लोकांच्या जाणिवा प्रगल्भ करण्याचा उद्देश त्यांच्या साहित्यातून सफल होतो.''

श्री. कांबळे म्हणाले, ''मी लढलो तसे सर्वांनी लढायला शिकावे. सगळे लढले तर व्यवस्था बदलायला मदत होईल. मी कल्पना करून कधी लिहिले नाही. आयुष्य जगण्यातूनच मला विषय मिळत गेले. दु:खाला सजविण्यापेक्षा ते संपविण्यावर माझा भर असतो. माणसांचा द्वेष करण्यापेक्षा त्यांना जन्माला घालणारी समाजव्यवस्था बदलण्यावर भर दिला पाहिजे, अशी माझी भूमिका आहे.''

डीएसके डेव्हलपर्सचे डी. एस. कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार विजय बाविस्कर, गणेश जोशी, संजय भोकरी यांचीही या वेळी भाषणे झाली.

*** दुसरे महात्मा फुले मराठी साहित्य संमेलन**

सासवड (ता. पुरंदर) येथे अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे आयोजित दुसरे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन प्रा. मा. म. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

सशक्त भारताच्या निर्मितीसाठी अखिल मानव जातीच्या समानतेसाठी, दीनदलित, कष्टकरी, उपेक्षित, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी, सामाजिक जडणघडणीसाठी,

वंचित घटकांना शिक्षित करण्यासाठी साहित्यिकांनी फुले, शाहू, आंबेडकरी साहित्य निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. मा. म. देशमुख यांनी केले.

यावेळी स्वागताध्यक्ष आमदार विजय शिवतारे, संजय जगताप, इतिहास संशोधक नामदेव जाधव, शिवशाहीर गुलाब वळसे-पाटील, साहित्यिक बाबा सौदागार, रावसाहेब पवार उपस्थित होते.

प्रा. देशमुख पुढे म्हणाले, आजकाल समाजामध्ये विचारनिष्ठ माणसे आढळत नाहीत. सगळीकडे व्यक्तिनिष्ठता आली आहे. संकुचितपणा सोडण्याची गरज आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेची आवश्यकता आहे. संघटन म्हणजे शक्ती, संघटनेमध्ये शिस्त असेल तर ती महाशक्ती होते. केवळ पद, पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठेकरिता मिरवणाऱ्या लोकांना संघटनेमध्ये स्थान देऊ नका, कारण ते संघटनेचे विघटन करतात. नेत्याचे कार्यकर्त्यांवर बंधन असता कामा नये, तर बहुसंख्य कार्यकर्त्यांच्या मतांवर नेत्यांनी समाजकारण आणि राजकारण करावे.

*** प्रकाशन तंत्रज्ञानामधील नव्या बदलांची माहिती हवी**

अक्षरांचे सामाजिक परिवेश बदलेले आहेत, अनेक भाषांचा समावेश असलेली पुस्तके महत्त्वाची राहणार आहेत. त्यासाठी प्रकाशन तंत्रज्ञानामधील नव्या बदलांची माहिती आवश्यक आहे, असे डॉ. गणेश देवी यांनी नॅशनल बुक ट्रस्ट, मराठी प्रकाशक परिषद आणि पुणे विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी म्हटले. या वेळी मराठी प्रकाशक परिषदेचे कार्याध्यक्ष अरुण जाखडे, डॉ. मनोहर जाधव, नॅशनल बुक ट्रस्टचे संचालक सुमित भट्टाचार्य आदी उपस्थित होते.

अरुण जाखडे म्हणाले, ''परदेशी प्रकाशकांबरोबर स्पर्धा करण्यासाठी प्रकाशन व्यवसायाकडे नॉलेज इंडस्ट्री म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे.''

सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना डॉ. देवी यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. अनंत काळे, एस. के. बलकवडे, संभाजी चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.




## कर्वालो

**के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी** अनु. उमा कुलकर्णी

उडता सरडा! एक दुर्मिळ प्राणी! त्याच्या शोधयात्रेत विविध स्तरावरचे यात्री, निसर्गरम्य पार्श्वभूमीवरील सशक्त, जिवंत, रसरशीत, नर्मविनोदी लेखनशैलीतून साकारलेली कलाकृती

**१००रु. पोस्टेज २०रु.**

### * 'पक्ष्यांचे स्थलांतर' पुस्तकाचे प्रकाशन

'निसर्ग सेवक संस्था व इला फाउंडेशन'तर्फे 'मंगोलियाचा निसर्ग व पक्षी जीवन' या विषयावर पांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ. धैर्यशील शिरोळे, चंद्रसेन शिरोळे, डॉ. एम. एन. गोडबोले, सजग मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर, काशिनाथ पंडित उपस्थित होते.

डॉ. पांडे म्हणाले, ''बऱ्याच दिवसांपासून पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी पुस्तक लिहिण्याची इच्छा होती. ती आज पूर्ण झाली. 'पक्ष्यांचे स्थलांतर' हे पुस्तक माझे गुरू कै. प्रा. बाबूराव शिरोळे यांना अर्पण करत आहे.''

या कार्यक्रमात डॉ. पांडे यांनी मंगोलिया या देशातील निसर्ग, तेथील पक्षी जीवन यांची माहिती माहितीपटाद्वारे दिली.

### * चित्रकलेच्या माध्यमातून कवितेचा अनोखा प्रकार

प्रतिबिंब चित्रकलेचा वापर करून धीरज ठाणेकर तरुणाने साहित्य संमेलनात अनोखा कलाविष्कार दाखवला.

'मला लहानपणापासून चित्रकलेची आवड होती, एकदा टीव्ही बघत असताना मला प्रतिबिंब चित्रकलेची संकल्पना सुचली. दोन कविता एकत्र लिहून त्यातील एक कविता आरशात दिसेल, अशा पद्धतीने चित्र काढायचे मी ठरवले. सहा महिन्यांपूर्वी मी कामाला लागलो. यासाठी मला समान शब्दसंख्या असलेल्या कवितेची गरज होती. आमच्या कॉलेजचे प्रा. दामोदर मोरे यांनी मला करंदीकर यांच्या 'घेता' आणि 'माझ्या मना बन दगड' या दोन कविता घेण्याचे सुचवले,' असे धीरज म्हणाला.

### * आत्मचरित्रासाठी असांजला मिळणार ११ लाख पौंड

जागतिक राजकारणातील अमेरिकेच्या ढोंगीपणाचा बुरखा टराटरा फाडणाऱ्या विकीलीक्स या संकेतस्थळाचा जनक ज्युलियन असांज याला आत्मचरित्र लिहिण्यासाठी तब्बल ११ लाख पौंड मिळाले आहेत.

विकीलीक्सने अमेरिकेची लक्षावधी गोपनीय कागदपत्रे उघड करून जगभर प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. असांजला कसे आवरावे, या प्रश्नाने अमेरिकन प्रशासनाची झोप उडविली आहे. त्यातच स्वीडनमध्ये दोन महिलांवर बलात्कार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आल्याने हा अमेरिकेचाच डाव असल्याचेही आंतरराष्ट्रीय वर्तुळात बालले जात आहे. या पार्श्वभूमीवर असांजने आत्मचरित्र लिहिले तर ते दणक्यात खपेल हा साऱ्यांचाच होरा आहे. असांजला आल्फ्रेड ए. नॉफ या अमेरिकी प्रकाशनाने ८ लाख अमेरिकी डॉलर (५.१८ लाख ब्रिटिश पौंड) एवढी रक्कम देऊ केली आहे. तर 'कॅननगेट' ही ब्रिटिश प्रकाशक कंपनी सव्वा तीन लाख पौंड देणार आहे. अन्य मार्गांनी येणारे उत्पन्न धरता असांजला मिळणारी एकूण

रक्कम ११ लाख पौंडांच्या घरात जाते आहे.

असांज म्हणाला, वास्तविक मला पुस्तक लिहायचे नव्हते. परंतु पुस्तक लिहिणे मला भाग पडले आहे... विकीलीक्स हे संकेतस्थळ शाबूत ठेवायचे तर मला खटला लढवावा लागेल. आतापर्यंत माझे त्यासाठी २ लाख पौंड खर्च झाले आहेत.

विशेष म्हणजे असांज याच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठी 'व्हिसा' आणि 'मास्टर कार्ड' या दोन बलाढ्य क्रेडिट कार्ड कंपन्यांनी आपल्या मार्फत असांजला देणग्या मिळणार नाहीत अशी व्यवस्था केली आहे. आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था 'पे-पाल' अमेरिकेतील सगळ्यात मोठ्या 'बँक ऑफ अमेरिके'नेही विकीलीक्सचे आर्थिक व्यवहार बंद केले आहेत. या पार्श्वभूमीवर असांजला आत्मचरित्र लेखनातून मिळणाऱ्या रकमेची मोठी मदत होणार आहे.

### * 'गुरुजी' नावाच्या पोर्टेबल फळ्याची निर्मिती

भारतात साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्राथमिक शिक्षणाची नवीन वैज्ञानिक पद्धती वापरणे, ऐकणे, बोलणे आणि लिहिण्याच्या प्रक्रियेची उजळणी करणे यासाठी डाटाबाई इक्विपमेंट प्रा. लि. ने 'गुरुजी' नावाच्या पोर्टेबल फळ्याची निर्मिती केली आहे, असे जुगल गुप्ता यांनी सांगितले.

'गुरुजी' हा एक शिकवणारा फळा आहे. तो वाचणे, लिहिणे, संख्या, बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार सोप्या पद्धतीने शिकवतो. हा सौर ऊर्जेवर किंवा चार्ज होणाऱ्या बॅटरीवर चालतो.

हे यंत्र सध्या इंग्रजी, हिंदी, मराठी आणि गुजराथी या चार भाषांत उपलब्ध आहे. याची किंमत ४५०० रुपये आहे.

### * 'हिंदुस्थानची कैफियत' चा अनुवाद अन्य भाषांतही व्हावा

आपल्या पूर्वजांनी गेल्या शंभर-दीडशे वर्षांत केलेला त्याग व दाखविलेले अतुलनीय धैर्य आजच्या आणि उद्याच्या पिढीने विसरू नये, या अपेक्षेने विल ड्युरांट यांच्या 'द केस फॉर इंडिया' या पुस्तकाचा 'हिंदुस्थानची कैफियत' असा मराठी अनुवाद कल्याण वर्दे यांनी केला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ इतिहासकार निनाद बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर कल्याण वर्दे यांचे स्नेही शेखर नानिवडेकर, डॉ. राजाव देशमुख, अध्यक्ष निनाद बेडेकर व नीला वर्दे उपस्थित होत्या.

'हिंदुस्थानची कैफियत' हे पुस्तक वाचले असता आपला देश कल्याणकारी आणि सामर्थ्यशाली होईल, असे मत बेडेकर यांनी या वेळी व्यक्त केले.

हे पुस्तक लिहिण्याआधी भारत देशाची दारिद्र्यावस्था ड्युरांट यांनी स्वत: पाहिली व ती समजून घेतली. त्यांनी काही शहरांमध्ये, मोठ्या गावांमध्ये जाऊन

पाहणी केली. महात्मा गांधीजींबरोबर चर्चा केली. राजकीय, सामाजिक पुढाऱ्यांची भेट घेतली. भारतावर होणाऱ्या अन्यायाला तोंड फोडावे यासाठी हे पुस्तक लिहिले.

*** लेखकाने वाचकाच्या नजरेने जगाकडे पाहावे**

लेखकाने वाचकाच्या नजरेने जगाकडे पाहिले पाहिजे. वाचकाच्या नजरेने बघून केलेले लेखन लेखकाची लेखनशैली अधिक समृद्ध बनवते, असे प्रतिपादन कवी संदीप खरे यांनी केले.

डॉ. गोविंद काणेगावकर यांच्या 'इंग्लिश इंद्रधनुष्य' या कथासंग्रहाचे प्रकाशन गायिका अनुराधा मराठे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कॉन्टिनेन्टल प्रकाशनच्या देवयानी अभ्यंकर, विजया काणेगावकर, राम सातपुते आदी उपस्थित होते.

खरे म्हणाले की, 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या नियमानुसार जगात जितक्या व्यक्ती आहेत तितकी जगे आहेत. या सर्व व्यक्तींपर्यंत पोहोचून लेखकाने लेखन केले पाहिजे. अनुभव, वास्तव व जीवनशैली यावर लेखकाची लेखनशैली ठरत असते. सामान्यपणे लेखकाने सहज समजेल अशा भाषेत लिहिले पाहिजे.

*** 'फोटोग्राफी' ही जागतिक भाषा**

'फोटोग्राफी' ही संबंध जगाला कळणारी, समजणारी जागतिक भाषा आहे. सध्या अनेकजण ही भाषा बोलू पाहात आहेत. त्यामुळे ही भाषा वाढताना दिसत आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांनी शनिवारवाडा कला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केले. दिग्दर्शक योगेश सोमण, कवयित्री अरुणा ढेरे, छायाचित्रकार श्रीराम वेरणेकर आणि सेबॅस्टियन डिसोझा यांचा सत्कारही राजाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी समितीचे विजय काळे, ज्योत्स्ना सरदेशपांडे, 'पुण्यभूषण'चे डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

राजाध्यक्ष म्हणाले, ''फोटोग्राफी ही फ्रेंच सरकारने १८३९ मध्ये जगाला दिलेली देणगी आहे. त्यामुळे एक नवे पर्व सुरू झाले. महात्मा गांधी, पंडित नेहरू यांचा जीवनपट असो किंवा चंद्र कसा दिसतो, इतर ग्रह कसे दिसतात, अशी माहिती या कलेच्या माध्यमातून लवकर समजते. इतकेच नव्हे तर सध्याचे माहितीपट, मालिका, चित्रपट यांच्या मुळाशीसुद्धा हीच कला आहे.''

*** 'क्षितिजावरील अस्त' कादंबरीचे प्रकाशन**

''वृद्धाश्रम हे सामाजिक पातळीवरच्या जगण्यात अपरिहार्य झाले आहेत. त्यामुळे ते अधिक चांगले कसे होतील, स्वीकारण्यास योग्य होण्यासाठी काय करता येईल याचे दिग्दर्शन गोविंद गायकवाड यांनी आपल्या कादंबरीतून केले आहे,'' असे मत सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

पाध्ये म्हणाले, ''सामाजिक प्रश्न दूरचित्रवाणीच्या मालिकांमधून दाखविले जातात, पण तिथे त्यांचे खरे उत्तर मिळत नाही. वाचन, मनन, चिंतन यातून प्रश्नांचा बहुअंगी विचार करण्याची शक्ती मिळते. त्यामुळे अक्षरवाङ्मय चिरंतन आहे. गायकवाड यांनीही या कादंबरीतून उत्तरायुष्यातील घुसमट मांडली आहे.''

वैद्य म्हणाले, ''वृद्धांच्या जीवनात निर्माण होणारी भावनिक पोकळी कादंबरीत कलात्मक पद्धतीने गुंफली आहे. सामाजिक समस्या मांडणारी ही एक प्रेमकथा आहे.'' समाजात जे दु:ख दिसले, अनुभव आले त्याचे चित्रण कादंबरीत केले आहे, असे गायकवाड यांनी सांगितले.

*** 'थँक यू कॅन्सर'**

मुक्ता पब्लिशिंग हाऊसची 'थँक यू कॅन्सर' व 'शोध मनाचा' ही पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली. स्तंभलेखिका मेघा बजाज यांच्या 'थँक यू कॅन्सर' या पुस्तकाचा अनुवाद विजया पाटील यांनी केला आहे.

'शोध मनाचा' हा अभियंते मयूरेश कुलकर्णी यांच्या कवितांचा संग्रह आहे. महात्मा गांधी मिशन आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रवींद्र बापट यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

*** 'दमां'च्या पुस्तकांचे हक्क 'मेहता पब्लिशिंग'कडे**

ज्येष्ठ विनोदी साहित्यिक प्रा. द. मा मिरासदार यांची लोकप्रिय पुस्तके बाजारपेठेमध्ये सहजपणे उपलब्ध होत नाहीत हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या पुस्तकांच्या प्रकाशनाचे हक्क 'मेहता पब्लिशिंग हाऊस'कडे सोपवले आहेत. नव्या पिढीच्या वाचकांसाठी नव्या संचातील १८ पुस्तके उपलब्ध होणार आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांना 'माझ्या बापाची पेंड' हे पुस्तक हवे होते. त्यांनी चौकशी केली असता या पुस्तकासह मिरासदारांची बरीच पुस्तके उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. तेव्हा त्यांनी प्रसिद्ध अभिनेते रवींद्र मंकणी यांच्यामार्फत प्रा. मिरासदार यांच्याशी संपर्क साधला आणि पुस्तके नव्याने प्रकाशित करण्याची इच्छा प्रदर्शित केली.




## निसटलेले

**आशा बगे**

नात्यांना समजावून घेताना खूप काही 'निसटलेले'असते. जीवनाचे हे सूत्र मांडणाऱ्या कथा...

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

मेहता म्हणाले, ''एखाद्या लेखकाची पुस्तके उपलब्ध होत नाहीत याचा अर्थ त्याचे विस्मरण होते की काय, अशी भीती मला वाटली. ही पुस्तके नव्या पिढीपर्यंत पोहोचवावीत हा यामागचा उद्देश आहे. मिरासदार यांच्या बहुतांश पुस्तकांना ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांची मुखपृष्ठे आहेत. त्यामुळे उर्वरित पुस्तकांनादेखील नव्याने मुखपृष्ठे करून घेणार आहोत. 'मिरासदारी' आणि 'निवडक द. मा.' या पुस्तकांमध्ये त्यांच्या निवडक कथांचा समावेश आहे.''

'गाणारा मुलूख', 'मी लाडाची मैना तुमची', 'नावेतील तीन प्रवासी', 'माझ्या बापाची पेंड', 'चुटक्याच्या गोष्टी', 'गुदगुल्या', 'भोकरवाडीच्या गोष्टी', 'सरमिसळ', 'चकाट्या', 'हसणावळ', 'गंमत गोष्टी', 'जावईबापूंच्या गोष्टी', 'गप्पांगण', 'माकडमेवा', 'बेंडबाजा', 'खडे आणि ओरखडे', 'सुट्टी आणि इतर एकांकिका' आणि 'विरंगुळा' ही १८ पुस्तके फेब्रुवारीमध्ये उपलब्ध होणार आहेत.

### * 'लातूर महोत्सव'

लातूरकरांसाठी आनंदाची पर्वणी ठरणारा 'लातूर महोत्सव' १० ते १२ जानेवारी दरम्यान पार पडला. लातूर शहरात कला व संस्कृतीची चळवळ रुजवणाऱ्या या महोत्सवात चित्रपट, नाटके, संगीत, विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांची लयलूट होती.

पंडित उपेंद्र भट, पंडित शौनक अभिषेकी आणि संतूरवादक उल्हास बापट यांचे गायन व वादन तसेच कलापिनी कोमकली आणि भुवनेश कोमकली यांनी सादर केलेला कुमार गंधर्वांच्या जीवनपटावर आधारित कार्यक्रम हे या महोत्सवाचे खास आकर्षण होते. श्रीधर फडके यांचे गीतरामायण, सुनील मुंगी यांची गझल रजनी, अन्वर जानी संच यांची कव्वाली असे कार्यक्रमही झाले.

झी वाहिनीच्या मालिकांतील कलाकारांचा समावेश असलेला कार्यक्रमही झाला. अशोक हांडे, कैलाश खैर यांची रंगतदार 'माला नाइट' ही यावेळी रंगली. 'गेला माधव कुणीकडे', 'बाजीराव मस्त मी' अशी काही नाटके तसेच काही क्लासिक चित्रपटही दाखवण्यात आले. जादूचे प्रयोग, सत्यजित पाध्ये यांच्या बोलक्या बाहुल्यांचे प्रयोग, मॅरेथॉन, सायकल स्पर्धा यांनी या महोत्सवात रंग भरला.

### * मराठी कवितासमीक्षेवर राज्यस्तरीय चर्चासत्र

मुंबई विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख आणि कवितेच्या समीक्षेत महत्त्वाची भर घालणारे डॉ. वसंत पाटणकर जानेवारी महिन्यात विद्यापीठीय सेवेतून निवृत्त होत आहेत. त्यांच्या निवृत्तीचे औचित्य साधून चेंबूर येथील आचार्य मराठी महाविद्यालयात ७ जानेवारी रोजी 'कवितेची समीक्षा– काही परिमाणे' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्‌घाटन ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांनी

केले. 'आधुनिक समीक्षा सिद्धांत आणि कवितेची समीक्षा' या विषयावर डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांचे बीजभाषण झाले.

चर्चासत्रांमध्ये 'समकालीन मराठी कवितेचे साहित्यशास्त्र' या विषयावर प्रा. नीलांबरी कुलकर्णी, 'समकालीन मराठी कवितेचे समाजशास्त्र' या विषयावर प्रा. शैलेश औटी तसेच 'गेल्या अर्धशतकातील मराठी कवितासमीक्षा' या विषयावर प्रा. नितीन रिंढे यांनी निबंध वाचले. डॉ. मिलिंद मालशे, प्रा. दिगंबर पाध्ये, प्रा. ज्योतिका ओझरकर यांनी या सत्रांचे अध्यक्षस्थान भूषविले.

विद्यार्थी व मित्रमंडळाच्या वतीने पाटणकरसरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी 'कवितेचा शोध' या डॉ. वसंत पाटणकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. मौज प्रकाशन गृह आणि मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग यांनी संयुक्तपणे हे पुस्तक प्रकाशित केले आहे. डॉ. हरिश्चंद्र थोरात, प्रा. पुष्पा भावे व अनेक समकालीन कवी उपस्थित होते. प्रा. ज्योती रोटे या चर्चासत्राच्या समन्वयक होत्या.

### * विज्ञानाला उत्सवाच्या गर्दीतून बाहेर काढा

भारतात वैज्ञानिक संस्कृती रुजविण्यासाठी प्रथम विज्ञानाला उत्सवाच्या गर्दीतून बाहेर काढा, असे आवाहन नोबेल विजेते शास्त्रज्ञ वेंकटरमण रामकृष्णन यांनी केले.

सभा-समारंभ हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असले, तरी विज्ञानाला या उत्सवांमध्ये अडकवून आपण मूळ हेतूपासून दूर तर जात नाही ना याबाबत आत्मचिंतन करावे, असेही रामकृष्णन यांनी सायन्स कॉंग्रेसमधील बाल विज्ञान परिषदेचे उद्घाटन करताना म्हटले. सायन्स कॉंग्रेसचे औपचारिक स्वरूप आणि व्याख्यानांपेक्षा शास्त्रज्ञांभोवती गर्दी होणारी पाहून रामकृष्णन यांनी आपले परखड विचार मांडले.

'सत्कार, ओळख, समारंभ आदी औपचारिकतेमध्ये आपण विज्ञानासाठीचा किती मौल्यवान वेळ वाया घालवतो, याचा विचार आयोजकांनी करावा,' असेही त्यांनी नमूद केले.

'कोणत्या गोष्टींमुळे शास्त्रज्ञ होता येते यापेक्षा कोणत्या गोष्टी आपल्याला शास्त्रज्ञ होण्यापासून रोखतात हे ओळखा,' असा सल्ला देत रामकृष्णन म्हणाले, 'लहान मुलांना नैसर्गिकपणे पडणारे प्रश्न पाहिल्यास प्रत्येक मनुष्य हा मूलत: शास्त्रज्ञ असतो हे लक्षात येते. मात्र, पालक आणि शिक्षक त्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. तेथेच मुलांचे कुतूहल संपते आणि सर्व काही गृहीत धरण्याची प्रवृत्ती वाढते. यामुळे त्यांच्यातील शास्त्रज्ञही संपतो.'

'विज्ञानाला राष्ट्रीयत्वाच्या सीमेत अडकविण्याची चूक भारतीयांनी करू नये. शास्त्रज्ञांचे संशोधन संपूर्ण मानवजातीसाठी असते. माझे संशोधनही तसेच आहे,' असेही रामकृष्णन म्हणाले.

विविध विषयांतील तरुण संशोधकांना रामकृष्णन यांच्या हस्ते 'युवा शास्त्रज्ञ' पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील (एनसीएल) 'क्रॉसलिंक्ड एन्झाईम ॲग्रीगेट' या विषयावरील संशोधनासाठी डॉ. भालचंद्र वैद्य यांना २५ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला.

पुढील वर्षी होणारी सायन्स काँग्रेस महिला वैज्ञानिकांना प्रोत्साहन देण्यासाठी असणार आहे, असे २०१२ च्या काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या डॉ. गीता बाली यांनी सांगितले. त्या सध्या कर्नाटक महिला विद्यापीठाच्या कुलगुरू आहेत.

पुढील सायन्स काँग्रेस ३ ते ७ जानेवारी २०१२ या कालावधीत भुवनेश्वर येथे होणार आहे. भारतीय विज्ञान संशोधनात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम राबवण्याची गरज आहे असे डॉ. बाली म्हणाल्या.

### * वरदा प्रकाशनाद्वारे 'संपूर्ण साने गुरुजी योजना'

सानेगुरुजी लिखित ४६ पुस्तकांचा संच असणारी 'संपूर्ण साने गुरुजी योजना' वरदा प्रकाशनाद्वारे जाहीर करण्यात आली आहे. एक फेब्रुवारीला प्रसिद्ध साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांच्या हस्ते या समग्र संचाचे प्रकाशन करण्यात आले. या संचामध्ये सानेगुरुजी लिखित कादंबऱ्या, कथा, गोष्टी, काव्य, चरित्र, नाटके, तसेच इतिहास, राजकारण, तत्त्वज्ञान या विषयांवरील पुस्तकांचा समावेश आहे.

''अनेक वर्षांपासून साने गुरुजींच्या मुद्रित पुस्तकांचा 'समग्र संच' बनवण्याचा विचार होता. परंतु कॉपीराइट कायद्याच्या बंधनामुळे थांबावे लागले. रवी गायकवाड यांनी केलेल्या सहकार्यामुळे हा संकल्प पूर्ण करता आला. मुद्रित पुस्तके एकत्र करून पुनर्मुद्रित करण्याचा हा प्रयोग असून संपूर्ण संचाची किंमत साडेसात हजार आहे.'' असे प्रकाशक ह. अ. भावे म्हणाले.

### * राजवाडे यांच्या लेखणीत क्रांतिकारक मांडणी

व्यक्तीला तिचे स्वातंत्र्य प्राप्त झाल्याशिवाय तिचा विकास होऊ शकत नाही असे राजवाडे मानत असे प्रतिपादन प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांनी राजवाडे यांच्या ८४ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने भारत इतिहास संशोधक मंडळात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शोभना गोखले होत्या. चौसाळकर पुढे म्हणाले की राजवाडे यांना लोकशाहीवादी, स्वतंत्र लोकांचा, स्वत:चे स्वत्व जागृत झालेल्या लोकांचा नवा भारत हवा होता.

आमचे मराठी भाषिकांचे राष्ट्र येईल तेव्हा येणारे सरकार इतिहास संशोधनाला प्राधान्य देईल, असे राजवाडे म्हणत. परंतु सध्याचे सरकार इतिहास संशोधनाला कोणतीही मदत न करता फक्त इतिहासावर राजकारण करीत आहे, अशी खंत

चौसाळकर यांनी व्यक्त केली.

इंग्रजी भाषेच्या आधारावर राष्ट्राची निर्मिती करण्यास विरोध करून राष्ट्राला स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळाला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट सांगितले. देशातील प्रत्येक भाषिक प्रांत हा स्वायत्त राष्ट्र आहे आणि भारत हे राष्ट्र नसून तो राष्ट्रांचा संघ आहे असे मानणारे राजवाडे हे प्रादेशिक स्वायत्ततेचे व संघराज्य व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते, इंग्रजांच्या कामाची नक्कल न करता खऱ्या अर्थाने राज्याची निर्मिती करणे म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्याचा चिवट धागा कायम ठेवायचा असेल तर राज्यसंस्थेची निर्मिती करणे गरजेचे आहे. जोपर्यंत इंग्रज आपल्या देशावर राज्य करीत आहेत तोपर्यंत आपला विकास होणार नाही. त्यामुळे इंग्रजांना या देशातून हाकलून लावले पाहिजे, असे राजवाडे म्हणत.

*** थायलंडमधील कला महोत्सव**

अ. भा. सांस्कृतिक संघातर्फे थायलंडमधील बँकॉक येथे 'पत्रावादी थिएटर्स'च्या सहकार्याने दि. २५ व २६ डिसेंबर २०१० रोजी कला महोत्सव आयोजित करण्यात आला. या महोत्सवात प्राचार्य श्याम भुर्के यांचे 'रोल ऑफ लिटरेचर इन वर्क लाइफ बॅलन्स' या विषयावर व्याख्यान झाले. या महोत्सवात भारतातील ९ राज्यातील १८० प्रतिनिधी उपस्थित होते. अ. भा. सांस्कृतिक संघाचे हेमंत वाघ, मुख्य सचिव आणि रत्ना वाघ, अध्यक्षा यांनी महोत्सवाची धुरा यशस्वीपणे सांभाळली.

*** जगण्यासाठी आणि आनंदासाठी पुस्तके वाचा**

''इतर भाषांतल्या चांगल्या साहित्याचे अनुवाद मराठी साहित्यात व्हायला हवेत. यामुळे देशातले भाषा प्रेम वाढेल. एकमेकांच्या भावभावनांची साहित्यातून देवाणघेवाण होईल. भाषेचे आदानप्रदान व्हायला त्यामुळे मदत होईल. आज इंग्रजीतले साहित्य मराठीत अनुवादित होत आहे. हे योग्यच आहे. पण मराठीतल्या निवडक साहित्याचा अनुवाद इंग्रजीत होणे आवश्यक आहे. यामुळे एकमेकांच्या अधिक जवळ जाण्याच्या प्रक्रियेला वेग येईल.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक



**सांधा बदलताना**

**शुभदा गोगटे**

ब्रिटिश आमदनीत रेल्वेसेवा सुरू होण्याच्या काळात बडोदा संस्थानात झालेली राजकीय, सामाजिक उलथापालथ...

**२५०रु. पोस्टेज २५रु.**

आणि नाटककार शं. ना. नवरे यांनी ८४व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात ग्रंथप्रदर्शनाच्या खास व्यासपीठावर केले. २६ डिसेंबर २०१० रोजी शन्नांच्या हस्ते मेहता पब्लिशिंग हाऊसच्या १३ अधिक ६ अशा १९ पुस्तकाचे प्रकाशन झाले. साहित्य संमेलनात एका प्रकाशन संस्थेची एवढी पुस्तके प्रकाशित होण्याची ही पहिलीच घटना असावी.

अरुण शौरींचे आंतरराष्ट्रीय संबंधाबाबतचे पुस्तक वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का? (अनुवाद कॅप्टन राजा लिमये), ली चाइल्डचे नथींग टू लूज (अनु. उदय कुलकर्णी), डिजिटल फॉट्रेस (डॅन ब्राऊन, अनु. अशोक पाध्ये), सुगरणीचं विज्ञान (डॉ. बाळ फोंडके), एक दिवस (शोभा चित्रे यांच्या अकरा ललित लेखांचा संग्रह), वुमन ऑन टॉप (सीमा गोस्वामी, अनु. शोभना शिकनीस), द स्टार प्रिन्सिपल - रिचर्ड कोच (अनु. श्याम भुर्के), उधाण (गरीबीचं वास्तव दर्शविणाऱ्या हृदयस्पर्शी कथा - पांडुरंग कुंभार), एक आधुनिक युद्ध कथा - आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद (मायकेल हेस्टिंग्ज, अनु. अंजनी नरवणे), पानगळीच्या आठवणी (शोभा चित्रे), द मिसिंग रोझ (सरदार ओझकान, अनु. श्रीकांत परांजपे), इनसाईड दि गॅस चेंबर्स (संपा. जीन माउटापा, इं. अनु - एंड्र्यू ब्राऊन, मराठी अनु. सुनिती काणे), भावकल्लोळ (के. सत्यनारायण, अनु. प्रा. एन. आय कडलास्कर) ही पुस्तके यावेळी प्रकाशित झाली.

याशिवाय चिकन सूप फॉर सोलचे तीन भाग आणि Speeches that Re-shaped the World, Speeches of War and Peace, Awa Maru- the Titanic of Japan या सहा इंग्रजी पुस्तकांचेही प्रकाशन झाले.

कै. निषाद देशमुख प्रकाशन मंचावर यावेळी शन्नांबरोबर सुनील मेहता, रविप्रकाश कुलकर्णी आणि सुभाष इनामदार उपस्थित होते. मेहतांनी प्रकाशित केलेली उत्तम दर्जाची पुस्तके विकत घेऊन आपल्या पुस्तकांच्या कपाटात ठेवावीत असे त्यांनी आवाहन केले.

पुस्तक कशासाठी वाचायचे ते त्यांनी सांगितले... जगण्यासाठी आणि आनंदासाठी...

पुस्तके भेट द्या. त्यांना वेगळे अस्तित्व द्या. त्यांच्याशी बोला, त्यांना हाताळा, त्यांच्यावर प्रेम करा.

पुस्तक प्रकाशन समारंभात हिंमत पाटील (सांगली) आणि विनायक गोखले (ठाणे) या दोन वाचकांना एक हजार रुपयांची पुस्तके भेट देण्यात आली.

साहित्य संमेलनात साहित्यप्रेमी तर येतातच पण पुस्तके खरेदी करण्यासाठी, ती पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने नागरिक येत असतात; म्हणून प्रकाशनाची ही संकल्पना राबविण्यात आली.

* **सातारा ग्रंथ महोत्सव**

लेखनात जैववैविध्य राखणे आवश्यक आहे. मराठी भाषा संपन्न करणारा वाचक हा सजग आणि सहिष्णू होणे ही काळाची गरज आहे. हे काम ग्रंथ महोत्सवाच्या माध्यमातून अधिक सुकरपणे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांनी सातारा येथील जिल्हा परिषदेच्या मैदानावर आयोजित ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनावेळी अध्यक्षस्थानावरून केले.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या वेळी खासदार उदयनराजे भोसले, जिल्हाधिकारी संभाजी कडू-पाटील, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. ज्योती जाधव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मकरंद गोंधळी, शिक्षण सभापती ॲड भास्करराव गुंडगे, ग्रंथ महोत्सव समितीचे अध्यक्ष शंकर सारडा व्यासपीठावर होते.

डॉ. ढेरे म्हणाल्या, ''समाजात एक बाजूला नकारात्मक दृष्टीने अस्मितेचा वापर होत असताना सातारकरांनी ग्रंथ महोत्सवाच्या माध्यमातून विधायक अस्मिता जोपासली आहे. सातारकरांचे अनुकरण इतर जिल्हे करत आहेत. साहित्य संमेलनातील अनिष्ट गोष्टी टाळून विधायक जोपासण्याचे काम महोत्सवातून होत आहे. तुम्ही आम्ही जे पाहू शकत नाही, ते दाखविण्याचे काम पुस्तके करतात. वाचनामुळे व्यक्तिगत समृद्धता येते. समाज सुसंस्कृत बनतो. त्यासाठी गंभीरपणाने लेखन, वाचन करणारी माणसे निर्माण झाली पाहिजेत.''

प्रकाशकांकडून लेखकांचा वापर होऊ नये, याची दक्षता लेखकांनी घेतली पाहिजे. यासाठी वाचकांचीही जबाबदारी महत्त्वाची आहे, असे नमूद करून त्या म्हणाल्या, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत संस्कृतीचे वैविध्य नष्ट होत आहे. अशा काळात लेखकांनी मराठी संपन्न राखणे, लेखनातील जैववैविध्य राखणे गरजेचे आहे. आपण सर्वजण लेखक होऊ शकत नाही. मात्र, आपण चांगले वाचक निश्चित होऊ शकू.

उद्घाटक डॉ. सबनीस म्हणाले, ''ग्रंथ आणि ग्रंथ महोत्सवाच्या संकल्पनेचा परीघ प्रकाशक, वाचक, लेखकांपासून सुरू होऊन चोखंदळ समीक्षकांपर्यंत जाऊन भिडणारा आहे. ग्रंथांचे महत्त्व आणि मूल्य आजच नव्हे, तर माणसाच्या संस्कृतीच्या सुरवातीपासून कधीही न संपणारे आहे. ग्रंथ हे माता, पिता, गुरू आणि देव असतात. देवत्वाची कल्पना ग्रंथाच्या रूपाने मांडली जाते. पूर्णत्वापर्यंत पोचायचे असेल तर भक्ती, साक्षात्कार, योग या बरोबरच प्रेमाचा आणि ज्ञानाचा मार्ग महत्त्वाचा आहे. दूरचित्रवाणी संस्कृतीचे समाजाच्या सर्वच जीवनावर आक्रमण झाल्याचे दिसते, तरीही ग्रंथांचे महत्त्व टिकून असून लेखनही कमी झालेले नाही. ग्रंथात व्यासंग, विद्वानांची तपश्चर्या, मूल्यमापनाची ताकद आहे. वैचारिक आणि समीक्षात्मक ग्रंथांमध्ये प्रभाव टाकण्याची आणि चिरकाल टिकण्याची कुवत आहे. ई-बुक ही आधुनिक

संकल्पना आहे. दैनिके म्हणजे लहान ग्रंथच होत. या व्यापक संकल्पनेतून ग्रंथांकडे पाहावे.''

वाचन संस्कृतीत भेद निर्माण होत आहेत. वाचन संस्कृतीतील ध्येयवाद एकच असेल तर मानवी संस्कृती विकसित झाली पाहिजे. सांस्कृतिक लोकशाही गरजेची आहे. ती टिकण्यासाठी लेखकांचा विवेक जागा करावा लागेल. विद्वानांनी अनेक वेळा आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग अनिष्टप्रकारे केला आहे. इतिहास विकृतपणे मांडला आहे. असा विकृत इतिहास माणसांचे विभाजन करणारा आहे. त्यामुळे लेखकांना आता विवेकशील लेखणी चालवावी लागेल. नवोदित लेखकांची अवस्था दयनीय आहे. प्रकाशकांकडून त्यांचे जे शोषण होत आहे ते बंद व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आगामी काळात प्रत्येक जिल्ह्यात ग्रंथमहोत्सव व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करून खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, ''अलीकडे सर्वजण पोटासाठी नोटांच्या मागे धावत आहेत. मात्र, चांगले ज्ञान प्राप्त केले तर नोटा तुमच्या दारी चालत येतील. पाश्चात्य संस्कृतीचा शिरकाव आपल्याकडे होत आहे. त्यामुळे स्वसंस्कृतीचा विसर पडला तर आपली ओळखच राहणार नाही.'' या वेळी जिल्हाधिकारी संभाजी कडूपाटील, शिक्षणाधिकारी मकरंद गोंधळी यांचीदेखील भाषणे झाली.

### * ई-बुकचे रहस्य

कोणतेही पुस्तक संगणकावर वाचता येणे ही ई-बुकची मूळ संकल्पना आहे. ई-बुक सारख्या माध्यमामुळे पुस्तकांच्या अंतरंगात डोकावता येते. या माध्यमाचा उपयोग केल्यास वाचनसंस्कृती विस्तारित होऊन नवीन लेखक जन्माला येतील, असे प्रतिपादन माध्यमतज्ज्ञ मंदार जोगळेकर यांनी केले.

ग्रंथमहोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'वाचन संस्कृतीची बदलती माध्यमे' या विषयावर बोलताना पुस्तकाकडून ई-बुककडे हा प्रवास जोगळेकर यांनी प्रात्यक्षिकांसह उलगडून दाखवला. निवेदनाची सहजसोपी शैली आणि ई-बुकची सुलभ मांडणी करीत जोगळेकर यांनी उपस्थितांना खिळवून ठेवले. नाटककार योगेश सोमण यांनी जोगळेकर यांच्याशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले, मुद्रित साहित्य वाचण्याची प्रक्रिया संगणकावर करणे म्हणजे ई-बुक होय. या माध्यमाचा जगात झपाट्याने प्रसार होत असून येत्या दहा वर्षात ई-बुकमुळे विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझेही कमी होणार आहे. घरबसल्या आपल्याला आवडेल त्या पुस्तकाचा आस्वाद घेणे ई-बुकमुळे सहज शक्य झाले आहे. ई-बुकचा मूळ संदेश गो ग्रीन असा पर्यावरणपूरक आहे. या माध्यमाच्या वापरामुळे कागद निर्मितीसाठी होणारी वृक्षतोड टळणार आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृतीचा विकास होऊन नवीन लेखकांच्या सृजनशीलतेला वाव मिळणार आहे. अवघ्या ५००

रुपयांत नवोदित लेखकांना ई-बुकवर आपली साहित्यकृती प्रकाशित करणे शक्य असून जगभरातील वाचकांच्या प्रतिसादामुळे त्यांच्या मानधनातही वाढ होणार आहे.

मंदार जोगळेकर यांनी आयपॉडद्वारे दाखवलेल्या ई-बुकच्या प्रात्यक्षिकाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.


सातारा शहरातील विविध शाळांनी निबंध ई-बुकसाठी पाठवण्याचे आवाहन जोगळेकर यांनी केले. हे निबंध विद्यार्थ्यांनी माध्यमिक शिक्षण विभागाच्या eoecsal@gmail.com या मेलवर पाठवायचे आहेत. ई-बुकसाठी निबंध पाठवणाऱ्या १०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०१ रुपये तर पहिल्या तीन उत्कृष्ट निबंधासाठी ५००१, ३००१, १००१ अशी रोख बक्षिसे bookgangaa.com तर्फे देण्यात येतील असे जोगळेकर यांनी जाहीर केले.

*** 'नर्मदा परिक्रमा'ने नवी ऊर्मी दिली**

'' 'नर्मदा परिक्रमा'मुळे नर्मदा खोऱ्यातील नेमकी परिस्थिती समजावून घेता आली. सामाजिकीकरणाची नवी उर्मी आणि नवी भरारी घेण्याचे बळ 'नर्मदा परिक्रमा'मुळे लाभले,'' असे प्रतिपादन मध्यप्रदेशात बालमजुरांसाठी शैक्षणिक प्रकल्प चालवणाऱ्या भारती ठाकूर यांनी केले.

सातारा जिल्हा ग्रंथमहोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात भारती ठाकूर यांचे 'नर्मदा परिक्रमा' या विषयावर अनुभवकथन झाले.

ठाकूर म्हणाल्या, ''नर्मदा परिक्रमा सुरू केल्यानंतर एका वेगळ्या विश्वामध्ये जाणार आहोत, याची कल्पना आम्हालाच नव्हती. माझ्याबरोबर निवेदिता खांडेकर, उष:प्रभा पागे होत्या. परिक्रमा सुरू करण्यापूर्वी आम्ही जाणकारांशी चर्चा केली. अडचणी काय येतात, याची माहिती घेतली. या अनुषंगाने पुस्तकांचे वाचन केले. यापूर्वी परिक्रमा केलेल्यांशी चर्चा केली, त्यांचे अनुभव जाणून घेतले. यानंतर आमच्या मनातही एक प्रकारची उत्सुकता लागून राहिली होती. आम्ही तिघींनीही नर्मदेचा उगम असणाऱ्या अमरकंटकपासून परिक्रमेला सुरुवात केली. पहिल्याच दिवशी मुसळधार पाऊस झाला. निसर्गाचा अनुभव, विस्थापितांचे प्रश्न आणि


**मृत्युंजयी**

**रत्नाकर मतकरी**

वास्तव आणि त्या पलीकडचं वास्तव या सीमारेषेवर आपल्याला गुंतवून, मृत्युनंतरच्या गूढतेचा स्पर्श मानवी मनाला देणाऱ्या खास शैलीच्या गूढकथा...

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास हे आमच्या अभ्यासाचे आणि परिक्रमेचे मुख्य उद्देश होते.''

ठाकूर म्हणाल्या, ''परिक्रमा सुरू झाल्यानंतर आम्ही वेगवेगळ्या वाटेने मौनव्रत पाळत जात होतो. चालताना आमचा एकमेकींशी संवाद होत नव्हता. मौन धारण करून नोंदी घेण्याचे काम सुरू होते. १७७ पक्ष्यांच्या नोंदी आम्ही केल्या. शेकडो वनस्पतींच्या नोंदी केल्या. सायंकाळी मात्र एकमेकींना आपले अनुभव सांगत होतो. परिक्रमेच्या भटकंतीतून आम्हाला जगण्याची वेगळी ऊर्मी मिळाली. तेथील लोकांचे जनजीवन पाहता आले. त्यांच्याशी चर्चा करता आली. आता मी स्वत: आणि माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने या परिसरातील बालमजुरांसाठी शैक्षणिक प्रकल्प सुरू केला आहे. लेपा येथे १३२ बालमजूर सकाळी शिक्षण घेतात आणि दुपारनंतर ते मजुरीसाठी जातात. कारण त्यांना मजुरीशिवाय येथे पर्याय नाही.'' ठाकूर यांनी यानंतर या अनुभवावर लिहिलेल्या नर्मदा परिक्रमा या आपल्या पुस्तकाचीही माहिती दिली. (thakurbharati1@yahoo.com फोन नं. ०९५७५७६१४१)

### * अभिनयात सहजपणे खरेखुरे हसता येत नाही

अभिनय करताना सहज रडता येते. मात्र, खरेखुरे सहज हसता येत नाही, असे मत अभिनेते विजय कदम यांनी सातारा ग्रंथ महोत्सवातील प्रकट मुलाखतीत व्यक्त केले. महोत्सवाचे कार्यवाह शिरीष चिटणीस यांनी त्यांची मुलाखत घेतली. श्री. कदम यांच्या रंगभूमी आणि मोठ्या पडद्यावरील प्रवासात रमून जाण्यासाठी सातारकर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. एवढ्या कडाक्याच्या थंडीत नागरिकांनी गर्दी करणे यापेक्षा दुसरा कुठलाच मोठा पुरस्कार नाही, असे सांगत त्यांनी सातारकरांची मने जिंकली. ''लहानपणापासून अभिनयाची आवड होती. मुंबईतील गिरणगावात लहानाचा मोठा झालो. छोट्या चाळीतील छोट्या खोलीत वाढलो; पण त्या चाळ संस्कृतीत मिळालेले संस्कार आयुष्यभर पुरतील एवढे आहेत. माणसाला दोन क्षण सुखाचे, आनंदाचे हवे असतात. ते हसण्यातून मिळतात. ते मी देत राहिलो. 'टुरटुर' नाटकाने रंगभूमीला अनेक कलावंत दिले. त्या नाटकाला प्रथम गर्दी होत नव्हती पण नंतर ते रसिकांनी डोक्यावर घेतले. मी गंभीर भूमिका काही केल्या; पण निखळपणे हसवण्यात मला आनंद मिळत राहिला.''

दादा कोंडके यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य म्हणजे शिवधनुष्य आहे. दादांनी ते नाट्य करायचे थांबवल्यावर मी त्या धनुष्याला हात घातला. दादांच्या वेळी फक्त रेडिओ हे मनोरंजनाचे साधन होते. मी वगनाट्य करायला लागलो तेव्हा दूरदर्शन संच आले होते. त्याचा मला खूप उपयोग झाला. 'विच्छा'ने मला खूप काही दिले.'' या वेळी त्यांनी 'टुरटुर', 'विच्छा' करताना घडलेले विनोदी प्रसंग सांगितले. त्यानंतर श्री. कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विनोदी कार्यक्रमही सादर केला.

### * गडहिंग्लज येथे सानेगुरुजी कथामालेचे अधिवेशन

साने गुरुजींच्या संस्कारांमुळे आपण यशस्वी साहित्यिक झालो अशी प्रांजळ कबुली देत ज्येष्ठ लेखक मधु मंगेश कर्णिक यांनी साने गुरुजींनी सात्त्विकतेचा संस्कार समाजाला दिला असे अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेच्या गडहिंग्लज येथे घेण्यात आलेल्या अधिवेशनात सांगितले.

स्वागताध्यक्ष श्रीपतराव शिंदे यांनी स्वागत केले. कथामालेचा परिचय माजी आमदार गंगाधर पटणे यांनी करून दिला. प्रकाश मोहाडीकर यांनी देशात चिंतेचे वातावरण असतानाही कथामाला यशस्वीपणे चालवली जात आहे असे सांगितले.

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सद्य:स्थितीवर भाष्य करत बदलते राजकारण, अर्थकारण, जातकारण, धर्मकारण, हिंसाकारण या परिस्थितीत श्याम आणि श्यामची आई यांचा संवाद कसा असेल हे समाजासमोर आले पाहिजे असे म्हटले. ''जीवन सुंदर झाले पाहिजे यासाठीच गुरुजींनी लिखाण केले. साने गुरुजी कथामाला ही गुरुजींचा वारसा चालवत आहे. तिच्या प्रगतीसाठी काय केले पाहिजे याचा विचार आपण केला पाहिजे. समाज परिवर्तनासाठी संवेदनशील वर्ग लागतो. आजही मराठीत सक्षम बालवाङ्मय नाही. नव्या पिढीशी सुसंगत बालवाङ्मय आले तरच ते वाचले जाईल आणि आपला उद्देश सफल होईल.''

अधिवेशनाचे व कथामालेचे अध्यक्ष डॉ. गजानन कोठेवार यांचेही भाषण झाले.

यावेळी प्रकाश मोहाडीकर यांच्या 'माय माऊली साने गुरुजी' या पुस्तकाची आठवी आवृत्ती, अरविंद देसाई यांचे 'अरुणोदय', एकनाथ आव्हाड यांचे 'हसरे घर' आणि बालविकास मासिक याचे प्रकाशन करण्यात आले.

सकाळच्या सत्रात गिरिजा कीर यांच्या अध्यक्षतेखाली बालक मेळावा पार पडला. यात लालासाहेब पाटील, डॉ. दिलीप गरुड, मुकुंद तेलीचेरी यांनी भाग घेतला. कथाकथन व समुहगीत स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर सोमनाथ परब यांच्या मार्गदर्शनाखाली समूहगीत झाले.

'मुलांना हसू द्या, खेळू द्या' या परिसंवादात डॉ. शिवाजी रायकर, डॉ. एस. डी. पाटील, डॉ. मुजुमदार, डॉ. सुधाकर गोकाककर, डॉ. मु. ब. शहा यांचा सहभाग होता.

### * 'नेटाक्षरी'

केवळ कवितांना वाहिलेलं नेटाक्षरी हे ई-साप्ताहिक आहे. आकर्षक, रंगीत, चित्रमय आणि फुक्कट! २००८ साली हे मॅगेझिन सुरू झाले. याच्या प्रत्येक अंकाला एक अतिथी संपादक असतो. हे संपादक म्हणजे जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आपल्यासारखेच तरुण. या अंकाला जोडूनच 'स्वर नेटाक्षरी' हे ऑडिओ नियतकालिकही काढण्यात येते. यात प्रत्यक्ष त्या त्या कवींच्या तोंडून कविता

ऐकायला मिळतात. तसेच 'बाल नेटाक्षरी' हे इंटरनेट मासिक खास मुलांसाठी काढण्यात येते.

आपणही कवी होऊ शकतो, हे अनेकांना इथल्या कविता वाचूनच कळले. चांगले व्यासपीठ मिळाल्याने अनेकजण कविता करायला लागले! १९ डिसेंबर २०१० ला पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲम्फी थिएटरमध्ये इंटरनेटवरील कवींचा 'ई-वर्ले अक्षर' हा कवितांच्या मैफलीचा कार्यक्रम झाला.

*** जागतिकीकरणाच्या वाऱ्यातही मातृभाषा टिकून राहील**

मायबोली ही निवडुंगाच्या मुळासारखी घट्ट असून जागतिकीकरणाचे कितीही वारे आले तरी मातृभाषा मराठी टिकूनच राहील, त्याकरिता मनातील न्यूनगंड दूर करावा लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी १२व्या ग्रंथमहोत्सवाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून केले. यावेळी कवी सौमित्र उर्फ किशोर कदम, ग्रंथ महोत्सवाचे अध्यक्ष शंकर सारडा, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आनंदराव पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्याम देशपांडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, शिक्षणाधिकारी मकरंद गोंधळी, राजकुमार निकम, माजी शिक्षणाधिकारी उदयसिंह भोसले, प्राचार्य यशवंत पाटणे, प्रदीप कांबळे आदी उपस्थित होते.

समाजाला तसेच व्यक्तीच्या आयुष्याला दिशा देण्याचे काम ग्रंथ करीत असतात. आपली त्यागाची संस्कृती आहे. सध्या आपण चंगळवादी संस्कृतीमध्ये सापडलो आहोत. त्यातून बाहेर पडण्यासाठी ग्रंथ मदत करीत असतात, त्याकरता आपण ग्रंथाचे वाचन चिंतन करणे गरजेचे आहे. जगातील सगळ्या भाषा शिकल्या पाहिजेत. इंग्रजी ज्याप्रमाणे धनाची भाषा आहे, तशी मातृभाषा मराठी ही मनाची भाषा आहे, ती टिकवली पाहिजे, अशा या ग्रंथाचे धन टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे फादर दिब्रिटो यांनी सांगितले.

सातारा पॅटर्नचा ग्रंथमहोत्सव हा एक चमत्कारच आहे. नवीन वाचणारी पिढी या ग्रंथमहोत्सवातून घडत आहे. पुस्तकाचे प्रेम हे माणसासारखेच आहे, पुस्तके आयुष्य बदलवून टाकत असतात. असे कवी सौमित्र यांनी सांगतले.

लहानपणापासून वाचनाची आवड निर्माण झाली. जे जे मिळाले ते वाचून काढले, त्यामुळे तुमच्यापुढे इतक्या सहजपणे बोलत आहे, असे सांगून किशोर कदम यांनी 'पुस्तक आणि माणसं' ही कविता सादर केली.

*** साताऱ्यात मोडी लिपीतील कागदपत्रांचे प्रदर्शन**

सातारा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात ६ ते ११ जानेवारी या कालावधीत ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

इतिहास संशोधक मानसिंगराव कुमठेकर यांनी संकलीत केलेल्या मोडी कागदपत्रांचा या प्रदर्शनात समावेश होता. मराठाकालीन इतिहासाची राजलिपी असलेल्या व सध्या अस्तगंत होत असलेल्या मोडी लिपीतील शिववंशाची बखर, हणमंतस्वामींची बखर, थोरले माधवराव पेशवे यांचे पत्र, सावनूरच्या नबाबाचे पत्र, शिव व पेशवेकालीन हस्तलिखिते, पेशवेकालीन दुर्मिळ चित्रांचे नमुने, औंध, भोर, तासगाव, मिरज, सांगली, कोल्हापूर, जत, कुरुंदवाड, जमखंडी, रामदुर्ग या संस्थानांची कागदपत्रे, देवनागरी लिपीत मुद्रित झालेला पहिला भारतीय ग्रंथ प्राचीन-काळात लिहिण्यासाठी वापरण्यात येणारी भुर्जपत्रे व ताडपत्रे, मोगल व पेशवेकालीन नायकिर्नींची कागदपत्रे, राजर्षी शाहू महाराज व राजाराम महाराजांची कागदपत्रे, इंग्रज अधिकारी व स्वातंत्र्य लढ्यातील कागदपत्रे, इंग्रज गव्हर्नर, गेरॉल्ड, फियर, एडवर्ड वुडहाऊस, सर रिर्चड टेंपल, सर जेम्स फर्ग्युसन यांचे पत्रव्यवहार, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धातील कागदपत्रे पाहण्याची संधी इतिहासप्रेमी नागरिकांना मिळाली.

*** महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी साहित्य व समाजाचा समन्वय आवश्यक**

समाजातील वास्तव मांडण्यासाठी रामशास्त्री बाण्याचे लेखन होणे गरजेचे आहे. साहित्य व समाज यांच्यामध्ये अजूनही अंतर आहे. त्यांचा समन्वय होत नाही तोपर्यंत महाराष्ट्राच्या जडणघडणीवर परिणाम होणार नाही असा सूर ग्रंथमहोत्सवातील परिसंवादात निघाला.

'महाराष्ट्राच्या जडणघडणीतील साहित्यिकांचे योगदान' या विषयावरील परिसंवादात विजय कुवळेकर, प्रा. द. ता. भोसले, डॉ. विश्वास मेहेंदळे, शंकर सारडा व प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे सहभागी झाले होते.

विजय कुवळेकर म्हणाले, लेखक साहित्यातून विचार व जीवनशैली मांडत असतो. त्यामुळे तो प्रबोधनासाठी लेखन करेलच हे सांगता येत नाही. सध्याचे साहित्य हे भावभावनांना भडकविण्याचे काम करीत असल्याने ते वैचारिकता निर्माण करत नाही. ज्या साहित्यात स्वत्व, सत्त्व व तत्त्व जपले जाते अशा साहित्याचा प्रभाव समाजावर पडत असतो. नव्या विचारांना बळ देण्यासाठी साहित्यावर चर्चा




**आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान**

**निरंजन घाटे**

मानवाच्या जडणघडणीत नामशेष झालेला, आजच्या विज्ञान-तंत्रज्ञान युगाचा पाया असणारा कालौघात लुप्त झालेला अद्‌भुत शोधांचा अपूर्व खजिना...

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

द. ता. भोसले म्हणाले, वाचकांचे आत्मभान, आत्मज्ञान व आत्मविश्वास वाढविण्याचे काम साहित्य करते. स्वातंत्र्यपूर्व साहित्य मध्यमवर्गीयांच्या समस्या प्रकट करणारे होते. त्यानंतरच्या वास्तववादी प्रश्नांना व अन्यायाला वाचा फोडणारे साहित्य निर्माण झाले. दारिद्र्य, दैन्य, शोषण, अत्याचार, खाबूगिरी हे दुर्गुण, शासन व समाजव्यवस्थेतील त्रुटी दाखविण्याचे काम साहित्य व साहित्यिकांनी केले.

डॉ. विश्वास मेहेंदळे म्हणाले, गेल्या पन्नास वर्षांत अनेक समाज सुधारकांनी वास्तवतेवर आधारित लेखन केले. यानंतरचे साहित्यिक आपले हितसंबंध जपण्याच्या नादात किंवा दबावाला बळी पडून वास्तव लेखनापासून दूर झाले. साहित्यिकांनी महाराष्ट्रातील ज्वलंत व वास्तववादी प्रश्नावर लिहिण्याबाबत कच खाल्ली. साहित्य संमेलने हे कौतुक सोहळे झाले. अशा वातावरणात समाजमन ढवळून निघेल असे साहित्य निर्माण होणार का अशी शंका त्यांनी उपस्थित केली.

शंकर सारडा म्हणाले, समाजातील प्रश्न साहित्यातून पोडतिडकीने मांडले पाहिजेत, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी साहित्यिकांनी लेखणी वापरली पाहिजे. सामाजिक सुधारणांचे काम साहित्याने केले पाहिजे ही प्रबोधनपर भूमिका एकांगी ठरते. महाराष्ट्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटनांचे सम्यक दर्शन मराठी साहित्यात अभावानेच आढळते. तेवढ्या ताकदीचा लेखक कोणी दिसत नाही.

प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे म्हणाले, लेखक हा समाजमनाचा केंद्रबिंदू असतो. युगतत्त्वाचे भान असलेले साहित्य निर्माण होण्यासाठी साहित्यिकांनी प्रयत्न केले पाहिजेत. निर्भयता, व्यापकता व स्पष्टता असणारे साहित्य महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजवू शकेल.

शिरीष चिटणीस यांनी प्रास्ताविक केले.

### * माणूसपण हरवायचं नसेल तर संवाद जपायला हवा

अजैविक स्वरूपाची स्पर्धात्मक जीवनशैली... वाढती असुरक्षितता... वाढत चाललेले तणाव अन् त्यातच माणसांचे हरवलेले माणूसपण असा सूर कुटुंब व्यवस्था काल, आज, उद्या या परिसंवादातून व्यक्त झाला.

या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर, प्रसिद्ध लेखिका मेधा सिधये, मनोविकार तज्ज्ञ डॉ. प्रसन्न दाभोळकर, प्रकाश पायगुडे यांनी भाग घेतला होता.

आयुष्यातील वाढत्या अजैविक वेगावर यमाजी मालकर यांनी शब्दिक आसूड ओढले. ते म्हणाले, ''स्पर्धेचे युग असल्याचा कांगावा करीत आपण आयुष्याला अजैविक वेग दिला आहे. शरीराच्या व बुद्धीच्या मर्यादांचा विचार न करता यांत्रिक स्वरूपाचे बदल आपण लादून घेत आहोत. जीवाचा कोंडमारा होत असला तरी हा वेग कायम ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न प्रत्येकाकडून सुरू आहे. यातून असुरक्षितता

वाढत जाते. त्यासाठी विवेक, सोशिकपणा, समंजसपणा हवा आहे. जुनं ते सोनं म्हणायचं असेल तर मानवता जपायला हवी. वेग कमी करून जैविक स्वरूपाचं आयुष्याचं जगणं व नात्यामधला संकुचितपणा नष्ट करणं आवश्यक आहे.''

प्रकाश पायगुडे यांनी टी. व्ही. मालिका, तणावाची जीवनपद्धती यातून घरा-घरातील संवाद नष्ट झाल्याने कुटुंबव्यवस्था लयाला जाण्याची भीती व्यक्त केली. टी.व्ही. वरील मालिकांप्रमाणे आज प्रत्येक घरातील वातावरण विसंवादी होत आहे. वृद्धाश्रम व पाळणाघरे ही गंभीर बाब आहे.

स्वयंकेंद्रित वृत्ती बाजूला सारून इतरांचा विचार केला तरच आपण माणूस म्हणून अधिक चांगलं जगू, असे स्पष्ट मत डॉ. प्रसन्न दाभोळकर यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''कुटुंबसंस्था मोडकळीस येते तेथे आजारांचे प्रमाण वाढते. कुटुंब संस्थेवर अनेक ताण असतात. या व्यवस्थेतच समस्यांना सामोरे जाण्याचे बळ असते. प्रत्येक कुटुंबात लोकशाही पद्धतीची रचना आवश्यक आहे.''

मेधा सिधये म्हणाल्या, ''व्यक्ती, कुटुंब, राष्ट्र अशी एकसूत्रता असते. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीशी संवाद ठेवून कुटुंबावर संस्कार करण्याचे मोठे काम घरातील कर्त्या पुरुषाला पार पाडावे लागते. घरातील स्त्रियांनीच त्यांची घुसमट समजावून घ्यायला हवी. कुटुंबात संवाद हा महत्त्वाचा घटक असतो.''

*** मालेगावची चित्रपटसृष्टी**

'मालेगाव'ने म्हणजे मालेगावात तयार झालेल्या चित्रपटांनी शहराला जागतिक पातळीवर ओळख मिळवून दिली आहे. या चित्रपटांतून कलाकार कलेबरोबरच शहरात निर्माण होणाऱ्या स्थानिक वस्तूंची प्रसिद्धीही करतात. त्यातून चित्रपटाला नकळत आर्थिक हातभार लागतो. 'मालेगाव का सुपरमॅन' चित्रपटातून साबण, चहा, कोको, लुंगी आदी मालेगावच्या ब्रँडची जाहिरात करण्यात आली.

शहरातील कलावंत स्वत: पैसे जमा करून छंद म्हणून व्हिडिओपट निर्मिती करू लागले. एक चित्रपट तयार करण्यासाठी ६० हजार ते एक लाख रुपये खर्च येत असे. तथापि, चित्रपटाच्या यशाबद्दल खात्री नसल्याने पूर्वी जाहिराती मिळत नव्हत्या. तरीही अनेक चित्रपटातून येथील ब्रँडची कळत नकळत जाहिरात केल्याचे 'मालेगाव का सुपरमॅन' या चित्रपटाचे दिग्दर्शक नासिर शेख यांनी सांगितले. वस्तूंचे ब्रॅडिंग करतानाच राष्ट्रीय एकात्मतेचा संदेशही चित्रपटातून देण्यात आला. तसेच व्यसनांपासून दूर राहण्याविषयी प्रबोधन करण्यासाठी चित्रपटाचा वापर करण्यात आला. 'मालेगाव का सुपरमॅन' चित्रपटातील खलनायकाचा गुटखा विक्रीचा व्यवसाय असतो. गुटखा विक्रीवर बंदी असताना तो काळाबाजार करून आपले साम्राज्य वाढवतो. सुपरमॅन त्याला पोलिसांच्या हवाली करून त्याचे साम्राज्य उद्ध्वस्त करतो, असे चित्रपटाचे कथानक आहे.

'मालेगाव की शान' चित्रपटातून स्थानिक पातळीवर तयार होणाऱ्या साबणाची व लुंगीची जाहिरात करण्यात आली. 'यम्मा यम्मा' गाण्यावर लुंगी परिधान करून केलेला डान्स दाखविण्यात आला. याच चित्रपटातील 'जानू मेरी जान' गाण्याचे विडंबन करून 'जानू आ भी जाओ, टिकिया और पुलाव, जो भी बोलो सब मिलता है, ये है मालेगाव' हे गाणे चित्रित करण्यात आले. ते हिट ठरले. 'मालेगाव का डॉन', 'खानदेव का जैन्या' यांसह अनेक चित्रपटांतून स्थानिक खाद्यपदार्थांची प्रसिद्धी झाली.

'मालेगाव का मैं सुपरमॅन तुझे घुमाऊँ सारा गाँव', 'लूम पे चलता मालेगाव' या गाण्यांतून शहराची ओळख करवून देण्यात आली आहे. त्यात ऐतिहासिक भुईकोट किल्ला, मोसम पूल, महापालिका यांसह सर्व प्रमुख स्थळे दर्शविण्यात आली. यामुळे विविध खाद्यपदार्थ, ब्रँडची आणि संपूर्ण शहराची ओळख सर्वदूर करून देणारे 'मॉलिवूड' हे क्षेत्र ठरले आहे.

शहरातील काळा साबण प्रसिद्ध आहे. मुंबई-आग्रा महामार्गाला लागून त्याचे कारखाने आहेत. महामार्गावर प्रवाशांना कसमादेच्या डाळिंबाबरोबरच साबणाचे रचलेले मनोरे थबकण्यास भाग पाडतात. येथील चहा, कोको, भजी, अंडाभुर्जी, हाय फ्राय आणि अन्य मांसाहारी पदार्थ प्रसिद्ध आहेत. बाहेरील माणसाच्या जिभेवर त्यांची चव सतत रेंगाळत राहते. लुंगी सातासमुद्रापार केव्हाच पोचली आहे. चेन्नईच्या लुंगीशी तिची स्पर्धा सुरू आहे. यंत्रमागावर ग्रेबरोबरच पॉलिस्टर निर्मिती होते. येथील थंड दूध आणि मिठाईही प्रसिद्धी पावत आहे. भंगार बाजार, फर्निचर,प्लॅस्टिक गिट्टी व काळा पाइप यांची विक्री वाढल्याचे व्यापारी मान्य करतात.

### * कोल्हापूर ग्रंथ महोत्सव

ज्ञानाच्या प्रकाशाकडे जायचे असेल तर ग्रंथांकडे जायलाच हवे. पुस्तके, ग्रंथ आपल्या ज्ञानात भर घालतात. त्यामुळे त्यांना जवळ करा, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक यांनी कोल्हापूर येथे राजर्षी शाहू ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी केले. कर्णिक यांच्या हस्ते शिक्षण उपसंचालक दिनकर पाटील यांनी लिहिलेल्या 'ग्रंथ महोत्सव' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. प्रायव्हेट हायस्कूलच्या मैदानावर हा ग्रंथ महोत्सव १ ते ४ जानेवारी दरम्यान संपन्न झाला.

कर्णिक म्हणाले, ''महाराष्ट्र आता लिहू, बोलू आणि वाचू लागला आहे. अजूनही बहुजन समाज शिकला पाहिजे. शिकल्याने प्रगती होते, आज अनेक ठिकाणी साहित्य संमेलने भरत आहेत, पण या साहित्य संमेलनात साहित्यिक कमी असतात व इतरांची संख्याच जास्त असते. या संमेलनांवर प्रचंड पैसा खर्च होतो. तालुका व जिल्हा पातळीवर सध्या अनेक नवख्या साहित्यिकांकडून चांगली साहित्यिनिर्मिती

होत आहे. मनाला मळ लागू देऊ नका. नेहमी वाचन करा. माझ्यासारख्या वाया गेलेल्या मुलांचा कायापालट साहित्याने केला, इतकी जादू साहित्यात आहे. ग्रंथांकडे डोळसपणे पाहायला शिका.''

जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, ''प्रत्येक घरी टीव्ही आला आणि पुस्तके कमी झाली. आज शिक्षकही पुस्तके वाचत नाहीत. पुस्तकांना पर्याय नाही. वाचनालयातील पाने जीर्ण झालेली पुस्तके मला आवडतात; कारण अशी पुस्तके अनेकांनी वाचलेली असतात. पुस्तके जादूगार आहेत. पुढच्या चार वर्षांत पुस्तक विक्रीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात हॉल बांधण्यात येणार आहे.'' व्यासपीठावर डॉ. सुनीलकुमार लवटे, साहित्यिक चंद्रकुमार नलगे, डी. बी. पाटील, आर. डी. पाटील आदी उपस्थित होते. आभार चंद्रकांत गायकवाड यांनी मानले.

महोत्सवाच्या निमित्ताने ग्रंथदिंडी काढण्यात आली. या दिंडीत जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख, महापौर वंदना बुचडे, उपमहापौर प्रकाश पाटील, विशेष पोलिस महानिरीक्षक भगवंतराव मोरे, ग्रंथदिंडीचे प्रमुख आर. डी. पाटील आदींसह दहा हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

*** राज्य ग्रंथालय संचालकपदी दि. श्री. चव्हाण**

राज्य विधानमंडळ सचिवालयाचे ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी दि. श्री. चव्हाण यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाचे संचालक म्हणून निवड झाली. १९७६ ते ९० पर्यंत त्यांनी ग्रंथालय संचालनायामध्ये विविध पदांवर काम केले. १९९० मध्ये सरळ सेवेने राज्य विधिमंडळ सेवेत त्यांची नियुक्ती झाली.

*** मनोगत व्यक्त करण्यासाठी ऑनलाइन व्यासपीठ**

ज्यांना मराठी लिहिण्याची आवड आहे त्यांना मराठीतून आपले विचार व्यक्त करण्यासाठी एक ऑनलाइन व्यासपीठ आहे. http//www.manogat.com या साइटवर तुम्ही तुमचे लिखाण अपलोड करू शकता किंवा इतरांच्या लिखाणाबद्दल





## फरासि प्रेमिक

**तसलिमा नासरिन** अनु. सुप्रिया वकील

जीवनातल्या अनपेक्षित वळणांवर सुन्न करणाऱ्या प्रखर वास्तवाशी झगडणाऱ्या एका संवेदनशील स्त्रीच्या मनोवस्थांचं वेधक चित्रण...

**२२०रु. पोस्टेज २५रु.**

आपला अभिप्राय देखील व्यक्त करू शकता. या साइटवरून नवलेखक-कवी यांना प्रोत्साहन देण्यात येते.

*** ग्रंथ पुरस्कारासाठी आवाहन**

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित व बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोनातून १ जानेवारी २००८ ते ३१ मार्च २०१० या काळात प्रकाशित झालेल्या ग्रंथाला पुरस्कार देण्यात येणार आहे. अध्यक्ष डॉ. डी. एस. गायकवाड, सी. ३०, लोकसंगम विहार, न्यूडीपी रोड, औंध, पुणे ४११ ००७. (फोन : ०२०-२५८९९९७१) येथे संपर्क साधावा.

*** जागतिक मराठी संमेलन**

प्रत्येक भाषेत एक गाणं आहे आणि ते कळणं महत्त्वाचं आहे. ज्याला हे गाणं कळलं त्याला मातीचं मोल कळलं, अशा शब्दांत प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी मराठवाडी बोलीविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.

जागतिक मराठी संमेलन 'शोध मराठी मनाचा -२०११' या कार्यक्रमात मकरंद अनासपुरे आणि अमेरिकेतील उद्योगपती अविनाश राज माले यांना संजीव लाटकर, आशिष चौगुले, विष्णू सुर्या वाघ आणि दासू वैद्य यांनी बोलते केले. यावेळी बोलताना मकरंद अनासपुरे यांनी आपल्या आयुष्याची कहाणी सांगितली. ''माझा जन्म औरंगाबादेतील घाटी रुग्णालयात झाला आहे. त्यामुळे घाटी म्हणून घ्यायला मला लाज वाटत नाही. मी मराठवाडी बोलीत बोलतो त्यामुळे मला त्याचा आनंद आहे. कोणी संगमेश्वरी बोलीत बोलत असे तर त्याला त्याचा अभिमान असला पाहिजे. मी चित्रपटात वेगवेगळ्या भूमिकेसाठी वेगवेगळ्या भाषेत बोलतो. प्रत्येक भाषेत एक गाणे आहे आणि ते कळणं महत्त्वाचे असते.''

मुंबईतल्या आमदार निवासात काढलेले दिवस, मित्र आणि नातेवाईकांनी केलेली मदत याबाबत सांगताना त्यांनी जगणं, शिकणं महत्त्वाचं असून यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो. त्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते, असेही म्हटले.

*** आपटे वाचन मंदिरतर्फे उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कारासाठी आवाहन**

१ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१० या कालावधीमध्ये प्रसिद्ध झालेल्या मराठी साहित्यकृतींच्या (प्रथम आवृत्ती) या पुरस्कारासाठी आपल्या पुस्तकांच्या दोन प्रती कार्यवाह, आपटे वाचन मंदिर, राजवाडा चौक, इचलकरंजी जि. कोल्हापूर या पत्त्यावर ३१ मार्च २०११ अखेर पाठवाव्यात.

## 'द स्टार प्रिन्सिपल'चे प्रकाशन

'आपल्याकडे अनेकांना अजूनही इंग्रजी येत नाही. त्यांच्यासाठी इंग्रजी भाषेतले चांगले साहित्य मराठीत रूपातंरित केले तर फायदेशीरच ठरेल. अनुवादित साहित्य ही आजची गरज आहे. भाषांतरामुळे विश्व जवळ येते. त्यामुळे भाषांतराला प्रोत्साहन द्यावे.' असे आवाहन सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी केले.

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या 'द स्टार प्रिन्सिपल' या रिचर्ड कोच लिखित आणि श्याम भुर्के अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मुजुमदार यांच्या हस्ते १७ जानेवारी २०११ रोजी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झाले.

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध डीएसके उद्योगसमूहाचे डी.एस. कुलकर्णी, तसेच अनुवादक श्याम भुर्के आणि 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता उपस्थित होते.

डॉ. मुजुमदार म्हणाले, जगात ५३ टक्के साहित्य भाषांतरित असते. त्यातले भारतीय भाषांतून प्रकाशित होणारे नगण्य आहे. त्यातून मराठी भाषांतर होणे अधिक कठीण. आज भाषांतरित साहित्याची गरज आहे. भाषांतर करणाऱ्याला दोन भाषा येतात; म्हणजे तो दोन आयुष्ये जगतो. अनुवादकाला साहित्यिकांचे गुणही लागतात. भाषेची पत शब्दांत नसते; तर ती अर्थात असते. जगातले विविध विषय भाषांतरामुळे मराठीत येतील. भाषांतराचे महत्त्व मोठे आहे.

डीएसके समूहाचे संस्थापक आणि प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी यांनी असा सल्ला दिला की कुठलाही व्यवसाय पैशाकडे पाहून करू नका, त्यातून समाधान मिळणार नाही. प्रामाणिकपणा आणि आपला सकारात्मक




**'द स्टार प्रिन्सिपल' या पुस्तकाचे प्रकाशन शां.ब. मुजुमदार यांच्या हस्ते झाले. (डावीकडून) श्याम भुर्के, डी.एस. कुलकर्णी, सुनील मेहता**

दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. व्यवसायात ग्राहकांच्या खिशात हात घालू नका. त्यांच्या हृदयाला हात घाला, ''संधी ही अपॉइंटमेंट घेऊन येत नसते, ती कुठे, कधी येईल ते सांगता येत नाही. ती संधी घ्या. तिला प्रामाणिकपणे स्वीकारा. तुम्हाला नक्की यश मिळेल.''

अनुवादक श्याम भुर्के यांनी 'द स्टार प्रिन्सिपल' या पुस्तकात स्टार व्यवसाय शोधण्याचे ३२ मार्ग दिल्याचे सांगितले. तरुणांनी कुठला व्यवसाय करावा याचे मार्गदर्शनही या पुस्तकांतून मिळेल असे ते म्हणाले. जगामधले महत्त्वपूर्ण ज्ञान मराठीत आणण्याचे काम मेहता पब्लिशिंग हाऊस करीत आहे. तेही प्रकाशनव्यवसायातले 'स्टार' आहेत.

सुनील मेहता यांनी पाहुण्यांचा आणि अध्यक्षांचा परिचय करून दिला. अखिल मेहता यांनी मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन केले.

प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन विनिता आपटे यांनी केले.

❐


**सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

## मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे,
ही नम्र विनंती.

# नवं जग हवं पण गुलाम निर्माण करणारं नवं जग नको

**(ठाणे येथे झालेल्या ८४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या अध्यक्षीय भाषणातील अंश)**

मित्रहो, मी आज इथे आपल्यासमोर ज्यांच्यामुळे उभा आहे, त्या फुले-शाहू-आंबेडकरी परंपरेला सर्वप्रथम अभिवादन करतो. आपणा सर्वांनाही नमस्कार करतो.

मला माहीत आहे की, ज्या ठिकाणी मी उभा आहे तिथं पोचण्यापूर्वी ८३ अध्यक्षांच्या भल्यामोठ्या दिंड्या गेल्या. त्यांच्या लांबलचक सावल्या आणि त्यांची पाऊलचिन्हेही इथे दिसत आहेत. या सर्वांचा एक अनामिक सुगंध दरवळतो आहे इथं. या सुगंधामध्ये अनेक ऋषितुल्य माणसं आहेत. या सर्वांचा अभिमान वाटतो आहे मला. या सर्वांनी इथं आपल्या प्रतिभेच्या पंखांना मोकळं केलं होतं. मराठीचे पोवाडे गायले होते. तिच्या वाटचालीची चिकित्साही केली होती. तिच्या मार्गातील गतिरोधकही दाखवले होते. काहींनी जागल्याची भूमिका करीत आपल्या हातात लाल कंदीलही धरले होते. या सर्वांनी चाललेली वाट आणखी रुंद व्हावी... फुले, शाहू, आंबेडकरी, विद्रोही, ग्रामीण, स्त्रीवादी अशा सर्व वाटा तिथं घुमणारे एल्गार या वाटेवर यावेत... या वाटेनंही मोठ्या आनंदानं या सर्वांचं त्यांच्या एल्गारासह स्वागत करावं, असा माझा नम्र आग्रहही आहे. माझ्या प्रवासाचा प्रारंभ जग बदलण्याच्या घोषणांनी दुमदुमून गेलेल्या याच वाटांवरून झाला आहे, याचा मला गर्व वाटतो आहे.

आपल्या वाटचालीचं ८४ वं पाऊल टाकणारं हे संमेलन आता उत्तरआधुनिकतेत उभं आहे. त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणात कधी नव्हे एवढ्या मोठ्या आवाजात विज्ञान-तंत्रज्ञानाचे स्फोट होत आहेत. चंद्रावर-मंगळावर स्वाऱ्या करण्यासाठी माणसांच्या आणि यंत्रांच्या झुंडी एक-एक पाऊल पुढं टाकताहेत. जिवाचे क्लोन करण्यासाठीच्या अर्जाचाही जगाच्या कचेरीत ढीग साचतो आहे. सुपर सुपर एक्सप्रेस हायवेवरून जग धावतं आहे. शेषाच्या मस्तकावरचं हे जग, अण्णाभाऊंनी राबणाऱ्यांच्या तळहातावर आणलं आणि संगणकाच्या क्रांतीनं ते पडदा नावाच्या आपल्या छोट्याशा छाताडावर आणलं आहे. नवनवे शोध, संशोधन आणि प्रतिनिसर्ग बनवण्यासाठी माणसाच्या सुरू असलेल्या लढाया, या साऱ्यांमुळे जग चालण्याऐवजी धावत आहे. माणसं

धावताहेत... त्यांच्या गावांसह धावताहेत, तर काही जण गावं सोडून धावताहेत. तोंडातून फेस आणि आतडी बाहेर पडेपर्यंत धावताहेत... स्वप्नांसह धावताहेत... धावता धावता खाली पडणाऱ्या स्वप्नांचे तुकडे मुठीत घेऊन धावताहेत. प्रचंड वेगानं धावणारं आणि धावण्यालाच जगणं मानणारं असं एक आगळंवेगळं जग प्रथमच आपल्या अवतीभोवती अवतरलं आहे. मी स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या आणि सतत धावत अस्थिर होत असलेल्या जगाचा प्रतिनिधी आहे. नव्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या शेवटी आधुनिकतेत मीही उभा आहे. खरंतर मी स्वत:च एक नवं युग आहे आणि या नव्या युगानं निर्माण केलेली धगही आहे. या युगानं माझ्या हातातला कागद कमी कमी करीत आणला असला तरीही मोठ्या कष्टानं कागदाऐवजी काळजावर गोंदवलेले ओंजळभर शब्द घेऊन तुमच्यासमोर उभा आहे.

पृथ्वीच्या पाठीवर जेव्हा केव्हा नवे प्रवाह येतात, तेव्हा त्यांना पाठिंबा देण्यासाठी वा विरोधासाठी वेगवेगळ्या तत्त्वज्ञानांची, साहित्याची निर्मिती होत असते. रशियातला साम्यवाद जेव्हा कोलमडायला लागला होता, तेव्हा एन्ड ऑफ आयडिलॉजी (तत्त्वज्ञानाचा शेवट) हे डॅनियल बेल यांचं पुस्तक आलं. जगाला तत्त्वज्ञानाची आता गरज नाही, असं त्याचं म्हणणं होतं. पुढं जगाला तत्त्वज्ञानाचीच नव्हे, तर इतिहास-भूगोलाचीही गरज असणार नाही, असं सांगणारी अंताची (एन्ड) एक मालिकाच सुरू झाली. द एन्ड ऑफ हिस्ट्री ॲण्ड द लास्ट मॅन (इतिहासाचा अंत आणि शेवटचा माणूस)– फ्रान्सिस फुकुयामा, आय सायबर्ग - केवीन वारविक, द एन्ड ऑफ फेथ (श्रद्धांचा अंत) -सॅम हॅरिस, द एन्ड ऑफ सेक्स (सेक्सचा अंत) जॉर्ज लिओनॉर्ड असे अनेक ग्रंथ आले. आता सारं काही संपणार आणि जागतिकीकरणच शिल्लक राहणार, असा हाकारा दिला जात होता. जागतिकीकरणात फक्त बाजारपेठा आणि त्यातील वस्तू, नफा-तोटाच शिल्लक राहील, असं सांगण्यात येत आहे.

जग एका मोठ्या पेचप्रसंगातून जात आहे. या पेचप्रसंगात आपलं मराठी साहित्य कुठं उभं आहे, काय घेऊन उभं आहे, कसं उभं आहे आणि कोणासाठी उभं आहे हे पाहणं ओघानंच येत असतं.

आपल्या पर्यावरणात आज जगण्यासाठीच्या लढाईतून रोज हजारो माणसं बाहेर फेकली जात आहेत. काही आत्महत्या करत आहेत. स्पर्धेला घाबरून शालेय जीवनातच आत्महत्या करीत आहेत. काहींना मातेच्या गर्भातच मृत्यू मिळतो आहे. हे जग कुणाचं? जगणाऱ्याचं की मरणाऱ्याचं? विकासाचा दर डबल आकड्यात जातानाही मृत्यू आणि विकासाचा आकडा घसरतानाही मृत्यू, असं काहीतरी विलक्षण चित्र आपण सारेच पाहतो आहोत. जग बदलत असतं. हे बदलतच राहणार आहे; पण माणूसघाणं जगच निर्माण व्हावं हे काही बरोबर नाही. गुलाम जन्माला घालणारं नवं जग निर्माण व्हावं हेही काही बरोबर नाही.

आपण जागतिकीकरणाला विरोध करतो म्हणजे नेमकं काय करतो, हेही समजून घ्यायला हवं. आपला यंत्राला किंवा आधुनिकतेला विरोध नाही; पण त्यातून जन्माला येणाऱ्या नव्या विषमतेला आणि जीवघेण्या स्पर्धेला मात्र विरोध असायला हवा. तंत्रज्ञानाचा वापर करून जगणाऱ्या आणि हरणाऱ्या अशा दोन जाती तयार करण्याला विरोध असायला हवा. नवे गुलाम जन्माला घालण्याला आणि यंत्राच्या मदतीनं नवा वसाहतवाद तयार करायला आपला विरोध असायला हवा. आपलं साहित्य हे सारं मुकाटपणे, त्रयस्थपणे पाहत राहणार आहे की काही हालचाल करणार आहे?

**माणसाच्या जगण्याला जसं एक प्रयोजन असावं लागतं, तसं साहित्यालाही एक प्रयोजन असतं. आणि ते असायलाच हवं, यासाठी मी आग्रही आहे. साहित्याला प्रयोजनच नसेल तर त्यानं काय करायचं? प्रयोजन हेच साहित्याला चालायला, बोलायला, काही करायला लावतं. प्रयोजन म्हणजे साहित्याचा कणा. भूमिका म्हणजे कणा. कणा असलेलं साहित्य प्रभावी ठरतं. ते केवळ ओठांवरच गुणगुणत राहत नाही, तर काळजात प्रवेश करतं. हिंदोळे निर्माण करतं. लाटा निर्माण करतं. लाटा धडकायला लागल्या की व्यवस्था हलायला लागते. नवं जग, नवा माणूस यासाठीची ती हाक असते. माणसासाठी जागा करायची असेल तर साहित्याला भूमिका घ्यावीच लागते.**

अलीकडच्या दशकात अनेक दुर्दैवी घटना घडल्या. माणुसकीच्या झाडालाच माणसाची मुंडकी लटकण्याच्या घटना घडल्या; पण आपण स्वत:लाच प्रश्न विचारायला हवा की, त्यावेळी आपल्या साहित्याला भूमिका होती का? 'ग्लोबल वॉर्मिंग'च्या काळात सारी पृथ्वीच होरपळत असेल, करपत असेल तर आपल्या साहित्याची भूमिका कोणती असेल? स्त्रीचं मोठ्या गतीनं वस्तूत रूपांतर होत असेल तर भूमिका कोणती असेल? आणि खैरलांजी रोखण्यासाठी साहित्यिकांची भूमिका कोणती असेल? अनेकजण असं म्हणतील की, सारे प्रश्न निखळ कलेच्या आड येतील, पण मला त्यांची पर्वा नाही. कारण साहित्य माणसाच्या बाजूचंच आहे, यावर माझी निखळ श्रद्धा आहे.

जागतिकीकरण स्थिर झालं तेव्हा आपण काय पाहतो आहोत? विकासाचा दर वाढला. वस्तूंचं उत्पादन वाढलं. ज्ञान-तंत्रज्ञानाचा स्फोट झाला. हे सारं सारं खरं आहे; पण त्यातून एक वेगळाच समाज निर्माण झाला. विशिष्ट वर्गाचाच विकास वाढत राहिला. एकदिशा विकास होत राहिला. त्याचा लाभ घेणाराही विशिष्ट वर्ग तयार झाला. जुनी दु:खं कायम राहून नवी दु:खं तयार झाली. संस्कृतिसंघर्ष कमी होण्याऐवजी तो वाढला. धर्माच्या, देवाच्या नावानं जागोजागी स्फोट होऊ लागले.

कुणी टॉवर उडवलं, कुणी रेल्वे उडवली, तर कुणी मनुष्यजात उडवण्याचा प्रयत्न करतोय. अध्यात्माची एक प्रचड बाजारपेठ झाली. कोट्यवधी पुस्तकं आणि मोजता येणार नाही एवढी उलाढाल त्यातून बाहेर पडते आहे. मूलतत्त्ववाद गोंजारणाऱ्या फौजा तयार झाल्या. त्या समूहावर आणि शासनावरही हल्लाबोल करू लागल्या. मुंबई-मालेगावातही आपण असे हल्ले पाहिले आहेत. त्यात बळी गेलेल्यांच्या किंकाळ्या अजूनही आपल्याभोवती घुमत आहेत. नव्या व्यवस्थेनं वस्तूंची बाजारपेठ जशी वाढवली तशी अध्यात्माच्या बाजारपेठेलाही चालना दिली. अध्यात्मालाही नखं फुटली. त्यानं समाजाला आणि मूलभूत स्वातंत्र्यालाच कुरतडायला सुरुवात केली. कुणाच्या लेखनामुळे कुणाच्या भावना कधी दुखावतील आणि स्फोटाचं रूप घेऊन बाहेर पडतील, याचा नेम राहिलेला नाही.

साहित्यिकांच्या लेखण्यांवरही मूलतत्त्ववाद आक्रमण करत आहे. जगभरात अशा अनेक घटना घडत आहेत, घडल्या आहेत. जागतिकीकरणात संस्कृती संघर्ष कमी होतील आणि वैश्विक खेड्यात सारे गुण्यागोविंदाने नांदतील, असंही एक स्वप्न ठेवण्यात आलं होतं. भूगोल आकसेल, इतिहास अदृश्य होईल, तत्त्वज्ञान संपेल आणि संपर्क साधनांच्या जोरावर नवी क्रांती करणारा माणूस साऱ्या भेदाभेदांतून मुक्त होईल, असंही सांगण्यात येत होतं. प्रत्यक्ष तसं घडलेलं नाही. साहित्याला विचारांची, तत्त्वज्ञानाची मुळं असावी लागतात. वैचारिक साहित्य हे काम वर्षानुवर्षे करीत आलं आहे. पायाभूत वाटावं असं हे काम आहे. त्रिकोणातील पाया म्हणजे वैचारिक साहित्य असतं. उरलेल्या कोनाला ते ऊर्जा पुरवत असतं. गेल्या दशकापासून वैचारिक साहित्याचा दुष्काळ आपल्याकडं नजरेत भरावा इतपत जाणवत आहे. पूर्वी गावोगाव विचार करणारी मंडळी असायची. कोल्हापुरात तर अनेक महाविद्यालयांमध्ये प्लेटो क्लब, ॲरिस्टॉटल क्लब, सॉक्रेटिस क्लब मी पाहिले आहेत. भोवतालच्या गंभीर प्रश्नावर त्यात चर्चा होत असे. विद्यार्थ्यांना विचारांकडं झुकवलं जात असे. आता यापैकी काहीही महाविद्यालयांत आणि महाविद्यालयांबाहेर राहिलं नाही. विचार वाहून नेणारी नियतकालिकं आणि अनियतकालिकंही कमी होत आहेत. त्यातून आणि त्याबाहेर झडणाऱ्या चर्चाही कमी होत आहेत. मला वाटतं, विचारांचा आटणारा प्रवाह हे काही चांगल्या समाजाचं लक्षण म्हणता येणार नाही.

हे जे मांडलं, ते दृश्य आहे आणि ते का जन्माला आलं, याची कारणंही शोधलीच पाहिजेत. समाजाची वैचारिक भूक का कमी होते आहे आणि ती कोण कमी करतं आहे, हेही अशा संमेलनाच्या निमित्तानं शोधलं पाहिजे.

सार्वजनिक व्याख्यानमालांमधूनही वैचारिक, गंभीर विषय हद्दपार होऊ लागले आहेत. गंभीर बोलतो म्हणून त्याला बोलावलंही जात नाही. लोकांना हे असं गंभीर

का नको आहे आणि त्याला हास्य क्लब का जवळचे वाटू लागले आहेत? मी कोणी हास्य क्लबचा विरोधक नाहीये. हसण्याचं महत्त्व मान्य करूनही हा प्रश्न मी उपस्थित करतो आहे. लोकांना खरंच मनापासून हसायचंय, की स्वत:ला फसवण्यासाठीही हसायचंय हेही तपासायला हवं.

जागतिकीकरण, नवभांडवलशाही, नव्या स्पर्धा, लोकशाहीचा आणि सरकारचा संकोच, जगण्याचा संकोच आदी अनेक विषयांवर अपवाद वगळता आपल्याकडं अलीकडं फारसं लिहिलं गेलेलं आपल्याला दिसत नाही. वैचारिक साहित्य मागं पडणार असेल, तर मूळ साहित्याचं कुपोषण होईल. राजकारण, शिक्षण, अर्थकारण, पर्यावरण आदी नाना विषयांतून वैचारिक साहित्य फुलत राहिलेलं आपण सर्वांनी पाहिलं आहे. आता मात्र त्याची न परवडणारी अशी पानगळ चालू आहे. ती थांबायला हवी. वैचारिक साहित्याची घसरण कुणालाच परवडणारी नसते. त्यामुळे समाज मागंमागं जायला लागतो. साहित्यही मागंमागं जायला लागतं. वैचारिक साहित्य पुढं जाण्यासाठी ऊर्जा देतं आणि डोळेही देतं. समाजात सुरू असलेल्या आर्थिक बदलांमुळे नवे वर्ग किंवा समाजघटक तयार होत आहेत. विस्थापित, धरणग्रस्त, स्थलांतरित, प्रकल्पग्रस्त, सेझग्रस्त वगैरे वगैरे; अशी अनेक गावं सांगता येतील. विस्थापित झाल्यानंतर सामाजिक दर्जापासून त्याचे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. गावात जगता येत नाही म्हणून कायमचं स्थलांतर करणारे, अर्धस्थलांतर करणारे, वेगवेगळ्या कामांसाठी हंगामी स्थलांतर करणारे असे अनेकजण यांच्यात आहेत. सेझविरुद्ध लढणारे आहेत. स्थलांतर करणाऱ्यांचा प्रश्न जगभरातील साहित्यात दिसू लागला आहे. तो आपल्याही साहित्यात दिसायला हवा. हा जो नवा उपेक्षित वर्ग आहे, त्याच्या वेदनांना आपण शब्द द्यायला हवेत. गर्भातच मुलींची होत असलेली कत्तल, नव्या व्यवस्थेनं महिलांचं वस्तूत केलेलं रूपांतर, मोठ्या प्रमाणात जन्मास येत असलेल्या परित्यक्ता असे कितीतरी विषय साहित्यिकांना खुणावत आहेत. भांडवलशाही ही व्यक्तीला प्रचंड स्वातंत्र्य देत असतं, पण त्याचं प्रयोजन व्यक्तीपासून व्यक्तीला अलग करणं, माणसाचीच वस्तू करणं हे असतं. महिला आज नेमकं कोणतं स्वातंत्र्य मिळवत आहे आणि ती काय गमावते आहे, तिच्या आत्मसन्मानाचं काय होत आहे, हाही आजच्या आणि उद्याच्या कवितेचा विषय आहे.

आता थोडं मराठीविषयीही बोलू या. मराठी भाषेचं काय होणार? जागतिकीकरणाचा परिणाम तिच्या अस्तित्वावर कसा होणार, असे प्रश्न आहेत. संमेलनात आणि संमेलनाबाहेरही आपण त्याचा विचार करतो. शासनालाही साकडं घालतो. मुळात समाजच भाषा जन्माला घालतो. समाजच ती जगवतो आणि समाजच ती विकसित

किंवा अविकसित बनवतो. भाषेच्या संवर्धनात शासनाची भूमिका तर असतेच; पण त्याहून समाजाची भूमिका खूप मोठी असते. सरकार या भूमिकेला तांत्रिक मदत करत असतं. समाज म्हणून आज आपण मराठीकडं कसं पाहतो, हा विचार अतिशय महत्त्वाचा आहे. एखादी भाषा, व्यवहाराची, ज्ञानाची झाली, परिवर्तनाची झाली की ती सर्व प्रकारचे धोके पचवू लागते. काळाबरोबर ती चालू लागते.

व्यवहारात मराठी भाषेचा परीघ कसा वाढवता येईल, ज्ञानाचा कोष म्हणून तिच्याकडं कसं पाहता येईल हा विषय सर्वांत अधिक महत्त्वाचा आहे.

रस्त्यावर चालणारा व्यवहार, रस्त्यावर होत असलेले ज्ञान-विज्ञानाचे स्फोट यांच्याशी आपण आपल्या भाषेचं नातं जोडायला हवं. आपल्या हातात येणाऱ्या मोबाइलचा एक हँडसेट दीड-दोन हजार इंग्रजी शब्द आपल्याकडून पाठ करून घेतो. या नव्या शब्दांच्या संस्कृतीत आपल्याला घेऊन जातो. स्वाभाविकच मातृभाषेचा संकोच व्हायला लागला, असं आपल्याला वाटायला लागतं. खरं तर, लोकजीवन आणि व्यवहारात रूढ होणारे सर्व इंग्रजी शब्दही मराठीनं आत्मसात करायला हवेत. अन्य भाषा तसा प्रयत्न करीत आहेत. इंग्रजीनं तर तो कधीच सुरू केला आहे. लोकजीवनात मराठीचा जो वापर होतो आहे, त्याकडं आपण सोवळं नेसून न पाहता तेथील शब्दही मराठीनं आत्मसात करून स्वत:ला समृद्ध केलं पाहिजे. तसं घडायचं असलं, तर प्रमाण-अप्रमाणच्या चौकटी सैल केल्या पाहिजेत.

मराठी वाचणारा वर्ग कमी आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. अजूनही महाराष्ट्रात दरवर्षी दरडोई फक्त आठ-बारा रुपयांचीच ग्रंथखरेदी होते. विशेष म्हणजे एकीकडे लिहिणारा वर्ग वाढत असताना, वाचणारा वर्ग मात्र होत आहे. शहरातलं हे चित्र अधिक चिंताजनक आहे. अनुवादित पुस्तकं जास्त खपताहेत. हजारो पुस्तकं बाळगणाऱ्या शेकडो ग्रंथालयांचा सदस्यवर्ग कमी होतो आहे. या ग्रंथालयांना नवे सदस्य मिळत नाहीत आणि दुसरीकडे आहेत ते सदस्य टिकवून ठेवणं अवघड होतं आहे. ग्रंथालय सेवकांचे प्रश्नही गंभीर होत आहेत. महाविद्यालयातील बहुतेक वाङ्मय मंडळे मोडकळीस आलेली आहेत. उद्याचा साहित्यिक, उद्याचा वाचक घडवण्यासाठी प्रयत्न होत नाहीत. जे होतात, ते पुरेसे नाहीत. मराठी विभागाच्या कार्यक्रमाला अन्य विभागांतील मराठी विद्यार्थी येत नाहीत. आणखी किती कहाण्या सांगाव्यात? मराठी विषयात पदवी घेतली की आयुष्य वाया गेलं असं वाटतं. असं का होतं याचा विचार व्यवस्थेनं करायला हवा. विचार करत करत मुळाशी जायला हवं. तेथे तयार होणारी कारणं शोधायला हवीत. नुसतीच छाती बडवून, आक्रोश करून सुटण्यासारखा हा सोपा प्रश्न नाही.

आता थोडं आणि गांभीर्यानं महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाविषयी. हा प्रश्न

लवकरात लवकर सुटला पाहिजे आणि लाखो मराठी बांधवांना न्याय मिळाला पाहिजे, अशी माझी आग्रही मागणी आहे. गेली ६० वर्षे अशी मागणी या संमेलनाच्या व्यासपीठावरून होत आहे. बुलंद आवाजात ठरावही होत आहेत. प्रत्यक्षात हा प्रश्न सुटलेला नाही. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्रातील एकेकाळची बलदंड लोकेच्छा आणि राजकीय इच्छा आज कमी होताना आपण सर्व पाहात आहोत, ही दुर्दैवी गोष्ट आहे. एखादा प्रश्न दीर्घकाळ भिजत पडला की उदासीनता यायला लागते. तसं होऊ नये म्हणून लोकमताचा आणि लोकरेट्याचा जागर सातत्यानं सुरू ठेवला पाहिजे. राजकीय शक्तींवर आणि शासनव्यवस्थेवर दबाव आणला पाहिजे. मला वाटतं की, या प्रश्नावर महाकादंबऱ्या, महानाट्यं आणि सिनेमे जन्माला यायला पाहिजेत. मराठी बांधवांच्या संघर्षाचे पोवाडेही व्हायला पाहिजेत. मी स्वत: या प्रश्नाची होरपळ सहन केलेली आहे. हा प्रश्न न्यायालयात आहे, हे उत्तर आपण किती काळ देणार आहोत? न्यायालय म्हणजे प्रश्न लोंबकळत ठेवणारी खुंटी होऊ नये. मराठी भाषा महाराष्ट्रात टिकवण्याची आणि वाढवण्याची जशी गरज आहे, तशी ती महाराष्ट्राबाहेरही आहे. परिस्थिती कशीही असली, तरी भारतात सर्व प्रादेशिक भाषांमध्ये सर्वाधिक बोलली जाणारी मराठीसुद्धा एक प्रमुख भाषा आहे. हे सुखद वास्तव आहे. प्रश्न आहे तो, ते टिकवून ठेवण्याचा, वाढवत नेण्याचा. तिच्यासमोर येणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्याचा...!

❐


## T बुक क्लब १९

सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!

**टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित झालेली पुस्तके**

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद | किंमत |
|---|---|---|---|
| पिरॅमिड | टॉम मार्टीन | अनु. उदय भिडे | ३०० |
| सीविच | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २४० |
| नथिंग टू लूज | ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५० |
| डिजिटल फॉर्ट्रेस | डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४४० |

**टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके**

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद | किंमत (अंदाजे) |
|---|---|---|---|
| द असोशिएट | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ३०० |
| द गिफ्ट ऑफ रेन | टॅन ट्वॅन इंग | अनु. अशोक पाथरकर | ४०० |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने
'मेहता पब्लिशिंग हाऊस' येथे पाठवावी.

# दखल



## * जनस्थानाचे नवे मानकरी - महेश एलकुंचवार

मराठी साहित्यक्षेत्रात मानाचा समजला जाणारा, कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रेरणेने सुरू झालेला जनस्थान पुरस्कार यंदा नाटककार महेश एलकुंचवार यांना जाहीर झाला आहे. वाडा चिरेबंदी, युगान्त, आत्मकथा वगैरे नाट्यकृतींनी गाजलेल्या एलकुंचवारांच्या नाट्यक्षेत्रातील योगदानावर खरे तर सरस्वती सन्मान, नागभूषण पुरस्कार वगैरे पुरस्कारांनी यापूर्वीच शिक्कामोर्तब झाले आहे. मात्र त्यामुळे जनस्थान पुरस्काराचे स्वरूप आणखी एक पुरस्कार एवढेच राहते असे नाही. कारण कुसुमाग्रजांच्या आशीर्वादाची तुलना होऊ शकत नाही.

१९९१ मध्ये जनस्थान पुरस्कारांचा आरंभ झाला. पहिलाच पुरस्कार नाटककार विजय तेंडुलकर यांना मिळाला. त्यावेळी मी जनस्थान पुरस्कार समितीचा सदस्य होतो. तीनशेवर मान्यवर व्यक्तींकडून आलेल्या शिफारशींतून दहा नावांची शॉर्टलिस्ट तयार करण्याची पद्धत त्यासाठी अवलंबिण्यात आली होती. अंतिम निवड त्या नावांतून व्हावी अशी अपेक्षा होती. परंतु त्या पहिल्याच बैठकीत या प्रक्रियेवर काही सदस्यांनी आक्षेप घेऊन वेगळ्या पद्धतीने निवड व्हावी असा आग्रह धरला. चर्चेला वेगवेगळे फाटे फुटू लागले. निवडीचे काम नव्याने हाती घ्यायला हवे असे वातावरण निर्माण झाले. पुरस्कारामागची भावना लक्षात न घेता चर्चा चालल्याचे बघून मी 'ठरलेल्या पद्धतीनेच निवड व्हावी' अशी भूमिका घेऊन त्या शॉर्ट लिस्टमधील तेंडुलकरांच्या बाजूने कोणाची मते आहेत ते चिठ्ठ्या लिहून जाणून घेण्याचा मार्ग सुचवला. या सूचनेला डावलणे इतरांना शक्य झाले नाही. तेंडुलकरांच्या पारड्यात बहुमत पडल्याने त्यांची निवड झाली आणि हीच निवडीची प्रक्रिया पुढेही चालू राहिली.

जीवनगौरवाच्या स्वरूपाचा हा पुरस्कार असल्याने निवडीत ज्येष्ठ साहित्यकारांनाच प्राधान्य मिळणार हे स्पष्टच होते. त्यामुळे विजय तेंडुलकर, विंदा करंदीकर, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, गंगाधर गाडगीळ, श्री. ना. पेंडसे, नारायण सुर्वे, बाबुराव बागुल, ना. धों. महानोर यांना जनस्थान पुरस्काराद्वारे आपल्या वाङ्मयीन क्षेत्रातील

कार्याबद्दलचा ताम्रपटच मिळाल्याचा आनंद झाला असला तर नवल नाही. सत्तरीच्या जवळपास गेल्यावरच जनस्थानसाठी विचार होणार हा जणू अलिखित संकेतच आहे. खरे तर या वयात पुरस्कार मिळून फारसे काही साध्य होते असे नाही. पन्नाशीत असे पुरस्कार मिळाले तर लेखकाला नवे प्रयोग करायला, नवे अनुभवविश्व उभे करायला प्रेरणा आणि अवधी मिळू शकतो. तसे मी कुसुमाग्रजांना सुचवतही असे. परंतु 'जीवनगौरव' म्हणूनच हा पुरस्कार त्यांना अभिप्रेत होता.

या मान्यवर ज्येष्ठ साहित्यकारांमध्ये एलकुंचवारांचा समावेश होत आहे ही अभिमानाची गोष्ट आहे. तेंडुलकरांनंतर नाटककार म्हणून निवड होणारे एलकुंचवार हे दुसरेच नाटककार आहेत. नुकताच त्यांनी सत्तरीचा टप्पा पार केला आहे; तेव्हा जनस्थानची परंपरा सादर सांभाळली गेली आहे, हेही उघडच आहे.

महेश एलकुंचवार हे तेंडुलकरांनंतरचे एकमेव मराठी नाटककार असे आहेत की ज्यांची बहुतांश नाटके इतर भारतीय भाषांमध्ये आणि इंग्लिशमध्ये अनुवादित झाली आहेत, रंगभूमीवर आली आहेत आणि परभाषकांच्याही पसंतीला उतरली आहेत. ज्ञानपीठ किंवा सरस्वती सन्मान यासाठी एखाद्या लेखकाचा विचार केला जातो तेव्हा त्याच्या पुस्तकांचे अनुवाद परभाषांत झाले आहेत का आणि त्या भाषांमध्ये त्याच्यावर काही समीक्षात्मक लेखन झाले आहे का हा एक निकष असतो. परभाषांतील साहित्यिकांवर आणि साहित्यावर त्या अनुवादांचा काही प्रभाव पडला असेल, तर त्या लेखकाला अधिक वेटेज लाभते. अनुवादाद्वारे परभाषकांना ज्ञात असणारे लेखक हे राष्ट्र पातळीवरच्या पुरस्कारामध्ये अग्रक्रम मिळवतात.

महेश एलकुंचवार हे यवतमाळ जिल्ह्यातील पारवा येथील सरंजामदार जमीनदार घराण्यात जन्माला आले. (जन्म - ९ ऑक्टोबर १९३९). शिक्षणासाठी त्यांना बालवयातच शहरात राहावे लागले. वसतिगृहात राहिल्याने वाचनाचे वेड लागले. चित्रपटांचेही आकर्षण वाटले. इंग्लिश साहित्य हा विषय घेऊन त्यांनी एम.ए. केले. नंतर इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून धरमपेठ महाविद्यालयात काम करू लागले. नागपूरला रंगायनने सादर केलेल्या तेंडुलकरांच्या 'मी जिंकलो, मी हरलो' या नाटकाचा प्रयोग बघून त्यांना नाटकलेखनाची प्रेरणा मिळाली. सुरुवातीला एकांकिका लिहिल्या. महाविद्यालयात त्यांचे प्रयोग झाले. ते रसिक प्रेक्षकांना आवडले. त्यामुळे एकापाठोपाठ एक एकांकिकांचे लेखन झाले. सुलतान ही एकांकिका १९६७ साली सत्यकथेत प्रसिद्ध झाली. सत्यकथेच्या चोखंदळ वाचकांनी एलकुंचवारांच्या नाट्यप्रतिभेचे वेगळेपण जाणून त्यांना दाद दिली. 'सुलतान आणि इतर एकांकिका' (१९७०) आणि यातनाघर (१९७७) अशी त्यांची एकांकिकांची पुस्तके मौजने काढली. १९८६ साली रुद्रवर्षा हे नाटक प्रसिद्ध झाले. गार्बो (१९७३), वासनाकांड (१९७४) आणि पार्टी (१९७६) या त्यांच्या नाटकांनी विषयाच्या वेगळेपणामुळे

प्रेक्षकांचे आणि नाट्यक्षेत्रातील उपक्रमशील कलावंतांचे लक्ष वेधून घेतले.

'गार्बो' या नाटकाच्या नावानेच एलकुंचवारांनी प्रेक्षकांना खुळे केले.

गार्बो ही एक चित्रपट अभिनेत्री. तिच्यावर प्रेम करणारे तिचे तीन प्रियकर. हे तीन प्रियकर तीन वेगवेगळ्या मानवी स्वभावप्रवृत्तीचे प्रतिनिधी म्हणून आपल्यापुढे येतात.

श्रीमंत हा गडगंज संपत्तीचा धनी. संपत्तीचा रुबाब आणि चंगळवादी.

पँझी हा कविमनाचा. संवेदनशील, स्त्रीपूजक, सौंदर्यसक्त, हळुवार.

इंटुक हा भ्रमनिरास झालेला, आयुष्य हे निरर्थक, निरुपयोगी, निरुद्देशी मानणारा. शून्यवादी.

गार्बोच्या नखरेल, लहरी पण भुरळ घालणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने हे तिघेही पागल झालेले... गार्बो त्यांना खेळवते. आपल्या नखऱ्यांनी झुलवते. श्रीमंत गडगंज संपत्तीचा दिमाख मिरवतो खरा, पण त्याचे पुरुषत्व निष्प्रभ. गार्बोचा केवळ सहवास त्याला पुरेसा असतो. पँझी भाबडा. तिची खुळेपणाने पूजा करणारा. तिला बहीण मानणारा. इंटुक आत्ममग्न. गार्बोचे आकर्षण असले तरी तिच्या आशाआकांक्षांमध्ये त्याला स्वारस्य नाही. गार्बो त्या तिघांचीही वैशिष्ट्ये जाणते. त्यांना खेळवते. तिला हवे ते समाधान, तृप्ती मिळतच काही नाही. ते तिघे तिला जणू नष्ट निष्प्रभ करू पाहताहेत. ते तिघे तिला एकमेकांकडे ढकलत राहतात. त्यातच ती खाली पडते. तिच्या पाठीत सुरा खुपसलेला दिसतो. ते तिघे वेड लागल्याप्रमाणे हसत सुटतात. गार्बो ही सृजनाचे प्रतीक. हे तिघे वांझोटेपणाचे नमुने. गार्बोचा धक्कादायक पण प्रतीकात्मक शेवट. या नाटकात हाताळलेला विषय एकूण एलकुंचवारांचे नाटककार म्हणून असणारे सामर्थ्य प्रकट करणारा.

'वासनाकांड'मध्ये बहीण-भाऊ यांच्यातील शरीरसंबंधाचे आणि मानवी वासनेचे एक आदिम रूप दाखवले आहे. मूर्तिकार हेमकांत एका वाड्यात राहून नग्न स्त्रीदेहाच्या शिल्पाकृती तयार करू पाहतो. बहिणीचा सुडौल देह त्याला त्यासाठी आदर्श वाटतो. त्यात तो गुंतत जातो. ती गरोदर राहते तेव्हा तो हादरतो. तो लाकडी वाडा जाळून हे वासनाकांड संपवण्याचा निर्णय तो घेतो.

'पार्टी' हे नाटक मध्यमवर्गीयांच्या तकलादू नीतिबंधनांचे पोकळपण दाखवते. मुखवटे दूर करते. नैतिकतेच्या गप्पा मारणारे सारेच जण प्रत्यक्ष पेचप्रसंगाच्यावेळी बोटचेपेपणा करतात. शेपूट घालतात. कचखाऊ, नीतिकल्पनांचा भुसभुशीतपणा स्पष्ट करणारी.

'आत्मकथा' हे एका लेखकाच्या कलानिर्मिती प्रक्रियेवरील आणि व्यामिश्र व्यक्तिमत्त्वावरील नाटकही डॉ. लागूंच्या भूमिकेमुळे एक वेगळा अनुभव देऊन गेले.

वाडा चिरेबंदी, मग्न तळ्याकाठी आणि युगान्त या तीन नाटकांची त्रिवेणी,

त्रिनाट्यधारा, मराठीत अभूतपूर्व मानली जाते. या तिन्ही नाटकांचा सलग प्रयोग सहासात तास चालतो. तसा तो मागे सादर करण्यात आला. परंतु त्याचे प्रयोग गावोगावी करणे सोपे नाही. या तीन नाटकात मिळून पाच पिढ्यांतील एका मध्यमवर्गीय जमीनदार घराण्यात झालेल्या परिवर्तनाचे टप्पे स्पष्ट केले आहेत.

धरणगावकर देशपांडे या विदर्भातील ब्राह्मण कुटुंबाच्या माध्यमातून नातेसंबंधांचा आणि बदलत्या कुटुंबव्यवस्थेचा वेध घेण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'युगान्त' त्रिनाट्यधारेत केला गेला आहे.

कृषिप्रधान खेड्यातील चाकोरीबद्ध ग्रामीण जीवनाचे उद्ध्वस्तीकरण, परंपरेला जाणारे तडे हा पहिला टप्पा 'वाडा चिरेबंदी'मध्ये दिसतो.

अर्थप्रधान, सुखासीन शहरी जीवनात अर्थार्जनाला आलेले महत्त्व. त्यासाठी वापरण्यात येणारे अवैध मार्ग, त्यामुळे नैतिक कल्पनांबाबत व्यवहारात आलेला ढिलेपणा, नात्यांमधील तुटकपणा आणि दुरावा हा दुसरा टप्पा.

परदेशात गेल्यावर तेथील ज्ञानलालसा, समृद्धी, वैपुल्य यांचा पडणारा प्रभाव. त्या जीवनाचे वाटणारे आकर्षण, परंतु तेथे वैभवात लोळत राहूनही वाटणारे परकेपण, तुटलेपण आणि त्यातून भेडसावणारे वंशनाशाचे भय. मागे काय राहणार या विचाराने जाणवणारे आयुष्याचे व्यर्थपण...

या तीन टप्प्यांचे या तीन नाट्यकृतींद्वारे प्रभावी चित्रण झालेले आहे.

गेल्या साठ वर्षात भारतीय कुटुंबव्यवस्थेत आणि नीतिमूल्यांच्या, संस्कारांच्या चौकटीत घडून आलेले परिवर्तन या नाट्यत्रयीत दिसते. चिरेबंदी वाडा, ट्रॅक्टर, मेणा, दागिने, तळे, बुलडोझर, वाळवंट ही या नाट्यत्रयीतील प्रतीके नाटकाचा आशय अधिक गडद करतात. चंदू, पराग, सुधीर, अंजली, अभय ही पात्रे या बदलत्या टप्प्यांप्रमाणे बदलत जातात. पुंडाई करणारा पराग शहरात कुटुंबप्रमुख म्हणून आपले स्थान निर्माण करू पाहतो. गैरव्यवहारात अडकतो. कारावासातून सुटल्यावर तो तत्त्वचिंतक बनतो. ''सुख नाही, तळं नाही, हे शरीर, ही तडफड कशासाठी'' असा प्रश्न त्याला पडतो.

गेल्या दोन दशकातील सर्वोत्तम नाट्यकृती म्हणून 'युगान्त'चे नाव त्यामुळेच समोर येते.

एलकुंचवारांचे लेखन तसे मोजकेच. गार्बो, वासनाकांड, पार्टी हा पूर्वार्ध, आत्मकथा आणि युगान्त त्रयी हा उत्तरार्ध. आता नवे काही उपसंहारात्मक लेखन करायचे चिंतनमग्न एलकुंचवारांच्या मनात आहे का, हे त्यांनी अजून उघड केलेले नाही. पण तसे काही केले तर शिखरावर सोन्याचा कळस ठरेल.

**शंकर सारडा**

ई १०, पाटील रिजन्सी, हॉटेल कलिंगामागे, १५ एरंडवणे, पुणे ४११ ००४

फोन - ०२०-२५४२२२२३, ९८२३२६१०२३

# पुस्तक परिचय

**भरपूर पैसा आणि यश पाहिजे ना?**
**मग स्टार व्यवसाय निवडा**

# द स्टार प्रिन्सिपल




**रिचर्ड कोच** अनु: श्याम भुर्के

सध्याचे वातावरण ऐहिक समृद्धीचे आणि ऐश्वर्याचे कोडकौतुक करण्यात धन्यता अनुभवणारे आहे.

'फाइव्ह स्टार हॉटेल' म्हणजे खूप महागडे, वैभवसंपन्न हॉटेल. त्यात लाखो रुपये खचून पार्ट्या देणे किंवा लग्नाचे रिसेप्शन आयोजित करणे म्हणजे आपण सुपररिच श्रेणीत गेलो असे लोक मानतात.

'स्टार' हा उत्तम श्रेणीचा, श्रीमंतीचा, वैभवाचा निदर्शक मानला जातो.

तो केवळ हॉटेलच्या संदर्भात वापरला जातो असे नाही.

आज तो उद्योगधंद्यांच्या, उत्पादकसंस्थांच्या संदर्भातही वापरला जाऊ लागला आहे.

स्टार इंडस्ट्री म्हणजे भरपूर नफा कमावणारी, सतत प्रगतीच्या पथावर असणारी उत्पादन संस्था. फॅक्टरी, व्यवसाय.

स्टार इंडस्ट्रीतील नोकरी वा अधिकारपद म्हणजे भरपूर वेतन. भरपूर सुखसोयी. भरपूर चैन असे मानले जाते.

त्यामुळे आपल्याला स्टार इंडस्ट्रीमध्ये नोकरी मिळावी असे प्रत्येक महत्त्वाकांक्षी तरुणाला वाटत असले तर त्यात नवल नाही. परंतु स्टार इंडस्ट्रीमध्ये प्रवेश मिळणे सोपे नसते. त्यासाठी आपल्या अंगी अनेक कौशल्ये असावी लागतात.

अर्थात नुसती नोकरी मिळवणे - तीही स्टार इंडस्ट्रीमध्ये हे काहींना पुरेसे आव्हान वाटत नाही.

त्यांना नवीन स्टार इंडस्ट्री सुरू करायची खुमखुमी असते. तशी जिद्द आणि जिगर असते.

त्यांना सगळे जग म्हणजे आपले राखीव कुरण वाटते. त्यांना जागतिक पातळीवरही यश मिळवण्याची ओढ असते.

तुम्ही तशी काही आकांक्षा बाळगत असाल तर तुमचे अभिनंदन करायला हवे. तुमच्या आकांक्षांपुढे गगन ठेंगणे होईल.

त्यासाठी थोडी पूर्वतयारी मात्र करायला हवी. थोडा अभ्यास करायला हवा.

ही पूर्वतयारी करण्यासाठी सर्वांत उपयुक्त ठरणारे एक पुस्तक आहे. त्याचे नाव आहे **द स्टार प्रिन्सिपल**. ते लिहिले आहे रिचर्ड कोच या मॅनेजमेंट गुरूने.

स्टार प्रिन्सिपल, स्टार व्यवसाय ही कल्पना मांडून त्याने १० कोटीपेक्षा जास्त पौंड म्हणजे सातशे कोटी रुपये मिळवले. दि स्टार प्रिन्सिपल या पुस्तकाने अनेक महत्त्वाकांक्षी तरुणांना श्रीमंत बनण्याची प्रेरणा दिली. श्रीमंत बनवले. अल्प पगारावर आत्मसंतुष्ट असणाऱ्यांना खडबडून जागे केले. अंगात कौशल्य आहे, बुद्धिमत्ता आहे, नव्या कल्पनांचे भांडार जवळ आहे, मग कूपमंडूक वृत्ती कशाला? उठा, स्टार व्यवसाय शोधा. तुमची प्रतिभा वापरा आणि अफाट संपत्तीचे मालक व्हा असा

संदेश त्याने दिला.

त्या पुस्तकाचा मराठी अनुवाद नुकताच मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. अनुवादक आहेत श्याम भुर्के. बँक ऑफ महाराष्ट्रचे एक माजी उच्चाधिकारी.

'द स्टार प्रिन्सिपल'मध्ये प्रारंभीच 'स्टार म्हणजे काय?' हे स्पष्ट केले आहे.

स्टार व्यवसायाचे दोन विशेष असे:

१. स्टार व्यवसाय हा बाजारात सर्वांत पुढे असतो. अग्रगण्य असतो. त्या खास व्यवसायात तो नेता असतो.

२. स्टार व्यवसायाची दरवर्षी किमान १० टक्के वाढ व्हायला हवी.

नेतृत्व आणि खास व्यवसायातील वाढ हे दोन घटक एकत्र येतात तेव्हा स्टार व्यवसायाची प्रगती झपाट्याने होते. त्या कंपनीच्या उत्पादनाला त्या क्षेत्रातील चोखंदळ ग्राहकांची मागणी मोठ्या प्रमाणात येते. उत्पादन वाढल्याने उत्पादन खर्च कमी होतो. नफा वाढतो. बॉस्टन कन्सल्टिंग ग्रुपने व्यवसायाचे स्टार्स, प्रश्नचिन्ह, कॅश काऊज व डॉग्ज हे चार प्रकार केले.

'स्टार' म्हणजे प्रचंड वाढ असलेल्या बाजारातील नेते.

प्रश्नचिन्ह म्हणजे प्रचंड वाढ असलेल्या बाजारातील दुय्यम नेते, अनुयायी.

कॅशकाऊज व डॉग्ज हे कमी वाढ असलेल्या बाजारातील नेते व अनुयायी.

स्टार व्यवसायाची कल्पना १९६० पासून प्रचलित आहे, परंतु त्यावेळी इतर स्पर्धकांना मागे टाकून पुढे जायचे, व्यवसाय वाढवायचा हे धोरण उद्योजकांना फारसे रुचले नाही. पहिल्या क्रमांकाच्या नेत्याला मागे टाकण्यासाठी दुसऱ्या क्रमांकाच्या नेत्याने आपली सर्व शक्ती पणाला लावायची हे काम खर्चिक होते. ते जमले नाही तर प्रचंड नुकसान होणार हे स्पष्ट होते.

१९९५ मध्ये रिचर्ड कोच याने खास बाजारातील वैयक्तिक व्यवसायाच्या पातळीवर नव्या कल्पना मांडल्या. वाढ/हिस्सा तत्त्वाला नवे परिमाण दिले. त्यासाठी पुस्तक लिहिले. तरीही ही कल्पना समजून घेणारे लोक थोडेच मिळाले अशी त्याची भावना आहे. पण स्टार्सचा कल्पना फायदेशीर आहे असे त्याचे मत आजही दृढ आहे.

स्टार व्यवसायाची उदाहरणे म्हणून रिचर्ड कोच गुगल, ॲमेझॉन, नेटस्केप, ई-बे कंपनी, मायक्रोसॉफ्ट, इंटेल, कार्नेज स्टील, फोर्ड मोटार कंपनी, कोका कोला, मॅकडोनाल्ड, वॉलमार्ट, आयकेआ फर्निचर, यामाहा, होंडा, थ्री एम, ॲपल, आयपॉड, टॉइज आर अस, नाईके, डेल कंप्युटर्स वगैरे कंपन्यांचा उल्लेख करतो.

गुगलच्या स्थापनेला फक्त १२ वर्षे झाली आहेत. पण आज दररोज १० कोटी लोक गुगलवर विचारणा करतात. आजची तिची किंमत १२३ बिलियन डॉलर्स.

अॅमेझॉन ही ऑनलाइन पुस्तके विकणारी कंपनी. २००५मध्ये तिचे उत्पन्न ८.५ बिलियन डॉलर्स होते. गतवर्षी १३.५ बिलियन डॉलर्स झाले.

मायक्रोसॉफ्ट ही जगातली सर्वात मोठी सॉफ्टवेअर कंपनी २५ वर्षापूर्वी तिने स्टार नेतृत्व पटकावले. तिची उलाढाल ३०० बिलियन डॉलर्सच्या घरात आहे.

इंटेल ही सेमी कंडक्टर बनवणारी जगातील सर्वात मोठी कंपनी. पीसी मायक्रोप्रोसेसरमध्ये तिचा वाटा आज ८० टक्के आहे. सध्याचे उत्पन्न १५० बिलियन डॉलर्स.

स्टार व्यवसायाची कल्पना नीट समजली तर तुमचे आयुष्य बदलून जाईल असे रिचर्ड कोच म्हणतो.

स्टार व्यवसाय तुमच्या हाती पैसे देऊ लागतो.

तो तुमच्या उदारपणाला वाव देतो.

तो तुमच्या एकनिष्ठेची आणि कौशल्याची बूज राखतो.

तो इतर व्यवसायांच्या तुलनेत जास्त मोबदला देतो.

तो बढती देतो, बोनस देतो. समभागाचे मूल्य वाढत जाते.

तो बाजारात बदल घडवून आणतो.

तो तुमची गुंतवणूक अनेक पटींनी वाढवतो. तुम्हाला श्रीमंत करतो.

तुम्ही कर्मचारी असाल तर स्टार व्हेंचर कंपनीची निवड करा. वेगाने वाढणाऱ्या बाजारक्षेत्रातील हा व्यवसाय आहे याची खात्री करून घ्या. तिच्यात गुंतवणूक करा.

आनंद, वैयक्तिक प्रगती, उच्चपद, बढती, पैसा, शेअर्स व बोनस या सर्वच बाबतीत तुम्हाला फायदा घेता येईल.

तुम्ही गुंतवणूकदार वा उद्योजक असाल तर केवळ स्टार कंपनीत गुंतवणूक करा. लाभ होईल.

स्टार कंपनीचा शोध घेत राहा. प्रत्येक कंपनी स्टार कंपनी नसते.

स्टार कंपनी स्वत:चे क्षेत्र निर्माण करते. ते क्षेत्र लाभदायक ठरले की मग आश्चर्यकारक प्रगती करते. नेतृत्व मिळवते. बाजारात आपला जम बसवते. नव्या व्यवसायाला वाव देते, दरवर्षी किमान १० टक्के प्रगती करीत राहते. त्यापेक्षा कमी प्रगती/वाढ असेल तर ते क्षेत्र 'स्टार' राहात नाही.

अशा काही कंपन्यांची माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. काही कंपन्यांचे स्टारपद गेले, काही कंपन्यांनी ते पुनश्च मिळवले.

उत्पादनाचा दर्जा, वेगळेपण, जनसंपर्क, प्रसिद्धी, कालानुरूप धोरण यावर बरेच यश अवलंबून असते. आज तुमची कंपनी स्टार नसली तर उद्या ती होऊ शकते. वेगळे काही करून दाखवण्याची इच्छा, खर्चासाठी पैसा, जिवंतपणा, बाजाराचा वेध घेण्याची क्षमता, संकटाचे रूपांतर संधीत करण्याची कुशलता, योग्य त्या कार्यपद्धतीचा

अवलंब, यामुळे तुमचे स्टार चमकू लागतील.

स्टार कंपनी सुरू करण्यासाठी सात टप्पे पार करावे लागतात. त्यामुळे आपल्या स्टार व्यवसायासंबंधीची रूपरेखा स्पष्ट होऊ शकेल.

१. बाजाराची विभागणी करा.

२. वेगाने वाढणाऱ्या क्षेत्राची निवड करा.

३. खातेदार निवडा.

४. नव्या क्षेत्राची व्याख्या करा.

५. नफ्यातल्या फरकाची खात्री करून घ्या.

६. ज्या नव्या क्षेत्रात काम करावयाचे आहे त्याला नाव द्या.

७. तुमच्या क्षेत्राशी जुळणारे असे खास नाव तुमच्या खास व्यवसायाला द्या.

या सात टप्प्यांचा बेटफेअर, बेल्गो, मॅकडोनाल्ड, कोका कोला, यांच्या बाबतीत कसा वापर केला गेला त्याचा मागोवा आठव्या प्रकरणात घेतला गेला आहे

नववे प्रकरण 'तुमचा पहिला स्टार कसा निर्माण करायचा?' या शीर्षकाचे असून त्यात नवीन खास व्यवसायाचा शोध कसा घ्यायचा हे स्पष्ट करण्यासाठी थोडथोडक्या नव्हे तर तब्बल ३२ मार्गांचा ऊहापोह करण्यात आला आहे. त्यांची ही यादी आपल्याला प्रेरणादायक ठरेल.

१. आपल्याला हवे असलेले उत्पादन सध्या अस्तित्वात आहे की नाही हे शोधणे. ते अस्तित्वात नसेल तर उत्तम. लोकांची विशिष्ट गरज भागवणारे उत्पादन/ सेवाक्षेत्र गवसणे हा 'स्टार'चा पहिला यशोदायी टप्पा होय.

२. तुम्ही निवडलेल्या उत्पादन / सेवाक्षेत्राच्या मार्केटमधील चढउताराची माहिती मिळवणे.

३. तुमचे उत्पादन / सेवाक्षेत्र ग्राहकांना परवडणारे आहे की नाही?

४. नेहमीचे मार्केट विरुद्ध खास दर्जाचे मार्केट

५. मोठ्या प्रमाणावरचे उत्पादन विरुद्ध अल्प उत्पादन

६. व्यवहारी मार्केटमध्ये भावनात्मक मार्केट निर्माण करण्याची क्षमता

७. शक्तिवर्धक खाद्यपदार्थ विरुद्ध जंक फूड

८. सुरक्षित वाहन विरुद्ध वेगवान वाहत

९. नव्या उत्पादनाची शुद्धता आणि सोयीस्कर सुलभ उपलब्धता.

१०. वेळेची बचत किंवा आरामदायक निवांत खरेदी. उदा. फास्ट फूड आणि फॅमिली डिनर.

११. स्थिर की मोबाईल?

१२. सर्वांसाठी उत्पादन / सेवा की फक्त महिलांसाठी / मुलांसाठी?

१३. उत्पादन हे मर्दपणाला आवाहन करणारे की स्त्रीसुलभ कोमलता जपणारे आहे?

१४. उत्पादन हे आनंद वाढवण्यासाठी, उत्साह व खेळकरपणा खुलवण्यासाठी?

१५. पन्नाशी पार केलेल्या स्त्रीपुरुषांच्या विशिष्ट गरजा भागवणारी उत्पादने

१६. उच्च प्रतीची सेवा देणारी क्षेत्रे, वेगळ्या प्रकारची सेवा देणारी क्षेत्रे, स्वस्त-सुलभ सेवा.

१७. सेवेसाठी तज्ज्ञ व्यावसायिकाची गरज असणारी क्षेत्रे. कोणालाही स्वत: करता येणारी कामे.

१८. वस्तू व्यक्तिसाक्षेप की सर्वांसाठी?

१९. एकत्र सेवा देणारी उत्पादने / क्षेत्रे आणि स्वतंत्रपणे प्रत्येकाला सेवा देणारी, वापरता येणारी उत्पादने, साधने.

२०. अपेक्षित ग्राहक - तज्ज्ञ जाणकार आणि सर्वसामान्य, अल्पशिक्षित.

२१. उत्पादनाचा वापर करण्यासाठी एकच मध्यवर्ती केंद्र हवे की सर्वत्र किरकोळ केंद्रे हवी?

२२. वस्तूची संपूर्ण किंमत एकदम घ्यायची की हप्त्याहप्त्याने?

२३. आपले घर, आपले कामाचे ठिकाण आणि आपले विश्रांतीचे, करमणुकीचे ठिकाण यापैकी कोणत्या ठिकाणी कोणते उत्पादन वापरणे, उपयोगात आणणे अभिप्रेत आहे? त्या त्या ठिकाणी ते उत्पादन कसे उपलब्ध असेल?

२४. कार्यालयात बैठक घेणे इष्ट की कॉफी हाऊस किंवा हॉटेलमध्ये? (द्वितीय स्थान विरुद्ध तृतीय स्थान)

२५. यंत्र स्वत: विकत घ्यायचे, भाड्याने घ्यायचे की अंशत: मालकी तत्त्वावर घ्यायचे?

२६. व्यावसायिक ज्ञानाची गरज कमी-जास्त असणाऱ्या सेवा. ती देणारी माणसे तयार करणे.

२७. उत्पादनासाठी लागणारे घटक पुरवणारे पुरवठादार, त्यांच्या सेवेचे प्रकार.

२८. इंटरनेट सेवा - ऑनलाइन की ऑफलाइन?

२९. उद्योजकातील डावपेच. समर्थ शक्तिमान कंपनीचे शक्तिस्थान कमकुवत करण्याचे डावपेच.

३०. हरित मार्गाचा - पुन: प्रक्रियेचा वापर

३१. अन्य व्यवसायांकडून नव्या कल्पना स्वीकारणे.

३२. इतर ठिकाणांकडून नव्या कल्पना स्वीकारणे.

स्टार कंपनीच्या व उत्पादनाच्या स्वरूपाची छाननी केल्यावर निवडलेल्या उत्पादनाची किंवा सेवाक्षेत्राची प्रत्यक्ष उभारणी करण्याची कामगिरी आवश्यक ठरते. त्यासाठी स्टार कल्पनांची यादी करणे, भरपूर वाढीचा व्यवसाय निवडणे, आपले ग्राहक ठरवणे, नव्या व्यवसायाचे वेगळेपण स्पष्ट जाणून घेणे, नफा कसा वाढेल

याचे मार्ग शोधणे, नव्या व्यवसायाचे आकर्षक नामकरण करणे, नव्या उत्पादनाचे नवीन नाव ठरवणे वगैरे बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

नवीन स्टार व्यवसायाला यश मिळवण्यासाठी तीन घटक उपयुक्त ठरतात.

१. बाजारात जे उपलब्ध आहे त्यापेक्षा काहीतरी वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण असे ग्राहकांना मिळायला हवे.

२. ग्राहकांना काय हवे आहे ते समजून घेऊन ते आपल्या नवीन उत्पादनाद्वारे तुम्ही त्यांना देऊ शकता.

३. नवीन व्यवसाय हा नफा मिळवतो कारण बाजारात जे मिळते आहे त्यापेक्षा तुम्ही वेगळे काही देत आहात, त्यासाठी जादा आकार देण्याची ग्राहकाची तयारी असते. सध्या मिळत असलेल्या सेवेपैकी काही सेवा तुम्ही कमी करता, त्यामुळे उत्पादन खर्चात होणारी बचत ही तुमच्या नफ्यात भर टाकते. उदा. फास्ट फूड आऊटलेटनी वेटर्सची संख्या कमी करून सेल्फ सर्व्हिस सुरू करून खर्चात बचत केली.

दुसऱ्याच्या स्टार कल्पनेतूनही लाभ मिळवणे शक्य असते. अशा व्यवसायात शिरकाव करून घ्या. त्यासाठी त्या कंपनीशी संवाद साधा, त्या कंपनीशी व्यवहार वाढवा. त्या कंपनीला नवीन ग्राहक मिळवून द्या. तिच्यात भागभांडवल घ्या. त्या कंपनीच्या चालकांना त्या व्यवसायाचा पुरेपूर लाभ घेता येत नाही. अशी तुमची भावना असल्यास एक गट बनवा आणि कंपनीच्या खरेदीचे प्रयत्न करा.

दुसऱ्या स्टार व्यवसायात गुंतवणूक करून त्या व्यवसायाचे वैभव, नफा आणि आव्हान यात तुम्ही भागीदार होऊ शकता.

काही कंपन्या स्टार कंपन्या असल्यासारख्या वाटतात; परंतु त्या अपेक्षित वाढ वा नफा मिळवू शकत नाहीत. या कंपन्यांचे उत्पादन आपले वेगळेपण ग्राहकांच्या मनावर ठसवू शकत नाही. अशा कंपन्या या बनावट किंवा अपयशी स्टार कंपन्या होत. त्यातून वेळीच बाहेर पडणे इष्ट ठरते. बनावट स्टार ओळखणे आरंभी तरी अवघड असते परंतु काही काळातच त्याची लक्षणे दिसू लागतात. त्यातून भांडवल काढून घ्या. गळ्यात लोढणे अडकवून ठेवू नका असा स्पष्ट इशाराही रिचर्ड कोच देतो.

नवीनतेचे तीन सुवर्ण नियम रिचर्ड कोच सांगतो. हे नियम पाळण्यात कसूर करणाऱ्यांना यश मिळणे दुरापास्त ठरते.

१. एखादी गोष्ट उत्तम प्रकारे आणि वेगळेपणा जपत करीत राहणे यावर नवीनता अवलंबून असते. बाजारात उपलब्ध उत्पादनापेक्षा किंवा सेवाक्षेत्रापेक्षा तुमचे क्षेत्र आपल्या वेगळेपणामुळे ग्राहकांना अधिक आकर्षक वाटायला हवे.

२. तुमच्या नावीन्यपूर्ण कल्पनांमुळे प्रतिस्पर्ध्यापेक्षा तुमचे यश अधिक उठून

दिसेल. तुमचा नफा वाढत जाईल.

३. उत्कृष्ट नावीन्यपूर्ण कल्पनांमुळे अनेक उद्दिष्टे साध्य होतात. नवनवे प्रयोग करता येतात. होणारे बदल परिणामकारक व सकारात्मक असल्याने ग्राहक खूष होतात. तुमचा व्यवसाय वाढतो. नफाही वाढतो.

नव्या कल्पना समाजाला वा ग्राहकाला हितकारक असाव्या, अहितकारक नसाव्या असेही रिचर्ड कोच बजावतो ऑनलाइन गॅंबलिंगसाठी बेटफेअर या कंपनीने शर्यत किंवा खेळ चालू असताना बेट लावणे आणि टेलिफोनचा वापर करणे (टेलबेट) या दोन नव्या सुवर्ण कल्पना चालू केल्या आणि क्रांती घडवली. उत्पन्नात वाढ झाली. नफा वाढला. मार्केटिंगची यंत्रणा विस्तारली. पारंपरिक बुकमेकिंग व्यवसायाला मागे टाकले.

स्टार कंपन्यांतही चढउतार असतात. आजही स्टार कंपनी उद्या बिनस्टार होऊ शकते. मावळू शकते. तेव्हा अखंड सावधपण हवेच. 'व्यवसाय प्राथमिक अवस्थेत असताना तो स्टार आहे हे ओळखता यायला हवे. तो खास व्यवसायात नेतृत्व करणारा असावा. स्टारमध्ये जा. काम सुरू करा किंवा त्यात पैसे गुंतवा. नाहीतर स्वत:चा स्टार शोधा.' (१७६) असा सल्ला रिचर्ड देतो.

तुमचा स्टार शोधा. तो शोधता आला तर नशीब फळफळेल. सर्व ऐश्वर्य लाभेल हे नक्की!

**किंमत : १८०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**


**प्रिय वाचकमित्रहो........**


आपल्या सोयीसाठी
**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
आठवड्याचे सातही
दिवस नियमित सुरू राहील.
वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०
रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

# पुस्तक परिचय

## सागरातील एका महाकाय तेलविहिरीवरून उद्भवलेले आंतरराष्ट्रीय वादळ

# सीविच




**ॲलिस्टर मॅक्लीन** अनु. अशोक पाध्ये

ॲलिस्टर मॅक्लीन या बेस्टसेलर अमेरिकन लेखकाचे नाव घेतल्यावर द गोल्डन गेट, द डार्क क्रूसेडर, द लास्ट फ्रांटियर, द सटन बग, पपेट ऑन ए चेन, दि गोल्डन राँदेव्हू, फिअर इज द की वगैरे रोमांचकारक कादंबऱ्यांचे मराठी वाचकांना स्मरण झाल्याशिवाय राहणार नाही, कारण ही सर्व पुस्तके टी-बुक क्लबद्वारे मोठ्या प्रमाणावर वाचकवर्गापर्यंत पोचलेली आहेत.

ॲलिस्टर मॅक्लीनच्या थरारकथांची पार्श्वभूमी खूपच अनोखी आणि वैशिष्ट्यपूर्ण असते. सॅन फ्रॅन्सिस्कोचा सुप्रसिद्ध गोल्डन गेट ब्रिज पार्श्वभूमीसाठी वापरून विलक्षण कथावस्तूचा डोलारा उभा करणे यासारख्या अफलातून आयडिया खुलवण्यात मॅक्लीनचा हातखंडा आहे. वाचकांना तो कथावस्तूतील गुंतागुंतींमध्ये पूर्णतया जखडून टाकतो आणि एकापाठोपाठ एक धक्के देत जातो. त्या घटनांमधील रहस्यांनीही वाचक चक्रावून जातो. १९५५ पासून १९८७ पर्यंत २८ कादंबऱ्या त्याने लिहिल्या, त्या सर्व बेस्टसेलर ठरल्या.

सीविच ही त्याची कादंबरी नुकतीच मराठीत आली आहे. हे नाव जरा वेगळे वाटते. पण त्यात सी (समुद्र) आणि विच (चेटकीण) हे दोन शब्द आहेत. ही फोड केली तर समजायला अगदी सोपे जाईल.

सीविच म्हणजे सागरी चेटकीण. समुद्र चेटकीण.

या कादंबरीत हे नाव एका तेलविहिरीचे आहे. ही तेलविहीर मेक्सिकोजवळच्या समुद्रातील आहे, आणि ती वर्थ हडसन ऑइल कंपनीचा मालक व चेअरमन लॉर्ड वर्थ याच्या मालकीची आहे.

ही तेलविहीर टेन्शन लेग ड्रिलिंग / प्रॉडक्शन प्लॅटफार्म (टीएलपी) या प्रकारची असून तिचा त्रिकोणी डेक (वरच्या पृष्ठभाग एखाद्या फुटबॉल मैदानाएवढा विस्तृत असतो. हा पृष्ठभाग पोलादाचा नसतो तर फेरो-क्राँकिटचा असतो आणि तो तीन अवाढव्य पायांवर समुद्रात उभा असतो. हे तिन्ही पोलादी पाय एकमेकांना आडव्या व तिरप्या पोकळ पाईपांनी जोडलेले असतात. ते पोकळ पाइप पाण्यात तरंगू पाहतात, त्यामुळे पाण्यात बुडालेल्या संपूर्ण महाकाय रचनेचे वजन कमी करता येते आणि ती रचना पाण्यात न बुडता वर येऊ पाहते. प्रत्येक पायापासून निघणारे तीन-तीन दोर समुद्रतळाला पक्के जखडून टाकतात. साहजिकच वर जाऊन तरंगू पाहणारे ते तीनही राक्षसी पाय नऊ पोलादी दोरांमुळे आहे तेथेच राहतात आणि तो महाकाय प्लॅटफार्म इतका स्थिर राहतो की समुद्रतळाखाली होणाऱ्या भूकंपाचाही त्या तेलविहिरीवर अजिबात परिणाम होत नाही. वादळी हवामानात कितीही उंच लाटा उसळल्या तरी त्या तेथवर पोचत नाहीत. त्यामुळे टीएलपी तेलविहिरींवरील पृथ्वीच्या पोटातील तेल वर ओढून घेण्याचे काम अविरत चालू राहते. अन्य तेलविहिरी एका जागी स्थिर असतात. त्या हलवता येत नाहीत. टीएलपी तेलविहीर प्रत्येक पायाच्या

तीन तीन दोराच्या बेड्या सोडल्या की सहजपणे दुसरीकडे हलवता येते.

लॉर्ड वर्थच्या या सीविच तेलविहिरीबद्दल इतर तेल उत्पादकांना वैषम्य वाटत असे. कारण आंतरराष्ट्रीय पाण्यात तेल उत्पादन करून आपल्या देशाच्या सीमेत अंतर्भूत होणाऱ्या समुद्राच्या क्षेत्रातील तेल वर काढण्याचा जो दंडक होता तो धुडकावून लावून लॉर्ड वर्थने नीतिमत्ता, कायदा आणि संकेत यांना तिलांजली दिली होती. नवीन टीएलपी तेलविहीर खुल्या समुद्रात आंतरराष्ट्रीय सीमेपार उभी करून लॉर्ड वर्थने अमाप संपत्ती मिळवण्याचा घाट घातला होता. या तेलविहिरीचे नकाशे त्याने चोरले होते, आणि हेरगिरी करून तेलउत्पादकांची माहिती मिळवण्यात त्याचा हातखंडा होता.

सीविच तेलविहीर रात्रीच्या अंधारात असंख्य दिव्यांना झगमगून उठे. नक्षत्रासारखी वाटे.

लॉर्ड वर्थने वाटेल त्या मार्गाचा अवलंब करून, औद्योगिक हेरगिरी आणि मोक्याच्या जागेवरच्या माणसांना वश करून अल्पकाळातच भरपूर कमाई करून तेल उत्पादकांत आपले प्रस्थ निर्माण केले होते. त्याला कायद्याने गुन्हेगार ठरवणे शक्य नव्हते, परंतु इतर तेल उत्पादकांना त्याचा मत्सर वाटत होता यात शंकाच नाही. त्याच्याविरुद्ध काहीतरी करायला हवे अशी निकड इतर तेल उत्पादकांना वाटत होती.

त्यासाठी दहा तेल उत्पादकांची एक अनौपचारिक बैठक लेक ताहो या अमेरिकेतील शहरी घेण्यात आली. तिला एकूण दहा तेल उत्पादक उपस्थित होते. त्यातील चौघेजण अमेरिकन होते. दक्षिण कॅलिफोर्नियात तेलविहिरी असणाऱ्या बेन्सनने आपल्या आलिशान निवासस्थानी ही बैठक घेतली होती. एकजण व्हेनेझुएलातून आला होता. बोरोसॉफ हा रशियातून आला होता. त्याला अमेरिकेला तेल पुरवण्यात फारसा रस नव्हता. पण ते सर्वजण अमेरिकेला तेलपुरवठा करणारे होते. आपापल्या भागातल्या तेल साम्राज्याचे राजेमहाराजे होते. आपल्या तेलाची किंमत घसरू नये अशी त्या सर्वांची धडपड होती. तेलाच्या सध्याच्या किंमती स्थिर कशा राखता येतील, यासाठी विचारमंथन करण्याकरिता ही बैठक आहे असे प्रास्ताविक बेन्सन करतो. ''युरोपीय देश आणि ओपेक देश तेलाच्या किंमती वाढविणार आहेत. पण अमेरिकेत जोपर्यंत लॉर्ड वर्थ हडसन हे आपल्या किंमतीत वाढ करणार नाहीत तोपर्यंत आपल्याला किमती वाढवता येणार नाहीत. त्यांनी आधीच आपले बरेच मार्केट खाऊन टाकले आहे. आपण किमती वाढवल्या आणि लॉर्ड वर्थने आहेत त्याच किमती ठेवल्या तर आपली विक्री आणखी कमी होईल. टीएलपी विहिरीमुळे वर्थचे उत्पादन वाढत आहे. तशा आणखी विहिरी त्याने उभारल्या तर आपण सगळेच अडचणीत येऊ. आंतरराष्ट्रीय समुद्रात लॉर्ड वर्थने टीएलपी तेलविहिरी काढून एक चुकीची गोष्ट केली आहे. हा एक नैतिक प्रमादच आहे. आपण त्याचा

बंदोबस्त करायला हवा. त्यासाठी ही बैठक आहे.''

बेन्सनच्या या प्रास्ताविकानंतर उपस्थित तेल उत्पादक वेगवेगळी मते मांडतात. अखेर बेन्सन म्हणतो, ''लॉर्ड वर्थचा आंतरराष्ट्रीय समुद्रातला तेल उपसण्याचा प्रकल्प बंद पाडणे हे आपले कर्तव्य आहे. संबंधित देश व राज्यकर्ते त्याबाबत काही करतील असे दिसत नाही. आपणच पुढाकार घेणे क्रमप्राप्त आहे. आपले तांत्रिक कौशल्य वापरून लॉर्ड वर्थला आपण थोपवले पाहिजे.''

''त्यासाठी नेमके काय करणार?''

''आपण त्यासाठी स्वत: काही करणार नाही. एका त्रयस्थ व्यक्तीकडून ते काम करून घेणार.''

''अशी कोण व्यक्ती आहे?''

''तेलविहिरींना आग लागते तेव्हा फक्त एकच व्यक्ती ती आग विझवण्याचे अवघड काम करते. ती व्यक्ती म्हणजे जॉन क्रॉन्काइट. त्यालाच आपण हे काम सांगितले तर लॉर्ड वर्थची टीएलपी तेलविहीर नष्ट होऊ शकेल.''

''तो आपल्याला भेटू शकेल का?''

''हो, त्याला मी आधीच येथे बोलावून घेतले आहे.''

जॉन क्रॉन्काइट त्या बैठकीत प्रवेश करतो. तो सर्वांना सांगतो, ''या असल्या कामासाठी माझी फी दहा लाख डॉलर्स एवढी आहे. त्याशिवाय प्रत्यक्ष कामासाठी मला एक कोटी डॉलर्स लागतील. या एका कोटीपैकी काही रक्कम उरल्यास मी ती परत करीन. मात्र माझी १० लाख डॉलर्सची फी कायमच राहील. १ कोटी १० लाख डॉलर्स मला आगाऊ द्यावे लागतील. माझ्या कामात मला संपूर्ण स्वातंत्र्य हवे. माझ्या कामात कोणी ढवळाढवळ करता कामा नये. मी काय करणार आहे ते तुम्हाला सांगणार नाही. तुम्हीही मला त्याबाबत काही विचारता कामा नये. काम होईपर्यंत माझ्याशी कोणी संपर्क साधायचा नाही. मीही साधणार नाही.''

जॉन क्रॉन्काइटच्या या रोखठोक बोलण्याने सगळे प्रभावित होतात. प्रत्येकी ११ लाख डॉलर्स ही रक्कम त्यांना किरकोळ वाटते. लॉर्ड वर्थ हडसनचा काटा काढण्यासाठी ती देण्याची प्रत्येकाची तयारी असते.

त्या बैठकीला उपस्थित असलेला एक तेल उत्पादक कोरल हा लगेच लॉर्ड वर्थला भेटून, या बैठकीचा अहवाल देतो. कोरल हा लार्ड वर्थकडून वर्षाला दोन लाख डॉलर्सची रिटेनर फी घेत असतो.

लॉर्ड वर्थ आणि क्रॉन्काइट यांचा आधी एकदा तेलविहिरीच्या आगीसंबंधातच संपर्क आलेला असतो. त्यावेळी क्रॉन्काइट येण्याआधीच आग विझल्याने वर्थने त्याची ठरलेली फी देण्याचे नाकारलेले असते. त्यावरून कोर्टकचेऱ्या होऊन क्रॉन्काइटलाच खटल्याचा खर्च देणे भाग पडलेले असते. त्यामुळे त्या दोघात

वैमनस्य असते.

लॉर्ड वर्थ क्रॉन्काइटच्या योजनेची माहिती मिळवण्यासाठी आपली गुप्तहेरयंत्रणा कामाला लावतो.

सीविचवर क्रॉन्काइट हल्ला करणार तो पाणबुडीद्वारे की विमानाद्वारे याबद्दल अंदाज लॉर्ड वर्थ घेऊ पाहतो. आपली विमाने व हेलिकॉप्टर्स सज्ज ठेवायला सांगतो.

त्याच्या दोन तरुण मुली असतात. त्यांचे अपहरण होण्याची शक्यता त्याच्या डोक्यात येत नाही.

सीविचजवळ पाणबुडी आली तर ती उद्ध्वस्त करण्यासाठी क्षेपणास्त्रे आणि दारूगोळा जमा करण्याची योजना लॉर्ड वर्थ आखतो. क्रॉन्काइटही त्या दृष्टीने पावले उचलतो.

सीविचवर हल्ला होईल अशी भीती लॉर्ड वर्थ परराष्ट्र खात्याकडे व्यक्त करतो.

शासकीय यंत्रणा कामाला लागते.

शेवटी काय होते?

सीविच तेलविहिरीचा स्फोट होतो.

अणुस्फोटातून एक छोट्या भूछत्रासारखा आग व धूर यांचा लोळ उठतो.

त्यानंतर १७ सेकंदांनी एका बोटीवरील प्रवाशांना स्फोटाचा गडगडाट ऐकू येतो.

जॉन क्रॉन्काइट आणि लॉर्ड वर्थ हडसन यांच्यात सरशी कोणाची होते?

ॲलिस्टर मॅक्लीन आधुनिक तंत्रज्ञानाचे विलक्षण गुंतागुंतीचे जग आपल्यापुढे पेश करतो.

विविध व्यक्ती, विविध देश आणि विविध स्वभाववृत्ती यांचे व्यामिश्र विश्व वाचकांना चक्रावून सोडते.

सीविच- समुद्र चेटकीण वाचकांवर गारूड करते. ते गारूड सहजी हटणारे नसते.


**किंमत : २४०रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : ३०रु.**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

नवे कोरे




# आनंदाचं पासबुक

**श्याम भुर्के**

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर माणूस अनेक क्षेत्रात यश प्राप्त करू शकतो.

श्याम भुर्के यांनी 'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये यशाची शिखरे गाठली.

साहित्य व कला क्षेत्रात भरारी मारली. वि.स. खांडेकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, रणजित देसाई, जगदीश खेबूडकर, राम गबाले, भीमसेन जोशी, शरद तळवलकर, सुरेश भट, वामनराव चोरघडे, प्रा. शिवाजीराव भोसले अशा अनेक नामवंतांसंबंधीच्या आठवणी आनंददायी आहेत. डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या समाजकार्यात ते सहभागी झाले.


खुमासदार अत्रे, पु.ल. एक आनंदयात्रा, नंदादीप–वि.स. खांडेकर, साहित्यिक सावरकर, गोनीदां-एक झंझावात, व्यंकटेश माडगुळकरांची गोष्ट, मिरासदारी, शरद तळवलकर–गुदगुल्या असे कार्यक्रम पत्नीसमवेत रसिकांपर्यंत पोहोचविले. असं हे आनंददायी घटनांचं समृद्ध लिखाण आहे.

ज्याला आयुष्यात मोठं व्हावंसं वाटतं, यशस्वी व्हावंसं वाटतं, आनंदी रहावं वाटतं; त्याला हे पुस्तक नक्कीच प्रेरणा देईल.

# पुस्तक परिचय

**आपल्या कर्तृत्वावर आपला स्वतःचा विश्वास असेल तर आपल्याला हवे ते मिळू शकते.**
**मात्र त्यासाठी तुम्हीच पुढे व्हायला हवे**

## स्वयंप्रेरणा




**विकास मलकानी** अनु. मीना टाकळकर

खिशात मावेल अशा छोटेखानी आकारातील 'चला जाणून घेऊ या' या मालिकेत मेहता पब्लिशिंग हाऊसने आजवर विविध विषयांवरील पन्नासेक पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत.

सुख, ताण व राग, यशाचे रहस्य, मनोविकास, परमार्थ, आध्यात्मिकता, सौंदर्य, मंत्रसामर्थ्य, संवाद, ध्यानसाधना, प्रार्थना, शाकाहार, पोषक आहार, रिलॅक्सेशन, रेकी, अंकशास्त्र, क्रियायोग, ॲक्युप्रेशर, ज्योतिषविद्या, स्मरणशक्ती, यशस्वी विवाहाचा कानमंत्र, जागरूक पालकत्व यासारख्या विषयांची थोडक्यात पण सर्वांगीण माहिती देणाऱ्या आणि आपल्या प्रगतीला चालना देणाऱ्या या पुस्तिकांनी अनेक वाचकांच्या जीवनात, विचारात आणि कार्यपद्धतीत क्रांतिकारक बदल घडवून आणलेले आहेत.

या पुस्तिकांवर वाचकांच्या उड्या पडतात. वाचकांच्या अंतर्यामीचा स्फुल्लिंग चेतवणाऱ्या या पुस्तिका असा एखादा बहुमोल कानमंत्र देऊन जातात की त्यामुळे आयुष्याचा अवघा मार्ग उजळून निघतो आणि आपल्या विकासाची दिशा स्पष्ट होऊन जाते. त्या दृष्टीने या पुस्तिकांची उपयुक्तता असामान्य म्हणावी लागेल. असे एखादे पुस्तक आपल्या आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर भेटणे हा एक क्रांतदर्शी योग असतो. आपल्या शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक आणि ऐहिक सार्थकतेची ती नांदी ठरते.

एखाद्या छोट्याशा पुस्तिकेने असे काही भव्यदिव्य घडू शकते का असा प्रश्न आपल्याला पडेल. परंतु एखाद्या पुस्तकात प्रकट झालेल्या ज्ञानाचे आणि संदेशाचे संस्कार अवघ्या आयुष्याला नवा आशय देऊ शकतात हा अनुभव सार्वत्रिक आणि सार्वकालिक आहे. आपल्याला त्याची प्रचिती आलेली नसेल तर ती यावी एवढीच प्रार्थना करता येईल.

'चला जाणून घेऊ या' या मालिकेतील 'स्वयंप्रेरणा' हे पुस्तक माझ्यासमोर आहे, ते असेच आपल्याला आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा देणारे आहे. आपल्याला आपले जीवन समृद्ध करण्यासाठी चालना देणारे आहे. जी माणसे यशस्वी होतात, ती यशाला आपल्याकडे कसे खेचून आणतात, त्यांच्या व्यक्तिमत्त्वात, विचारात आणि श्रद्धांमध्ये काय वेगळेपण असते याचे दिग्दर्शन विकास मलकानी यांनी या पुस्तकात सूत्रात्मक रूपात केले आहे.

आपण आज ज्या जगात आणि कालखंडात जगत आहोत त्याबद्दल तुम्हाला काय वाटते?

दारिद्र्य, भ्रष्टाचार, विषमता, हिंसाचार, स्पर्धा, शोषण यामुळे तुम्हाला नैराश्य, औदासीन्य, अपराधभावना वाटते का?

त्याबद्दल तुम्ही इतरांना दोष देत राहता का?

ही नकारात्मक भूमिका तुमच्या यशाच्या स्वप्नांना उद्ध्वस्त करील.

विकास मलकानी सकारात्मक भूमिकेतून सद्य:कालाकडे पहायला सांगतात.

**खरे सांगायचे तर सध्याचा काळ हा पृथ्वीतलावरील मानवी वास्तव्यातील सर्वात उत्तम काळ आहे. या पूर्वीच्या कुठल्याही काळात सर्वसामान्य स्त्रीपुरुषांना आजच्यासारख्या संधी आणि सुविधा उपलब्ध नव्हत्या.**

संगणक, इंटरनेट, मोबाइल, दूरचित्रवाणी, माध्यमांची उपलब्धता, वाहन व दूरसंपर्क, दैनंदिन जीवन सुखावह करणारी उपकरणे आणि साधने, काल आणि स्थळ यांचे नियोजन करणाऱ्या यंत्रणा, उत्पादनांना जागतिक पातळीवर नेण्याची शक्यता, आपल्या कल्पनांना आणि साहसाला स्थलकालाच्या बंधनांपासून मिळणारे मोकळेपण या पार्श्वभूमीवर आजचा काळ हा मानवी जीवनातला सर्वोत्तम काळ आहे असे नि:संदिग्धपणे म्हणता येते.

या नव्या जगात यशाची दारे सर्वांसाठी खुली आहेत. स्वप्ने बघूनच न थांबता, ती प्रत्यक्षात आणण्याची संधी कधी नव्हे एवढी आज सुलभ झालेली आहे.

मागे काय झाले याचा फारसा बाऊ न करता, आणि त्यातल्या त्रुटींचे वा कमतरतांचे आडंबर न माजवता आज आपण काय करू शकतो, उद्या आपण काय मिळवू शकतो यावर लक्ष केंद्रित करा. इतरांशी तुलना जरूर करा, पण स्पर्धकांचा द्वेषमत्सर न करता, आपल्याजवळ जे काही खास आहे ते जाणून घेऊन त्याचा वापर उत्तम प्रकारे कसा होऊ शकेल यावर लक्ष केंद्रित करा.

एखादी अभिनव कल्पना तुम्हाला सुचली आणि तिला योग्य प्रकारे व्यावसायिक स्वरूप देता आले तर बिल गेट्स, नारायण मूर्ती यांच्यासारखे उत्तुंग यश मिळवणे कठीण नाही असा विश्वास बाळगावा असा हा काळ आहे.

त्यासाठी वर्तमानात जगायला हवे.

नकारात्मक गोष्टींचाच बडिवार माजवत राहिलात तर तुमचा आत्मविश्वास ढासळत जाईल. सकारात्मक विचार करीत राहिला तर चांगल्या गोष्टी करण्याची, कृतिशील होण्याची, नवे काही मिळवण्याची, उत्कट भव्यतेचा ध्यास बाळगण्याची प्रेरणा बलवत्तर होत राहील. त्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपला आपल्यावर विश्वास हवा.

आपला आपल्यावर विश्वास नसेल तर दुसरे लोक आपल्यावर विश्वास कसा ठेवणार? स्वत:वर आणि दुसऱ्यावर, चांगल्या गोष्टीवर, स्वत:च्या चांगुलपणावर, प्रामाणिकपणावर, वैयक्तिक कर्तृत्वावर श्रद्धा हवी. श्रद्धा ही कुठल्याही धर्माशी वा पंथाशी निगडित असते असे नाही. श्रद्धा आपल्या आंतरिक सामर्थ्यावर, आपल्या जीवनाच्या मूल्यांवर, आपल्या ध्येयावर हवी. श्रद्धेच्या बळावर तुम्हाला हवे ते मिळू शकते, तुम्ही फक्त हाक द्या. जे काही मिळवण्याची इच्छा आहे ते मिळवण्यासाठी सर्वात्मकाला आवाहन करा, तुमच्या मदतीला तो धावून येईल. जे स्वत:ला मदत करतात त्यांच्या मदतीला परमेश्वर धावून येतो.

तुम्हाला जे काही व्हावेसे वाटते, ते तुम्ही होऊ शकता. मात्र ते घडवून आणण्यासाठी तुम्हीच पुढे व्हायला हवे. तुम्हीच सर्व जबाबदारी घ्यायला हवी. जबाबदारी घ्या, कृती करा. तुम्हाला हवे ते साध्य निश्चित होईल. यावर श्रद्धा ठेवा.

आपल्या आयुष्याला प्रेरणा देणारे दोन प्रभावशाली घटक असतात.

एक - काहीतरी मिळवण्याची इच्छा– उदा. प्रेम, सुरक्षितता, यश, भौतिक समृद्धी, आरोग्य, सौंदर्य, अध्यात्म, परमेश्वर प्राप्ती, कीर्ती, सत्ता इ.

दोन - काहीतरी गमावण्याचे भय– दु:ख उदा. करीयर, प्रोजेक्ट, ग्राहक, सत्तापद, मैत्री, संपत्ती इ.

आपल्यापैकी प्रत्येकाचे ध्येय वा स्वप्न वेगळे असते. आपली मूल्ये आणि प्राधान्यक्रम वेगळे असतात. दैनंदिन व्यवहारात उपयुक्त ठरणाऱ्या मनाच्या नऊ अवस्थांविषयी या पुस्तकात चांगले विवेचन केलेले आहे.

१. खोलवर रुजलेली आध्यात्मिक श्रद्धा.
२. मी हे करू शकतो हा आत्मविश्वास.
३. ध्येय गाठणाऱ्याला योग्य स्वप्ने बघण्याची एक दिव्य शक्ती असते.
४. ध्यास- विशिष्ट ध्येयाचा ध्यास घेऊन वाटचाल करा. यश मिळेल.
५. साहस- अपयशाची चिंता न करता, अपयश धैर्याने स्वीकारत पुढे चालत राहा.
६. चारित्र्य - आपल्या मनात येणारा प्रत्येक विचार, प्रत्येक शब्द, प्रत्येक कृती, प्रत्येक गोष्ट आपल्या अंतर्मनात प्रतिबिंबित होते. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे चारित्र्य.
७. गुणवत्ता - खूप गोष्टी अर्धवट करण्यापेक्षा एकच गोष्ट उत्तम करणाऱ्याला महत्त्व मिळते. उत्कृष्ट आणि मध्यम यातील फरक म्हणजे गुणवत्ता.
८. आत्मविश्वास - चांगल्याची अपेक्षा करणे म्हणजे आशावाद. कठीण परिस्थितीला तोंड देणे म्हणजे आत्मविश्वास.
९. शिस्त - नेतृत्वगुणातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट. उद्दिष्ट स्पष्ट असेल आणि मनाला शिस्त असेल तर तुमचा कधी पराभव होणार नाही. मनाला शिस्त लावली तर तुमचा ध्यास, तुमचा साहसीपणा, तुमची गुणवत्ता आणि तुमचे चारित्र्य प्रभावी ठरेल. 'मी हे करू शकतो' हे म्हणण्याची दृष्टी, ताकद स्वत:मध्ये वृद्धिंगत करा.

मनामध्ये जो विचार येतो, तो तुमच्या शरीराचाही भाग होतो. शरीरात ऊर्जा निर्माण करतो. मनाने आपण यशाचा आनंद उपभोगत आहोत असे चित्र समोर आणा, या विजयाच्या क्षणापासून मागे मात्र जा. यशाचे चित्र रेखाटा. अत्यंत महत्त्वाचे असेल ते प्रथम करा.

मनासमोर चित्र रेखाटताना कधी कधी भय वाटते. मन:शांती ढळते. त्यासाठी भयावरही कब्जा करायला हवा.

आपल्या अंतर्मनामध्ये भीतीची भावना खोलवर रुजलेली असते. गरीबीची भीती, मृत्यूची भीती, बदलाची किंवा अनिश्चिततेची भीती आणि अपयशाची भीती अशा चार प्रकारची भीती आपल्या कृतिशीलतेला सारखी मागे खेचत राहते. आपल्या साहसी वृत्तीला पायबंद घालत राहते.

अपयशाची भीती म्हणजे निर्णय घेताना ज्या चुका होतात त्या चुका पुन:पुन्हा करीत राहण्याची आपली प्रवृत्ती. परंतु कोणत्याही बाह्य घटनाक्रमात भावनेचा भाग नसतो; तो भावनेचा भाग हा आपण त्यावर लादत असतो हे लक्षात घेऊन, आपल्याला वाटणारे भय काल्पनिक आहे, ते भय प्रत्यक्षात अस्तित्वात नाही असे आपल्या अंतर्मनावर सतत बिंबवत राहायला हवे.

भय दूर करण्यासाठी आपण आपल्या संवेदनशीलतेची पातळी उच्च स्तरावर न्यायला हवी, आपण एकमेवाद्वितीय आहोत, आपण सर्जनशील आहोत ही भावना बलवत्तर करायला हवी, आपल्या शब्दकोशातून अपयश (फेल्युअर) हा शब्द काढून टाकायला हवा, अपयश आले तरी ते व्यक्तिगत आहे असे न मानता, वस्तुनिष्ठपणे त्याकडे बघा, आपण अमुक गोष्ट करू शकतो असे म्हणायला शिका, आपण एकटे नाही, आपल्यामागे सर्व सद्‌भावनांचे बळ उभे आहे असे माना, आपले मन स्वच्छ व पारदर्शक ठेवा, सकाळी काही मिनिटे शांत चित्ताने बसून उद्दिष्टावर चिंतन करा, वर्तमानात जगा. आपल्याला इष्ट वाटणारे वळण घटनांना देण्यासाठी या सर्व बाबी उपकारक ठरतील.

आपली कृती ही सर्वोत्तम हवी असा आपला आग्रह हवा.

सुमार सोप्या आयुष्याचा स्वीकार करण्याची आपली मानसिकता असते; ती दूर करा. त्यासाठी अपयशाची जी भीती वाटते तिला रजा द्या. तिची हकालपट्टी करा. अंतर्मनाच्या किंवा जाणिवेच्या पातळीवर असणारी अपयशाची भीती आपल्या स्वप्नदर्शी वृत्तीला खच्ची करते. कोणत्याही प्रकारच्या सुप्त भीतीचे स्वरूप जाणून घ्या आणि ती नष्ट करा. तिच्यावर मात करा. अदृश्य भीती शोधून काढून, वाईट भीतीला निकामी करणे, आपल्यावरील नकारात्मक टीकेला योग्य पद्धतीने प्रतिसाद देणे, आपल्या आशाआकांक्षांच्या पूर्ततेची कालबद्ध योजना आखणे, योग्य ती माहिती मिळवून तयार करणे, आपल्या क्षमतांची आणि व्यक्तिमत्त्वाची जात ओळखून, आपल्या नैसर्गिक क्षमता आणि नैसर्गिक उणिवा लक्षात घेऊन कृती करणे आवश्यक असते. या पुस्तकात बीव्हर, सिंह, ओटर (पाणमांजर) या प्राण्यांचे दाखले देऊन या बाबी स्पष्ट केल्या आहेत.

या सर्व गोष्टींबरोबरच वेळ, बुद्धिमत्ता, पैसा, बाह्य साधने यांचा मेळ घालून

आपल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी नियोजनबद्ध कृती करायला हवी असे या पुस्तकाद्वारे मनावर बिंबवले जाते.

आपल्या यशाच्या दृष्टीने आपण काय करायला हवे? याच्या चार पायऱ्या पुढीलप्रमाणे:

१. यशाची क्षमता क्षीण होऊ नये म्हणून स्वत:वर अनावश्यक मर्यादा लादून न घेता, त्यांच्या दडपणाखाली आपली कृतिशीलता दडपू नये.
२. आपली बलस्थाने काय आहेत यावर लक्ष केंद्रित करा.
३. सकारात्मक दृष्टिकोन बाळगा. सकारात्मक माणसे शोधा.
४. चांगला माणूस बनण्याची आपल्यात असणारी जी क्षमता आहे, ती वाढविण्यासाठी दृढप्रतिज्ञ राहा.

आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्रकट करण्याचा सकारात्मक मार्ग शोधा. आपली विधायक प्रतिमा जनमानसात रुजवा. आपल्यात जगाला अजून ज्ञात नसलेल्या गोष्टी शोधून काढण्याचे सामर्थ्य आहे, झोकून काम करणाऱ्यांना नशीब साथ देते यावर विश्वास ठेवा. काम करीत राहा.

**नशीब आपल्याला साथ देते. नशिबाचे नियोजन आपण करू शकत नाही. पण नशीब उघडते. ध्यानीमनी नसताना उघडते.**

त्यासाठी आपण तयार मात्र असायला हवे.

जागतिकीकरणाच्या काळात सर्वच क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेमुळे तुमचे कौशल्य, तुमची क्षमता, तुमची कल्पकता, तुमची एकाग्रता, तुमची प्रतिभा यांना आव्हान मिळते. संधी मिळते. तुमच्यातील साहसी वृत्तीला आविष्कारासाठी नवे क्षेत्र गवसते. तुमच्या सहिष्णुतेची, चिकाटीची कसोटी लागते.

'स्वयप्रेरणा' मध्ये शेवटी लेखक विकास मलकानी यांनी समारोपात्मक काही सूत्रे सांगितली आहेत, ती अशी :


१. व्यापक दृष्टी मिळवा.
२. चंद्र मिळवण्याचे स्वप्न बघा. तुमची दृष्टी व्यापक बनवा.
३. तुमची व्यापक दृष्टी इतरांपर्यंत पोचवा. तुमच्या स्वप्नात इतरांना सहभागी करून घ्या.
४. टीका होणारच. योग्य प्रकारे टीका कशी हाताळावी हे शिकून घ्या.
५. अडथळे आणि अडचणी असणार. त्यांना सृजनात्मक पर्यायाने प्रतिसाद द्या.

६. कुठलेही काम करताना अनाठायी उतावीळपणा आणि अधिरपणा कार्यनाशाला कारणीभूत होतो हे लक्षात घ्या. चिकाटीने प्रयत्न करा. आरंभी भरधाव धावून पुढे ढेपाळले तर अंतिम टप्पा कसा गाठणार? आपल्याला आपल्या उर्जेचा योग्य प्रकारे

वापर करता यायला हवा. आपली सृजनात्मकता योग्य प्रकारे आविष्कृत व्हावी याबद्दल दक्ष रहायला हवे. एका दिवसात अनेक गोष्टी पूर्ण करण्याची घाई करू नका.

या युगात जगण्याचे भाग्य लाभलेली आपली पिढी. कर्तृत्वाला कधी नव्हे एवढे व्यापक अवकाश आपल्यापुढे आहे. आपल्या कृर्तृत्वाला गंज चढू नये, उलट ते धारदार व्हावे यासाठी आपण आपले पंख पसरायला हवेत असा संदेश देणारे हे पुस्तक तरुणांनी आत्मसात करायला हवे.

**किंमत : ५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २०रु.**




# २६/११ मुंबईवरील हल्ला

हरिंदर बावेजा अनु. प्रा. मुकुंद नातू

२५०रु. पोस्टेज ३०रु.

कराचीहून सागरमार्गाने आलेले दहशतवादी, साठ तास देशाच्या आर्थिक राजधानीत रक्तरंजित थैमान घालतात; त्याची ही प्रत्यक्षदर्शी कहाणी.


परदेशी पर्यटक, श्रीमंत मंडळी यांची गर्दी असलेल्या कुलाब्यातील लिओपोल्ड कॅफे, ते हॉटेल ताज आणि हॉटेल ट्रायडेंट–ओबेरॉय पर्यंतच्या मुक्त संचारात नरिमन हाऊस आणि सीएसटी येथेही त्यांनी बेबंद नरसंहार केला.

हे सर्व वाचताना दु:ख आणि वैफल्याने मन विषण्ण होते.

परंतु या भीतिदायक काळातही सामान्य मुंबईकरांनी दाखवलेले धैर्य आणि विविध सुरक्षा दलांतील अधिकारी आणि जवानांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठा यांनी मन उचंबळून येते. *'ये है बम्बई मेरी जान...'* या जुन्या गाण्याची आठवण येते. धडाडीचे कार्यक्षम सर्वोच्च पोलिस अधिकारी 'ज्युलिओ रिबेरो' यांनी देशाच्या ढिसाळ सुरक्षाव्यवस्थेची केलेली चिरफाड काळजी निर्माण करते. अर्थात ते यावर उपायही सुचवतात. पण ते अंमलात कसे येणार हा वेगळा प्रश्न आहे.

....असे हल्ले भारताला आणखी काही काळ तरी सोसावे लागणार आहेत, याची कारणमीमांसा ज्येष्ठ पत्रकार हरिंदर बावेजा यांनी केली आहे.


# आमची नवीन प्रकाशने



## आदिपर्व
डॉ. प्रमिला जरग

छत्रपती शिवरायांचे आजोबा मालोजीराव भोसले यांच्या कर्तृत्वाची ओळख करून देणारी अभ्यासपूर्ण ऐतिहासिक कादंबरी

**३००रु. पोस्टेज ३०रु.**



## जोहार माय बाप जोहार
मंजुश्री गोखले

संतपरंपरेतील महान विठ्ठलभक्त संत चोखामेळा यांच्या आयुष्यावरील मनोवेधक कादंबरी.


**३००रु. पोस्टेज ३०रु.**



## द प्रायव्हेट पेपर्स ऑफ ईस्टर्न ज्युवेल
**मॉरीन लिंडले** अनु. ऋजुता कुलकर्णी

योशिको कावाशिमा एक बंडखोर मुलगी ते गुप्तहेर आणि तिथून देशद्रोहापायी देहदंडाची शिक्षा झालेल्या एका राजकुमारीचा थक्क करणारा जीवनप्रवास, एक सत्यकथा.

**२८०रु. पोस्टेज ३०रु.**



## वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?
अनु. कॅप्टन राजा लिमये


आपल्या सर्व शेजारील राष्ट्रांच्या हद्दीवर आपले लष्कर सज्ज आहे. त्याहूनही आवश्यक असलेली लष्करी सज्जतेपलीकडची गरज! आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पत्रकार श्री अरुण शौरी यांच्या शब्दात वाचा.

**४५०रु. पोस्टेज ३०रु.**

# पुस्तक परिचय

## युद्ध ज्वरातून घडलेली भीषण दुर्घटना

# आवा मारु




**रेई किमुरा** अनु: चारुलता पाटील

१८१८ मध्ये पेशवाई बुडल्यानंतर आतापर्यंत भारत ही कधी युद्धभूमी झालेली नाही. युरोपने दोन महायुद्धे सोसली. लाखो माणसे बळी पडली. संहार आणि विध्वंस सोसून राखरांगोळीतून हे छोटे मोठे देश हिमतीने उभे राहिले. आपल्या शेजारच्या जपानप्रमाणे आवा मारु. शिकोकूमधल्या 'आवा' या दाट डोंगराळ प्रदेशाला आवा म्हणतात.

आवा मारु ही प्रचंड शक्तिशाली बोट. ५०८ फूट लांब, ४१ फूट रुंद ११२४९ टन वजन. या बोटीला १४००० अश्वशक्तीचं मित्सुबिशी डिझेल इंजिन होतं. १७ नॉटस वेगाने ही प्रवास करायची. तिच्यावर १४८ नौसैनिक होते. या बोटीने ४ प्रचंड संकटांतून स्वत:ला वाचवले होते.

अनंत सामंत यांची गाजलेली कादंबरी एम. टी. आयवा मारु येथे आठवते.

जपानी भाषा अत्यंत निसरडी आहे. शब्द एकच असतो. त्याचे उच्चार अनेक असू शकतात आणि त्यांचे अर्थ भिन्न असतात. आयवा म्हणजे सौंदर्य व शाश्वतता यातून झालेली निर्मिती.

२८ मार्च १९४५ ला आवा मारु सिंगापूरहून योकोहामाला जायला निघाली आणि ४ एप्रिल १९४५ ला २५०० प्रवाशांसह सागरतळाशी गेली. पॅसिफिक, अटलांटिक महासागरात अशा अनेक बोटींची थडगी आहेत.

रेई किमुरा या ऐतिहासिक कादंबरीकर्तीने टायटॅनिक ऑफ जपान असे शीर्षकात जोडले आहे. पण या दोन बोटींच्या अपघातात फरक आहे. टायटॅनिक ही प्रचंड मोठी प्रवासी बोट होती. तयार झाल्यावर इंग्लंड ते न्यूयॉर्क या आपल्या पहिल्या प्रवासाला ती एप्रिल १९१२ मध्ये निघाली. अटलांटिक महासागर अर्ध्यावर ओलांडल्यावर ती बर्फाच्या कड्यावर आपटून १४ एप्रिल १९१२ रोजी २२२३ प्रवाशांसह बुडाली. त्यापैकी ७०६ प्रवासी वाचले. सागरतळाशी असलेल्या टायटॅनिकला आज सत्तावीस प्रकारच्या बॅक्टेरियांनी व्यापले असून हॅलोमोनस टायटॅनिक सारख्या बॅक्टेरियांच्या ती भक्ष्यस्थानी पडत आहे. आणखी १५/२० वर्षात सागर तळाशी, तिचे नामोनिशाणही उरणार नाही. आवा मारुची स्थितीदेखील साधारपणे अशीच असेल.

दुसऱ्या महायुद्धात हड, जर्मनीची बिस्मार्क, जपानची आवा मारु अशा अनेक प्रचंड विनाशिका, बोटी, जहाजे, पाणबुड्या, सागरतळाशी गेल्या. त्यापैकी काहींवर चित्रपट निघाले. आपल्याकडे संत तुकाराम, जयंती, संत रामदास या प्रवासी बोटी वादळांमुळे बुडाल्या. गंगाधर गाडगीळांनी बोट बुडाली ही कथा रामदास बोटीच्या अपघातावर लिहिली. त्यापूर्वी कवी माधव केशव काटदरे यांनी संत तुकाराम बोट अपघातावर कविता लिहिली. भानू शिरधनकरांनी जहाज, गलबते यांच्या अपघातांवर लेख लिहिले.

जपानच्या इतिहासात १९४५ हे काळेकुट्ट वर्ष आहे. 'आवा मारु'चा अपघात

४ एप्रिल १९४५ चा. त्यानंतर ४ महिन्यांनी हिरोशिमा (६ ऑगस्ट) व नागासाकी (९ ऑगस्ट १९४५) यावर अमेरिकेने अणुबॉम्ब टाकले. जपानच्या सम्राटांनी लगेच विनाशर्त शरणागती पत्करली.

रेई किमुरा यांनी आवा मारुची जलसमाधी या वास्तव घटनेभोवती सवादा व तानाका कुटुंबाचा आवा मारु अपघातग्रस्त बोटीतला प्रवास या कल्पित कथानकाचा दुपेडी गोफ विणून ही कादंबरी लिहिली. महायुद्धात अशा शोकांतिका अनेक घडतात. ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय सारख्या चित्रपटांना, आवा मारु सारख्या कादंबऱ्यांना, शोकगीते व विलापिकांना युद्धांतून कथाबीजे मिळतात.

रेई किमुरा यांची कादंबरी २००८ मध्ये प्रसिद्ध झाली. चारुलता पाटील यांनी या कादंबरीचा अनुवाद करायचा असे ठरवले. त्यांनी जपानी भाषातज्ज्ञांचे साहाय्य घेतले. शब्दशः अनुवाद करणे सोपे नव्हते. रेई किमुरांची कादंबरी वाचताना व अनुवादताना ज्या प्रतिमा चित्रफितीसारख्या सलगपणे उमटत गेल्या, त्या मूळ आशयाला धरून शब्दबद्ध करणे हे काम सोपे नव्हते. चारुलता पाटील यांनी चिकाटीने व परिश्रमाने हा सार्थ व सुंदर अनुवाद केला.

जपानपासून सिंगापूर ३००० मैल दूर दक्षिणपूर्व आशियात थायलंड मलेशियाच्या पलीकडे असलेलं बेट. सिंगापूर बेट मलेशियापासून विभक्त झाल्यावर जपानने सिंगापूरवर ताबा मिळवला. १९४०-४१ पासून सिंगापूरच्या जपानीकरणाला वेगाने प्रारंभ झाला. जपानी दूतावास तिथे होताच. जपानी संघटना, ग्रंथालय, जपानी टाऊन हा विभाग अस्तित्वात आले. प्रत्येक जपानी कुटुंबाला १९४२ मध्ये ओळखपत्र देण्यात आले. जपानी शाळा सुरू झाली. हवा उष्ण व दमट. कीटक व डास यांचा त्रास. इथले मूळ लोक चिनी, मलाई व इंडियन. मात्र इथे व्यवहारभाषा इंग्रजी होती. जपानने जपानी सांस्कृतिक रण सुरू करताच इथले मूळ रहिवासी मनाने दुखावले गेले होते. १९४४ च्या सुमारास महायुद्धाचा रंग फिरला. जर्मनी व जपान यांच्या विजयी घोडदौडीला दोस्तांनी अमेरिकेच्या मदतीने पायबंद घातला. जर्मनीने अनाक्रमणाचा करार मोडून रशियात मुसंडी मारली. रशियाच्या प्रखर व चिवट प्रतिकारामुळे जर्मनीचा डाव जर्मनीवर उलटला. इटालीची पार दैना उडाली. सिंगापूरच्या मूळ रहिवाशांना याचा वास लागला. आता ते जपान्यांशी उद्धटपणे, तुच्छतेने व उन्मत्तपणे वागू लागले. इथला पसारा आवरावा लागेल हे जपान्यांनी ओळखले. इथला क्लब बंद पडण्याच्या मार्गावर होता. युद्ध अंगावर आले, नीतिधैर्य खचले की पराभूत सैन्याचा पळ सुरू होतो. तो क्षण अगदी जवळ आहे असे दिसत होते. आता इथे राहण्यात अर्थ नव्हता. जिथे जेते म्हणून वावरलो तिथे आश्रित म्हणून राहणे, म्हणजे लूत लागलेल्या कुत्र्याचे लाचार जिणे जगणे, काहीही करून मायदेश गाठायला हवा. आवा मारु सिंगापूरला येऊ घातली होती. त्यातून जपानला जाता येईल ही आशा होती.

हे सर्व वास्तव होते. यात किमुराने कल्पिताचे रंग भरले आहेत. १९४१ च्या सुमारास जपानने सिंगापूरचा ताबा घेताच आपली माणसे जपानहून इथे पाठवायला सुरुवात झाली.

त्यातला एक म्हणजे शिगे सावादा. अमेरिकेत इंग्लिश भाषाशास्त्रात पदवी मिळवलेला. विदेश मंत्रालयात गुप्तहेर यंत्रणा अधिकारी. पत्नी मासाको, तीन एक वर्षाचा मुलगा हिरो यासह शिगे १३ दिवसांचा प्रवास करून सिंगापूरला आला. बोटीवर मोरी तानाका (इंजिनियर) आणि चिएको या दांपत्याशी सावादा कुटुंबाची मैत्री झाली. सिंगापूरला येताच मासाको प्रसूत झाली. तिच्या उजव्या दंडावर सूर्यासारखी. गोल लालसर खूण होती. म्हणून तिचं नाव ठेवलं गेलं ताइयोचान. सिंगापूरला साडेतीन वर्षांचा काळ छान गेला. जपानी पडदे, गृहसजावट, फर्निचर, सगळं छान करता आलं. चिन हा चिनी सुतार, त्याची मुलगी मिंगलिंग जपानी वस्तीत मिसळली. त्याबद्दल त्यांच्या समाजाने त्यांना वाळीतही टाकले.

सिंगापूर सोडण्याची वेळ आली. जायचं परत तर दोन्ही कुटुंबांनी एकत्र. कशीबशी सहा तिकीटे मिळाली. जाण्याच्या आदल्या दिवशी घरासमोर दोन्ही कुटुंबांचा एकत्र फोटो चिनने काढला. प्रिंट करून आणला.

आंतरराष्ट्रीय अभय घेऊन आवा मारुचा प्रवास सुरू झाला. अचानक चार दिवसांनी कॅप्टनला प्रवास मार्गात बदल करण्याचा हुकुम मिळाला. आवा मारुने मार्ग बदल केला. पण वीनफिश या संहारक पाणबुडीच्या कॅप्टनला मार्ग बदलाचा संकेत नीट मिळाला नाही. संदेश हाताळण्यात गलथानपणा झाला. रडारवर बीप संदेश. मग रडारवर अतिशय वेगाने प्रवास करणारी आवा मारु दिसली. पाऊस व धुके आणि बोट सामानाच्या वजनामुळे जरा खोल गेली होती. म्हणून बोटीवर रंगवलेले क्रॉस पाणबुडीच्या कॅप्टनला दिसले नाहीत. 'आवा मारु'चे रक्षण करा हा संदेश पोचला होता. पण आवा मारुच्या प्रवासमार्गात बदल करण्यात आला आहे, हा संदेश नीट वाचला गेला नव्हता. पाणबुडीने चार रॉकेट्स डागली. ती अचूकपणे आवा मारुवर आदळली. आवा मारु एकदीड मिनिटात बुडाली.

या प्राणसंकटातून सवादा कुटुंबातील फक्त क्योको (तायोचान) वाचली तर तानाका कुटुंबातली चिएको वाचली. बुडता बुडता शिगेने क्योकोला चिएकाच्या स्वाधीन केले होते. पण चिएकोने हा रहस्यस्फोट केला नाही. आईच्या मायेने क्योकोला चिएकाने वाढवले. चिएकाचे लग्न झाले. तिला मुलगी झाली. चिएको १९७० मध्ये वयाच्या साठाव्या वर्षी क्षयाने मरण पावली. मरताना तिने क्योकोला एवढंच सांगितलं की घरातल्या भिंतीवर सम्राटांच्या फोटोमागे असलेल्या खळग्यातल्या पत्राच्या पेटीत तुझा पूर्वेतिहास आहे.

क्योकोचे कुतूहल जागे झाले.

क्योको १९४५ मध्ये तीन एक वर्षांची असेल. तिला पेटीत चिएकोला सिंगापूरला दिले गेलेले ओळखपत्र व एक ग्रुप फोटो एवढं मिळालं. फोटोत दोन जोडपी. दोन मुलं. त्यातला मुलगा कोण?

आपल्या आईचा सिंगापूरशी संबंध काय?

फोटोतले दुसरे जोडपे कोण?

हे कागदपत्र २५ वर्षे पेटीत का दडवलेले होते?

माझा पूर्वेतिहास कळेल म्हणजे काय? इतिहास सरळ आहे. मी चिएको. तानाका यांची मुलगी. माझे वय आज अठ्ठावीस. आम्ही जपानमध्येच वाढलो. गूढ कसलं?

मग क्योको एकटीच सिंगापूरला गेली. ऑफिसातून फिरफिर फिरली. जपानी टाऊनमध्ये गेली. फोटोतले घर तिने शोधले. ओळखले. तांबडा झोपाळाही ओळखला.

तिला तिथे नोरिकोबाईनी कागदपत्रे दाखवत सांगितले. तानाका दांपत्य अपत्यहीन होतं. तू मासाको सावदा व शिगे यांची मुलगी.

मग तिला चिन सुताराची मुलगी मिंगलिंग भेटली.

तिनं सांगितलं. चिएको तुझी आई नव्हती.

शिगे तुझा पिता, मासाको तुझी माता, हिरो हा भाऊ. म्हणजे आपला जन्म सिंगापूरचा.

आवा मारुमधून आपण अर्धा प्रवास केला.

१ एप्रिल १९४५ ला आवा मारु बुडाली. त्या क्षणापासून चिएको आपली आई झाली, त्या दिवशी आपण आपली आई, वडील, भाऊ आणि... आणि मोरी तानाका यांना गमावलं. आपल्याला सिंगापूरचा विसर पडला. मिंगलिंग या दोन घट्ट वेण्या घालणाऱ्या, गोबऱ्या दोन्ही गालांवर खळ्या पडणाऱ्या बाल मैत्रिणीचा आपल्याला विसर पडला.

हे सर्व विस्मृतीत गडप झालं. हे आपण पतीला सांगायचं का?

मुलीला सांगायचं का?

रेई किमुराने या कल्पिताचे धागे वास्तवाच्या धाग्यांशी घट्ट जोडून भूतकाळ व वर्तमानकाळ गुंफून एकजीव केले. म्हणूनच तर आवा मारु ही केवळ भूतकाळात घडलेली एक घटना राहात नाही. ती क्योकोच्या आजच्या जीवनाचा एक भाग होते. जिवंत कथा बनते.

हॅटस ऑफ टू रेई किमुरा!

**प्रा. अनंत मनोहर** (सौजन्य- तरुण भारत,बेळगाव)

**आवा मारु हे पुस्तक इंग्रजीमध्येही उपलब्ध - १४९रु. पोस्टेज २५रु.**

**किंमत : २००रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५रु.**

# पुरस्कार

### * लोकमान्य सेवा संघ, पारले तर्फे पुरस्कार

लोकमान्य सेवा संघ, पारले यांच्यातर्फे गुरुवर्य कै.मा.सी. पेंढारकर पुरस्कार निरंजन घाटे यांच्या 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान' या पुस्तकास १७ जानेवारी २०११ रोजी देण्यात आला.




डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ लेखक निरंजन घाटे

या संग्रहाची निवड परीक्षकांनी एकमताने केली. विज्ञान मराठीतून रंजक भाषेतून सामान्य लोकांपर्यंत पोहचवता येते हे या पुस्तकाने सिद्ध झाले आहे. असे मत परीक्षकांनी व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. स्नेहलता देशमुख ह्यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप रोख रु.१००००/-, स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक असे होते.

### * 'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकाला पुरस्कार

रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वती आणि रोटरी क्लब ऑफ लोकमान्यनगर यांच्या वतीने आयोजित 'रोटरी दिवाळी अंक स्पर्धा' या स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ. दीपक शिकारपूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी रोटरी पर्वतीचे अध्यक्ष विलास जेधे, रोटरी लोकमान्य नगरचे सतीश शेवाळकर उपस्थित होते.

मेहता मराठी ग्रंथजगत दिवाळी अंकाला विशिष्ट विषयाला वाहिलेल्या दिवाळी अंकाचा **'रोटरी लोकमान्य पुरस्कार'** यावेळी देण्यात आला.

वाचन व लेखन संस्कृती लोप पावत असल्याचे म्हटले जाते. मात्र हे म्हणणे चुकीचे असून, ई-बुक्समुळे या संस्कृतीला नवे परिमाण लाभत आहे असे मत प्रसिद्ध

संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी व्यक्त केले.

डॉ. शिकारपूर म्हणाले, संस्कृती ही कधीही लयाला जात नसते. सध्या इंटरनेटचे युग असले तरीही या युगाला अनुसरून ई-बुक्स संकल्पनेचा उदय होत आहे. ई-बुक्स मुळे वाचन आणि लेखन संस्कृतीला नवे परिमाण मिळाले असून, आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत ही संस्कृती उत्तरोत्तर वृद्धिंगत होणार आहे. त्यामुळे त्याबाबत अधिक चिंता करण्याची गरज नाही.

''आपल्याला हव्या त्यावेळी हवे ते पुस्तक वाचता येणे हे आज कॉम्प्युटर डाऊनलोडिंग पद्धतीमुळे सहज शक्य झाले आहे. त्यासाठी आता छापील पुस्तकांचे ओझे बाळगण्याचीदेखील आवश्यकता नाही. लॅपटॉपवर किंवा मोबाईलवर आपल्या आवडीची पुस्तके डाऊनलोड करून घेता येत असल्याने प्रवासात सुद्धा पुस्तकांची सोबत मिळू शकेल. या नव्या तंत्रज्ञानाचा फायदा आपण करून घ्यायला हवा.''

प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले, तर अविनाश नेने यांनी आभार मानले.

## * संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार

''केवळ आर्थिक प्रगती होऊन खरा विकास होणार नाही. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास झाला पाहिजे. प्रत्येक माणसाची प्रगती झाली पाहिजे. समृद्ध समाज घडण्यासाठी सामाजिक प्रगती महत्त्वाची आहे.'' असे मत केंद्रीय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांनी व्यक्त केले.

'सरहद' संस्थेतर्फे 'संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार' अहलुवालिया यांना प्रदान करण्यात आला. केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, ईशर अहलुवालिया, सरदार हरबन्स सिंग, पुरस्कार समितीचे अध्यक्ष संतसिंग मोखा, एम. यू. रहेमान उपस्थित होते.

या वेळी संत नामदेव जीवनगौरव पुरस्कार हरमिंदरसिंग घई, जगदीश बजाज, आर. एस. खन्ना यांना प्रदान करण्यात आला.

अहलुवालिया म्हणाले, ''सध्या आपली आर्थिक प्रगती वेगाने होत आहे हे चांगले आहे; पण आर्थिक प्रगती म्हणजे सर्वस्व नव्हे. आर्थिक प्रगतीने सगळ्याच गोष्टी साध्य होऊ शकत नाहीत. माणसाचा विकास होण्यासाठी सरहदसारख्या सामाजिक संस्थांचे काम महत्त्वाचे आहे.''

पुरस्काराविषयी ते म्हणाले, ''ज्या काळात प्रवास सोपा नव्हता, त्या काळात संत नामदेव यांनी पंजाबमध्ये २० वर्षे राहून आपले विचार पेरले. त्यांचे विचार वैश्विक होते. त्यामुळे त्यांच्या नावाच्या पुरस्काराचे मोल मोठे आहे.''

शिंदे म्हणाले, ''काही वर्षांपूर्वी आपण समाजवादी समाजरचनेचा विचार करत होतो; पण त्या वेळी आपला वार्षिक विकासदर ३.५ टक्के होता. त्या परिस्थितीत आपण दारिद्र्याचे वाटप करत होतो; पण १९९१ मध्ये खुले आर्थिक धोरण

स्वीकारल्यानंतर विकासदर वाढू लागला. संपत्ती मिळवून गरिबांचा स्तर उंचावला पाहिजे, हा विचार घेऊन देश पुढे जात आहे. देशाच्या या प्रगतीचे अहलुवालिया हे एक शिलेदार आहेत.''

आर्थिक खुलेपणाच्या धोरणामुळे देशाला दुसरे स्वातंत्र्य मिळाले, असे सांगून डॉ. माशेलकर म्हणाले, ''दोन दशकांपूर्वी अविकसित देश म्हणून ओळखला जाणारा आपला देश, आता जगातील एक प्रबळ देश म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. त्याचे श्रेय अहलुवालियांच्या नियोजनाला जाते. आर्थिक विकास करताना माणसाचा विकास होणे हे महत्त्वाचे मानतात.''

सामान्य माणसाला जोडण्याचे काम संत नामदेव यांनी केले. आज त्यांच्या विचारांची तेवढीच गरज असल्याचे मत नहार यांनी व्यक्त केले.

अहलुवालिया यांनी इंग्रजीबरोबर मराठी भाषेतही आपले मनोगत व्यक्त केले. 'धन्यवाद, मला आज खूप आनंद वाटला. संत नामदेव यांच्या नावाचा पुरस्कार देऊन आपण माझा मोठा बहुमान केला आहे. माझ्या मनात महाराष्ट्राला खास स्थान आहे. कारण माझी सून मराठी आहे. सर्वांचे मनापासून आभार,' असे अहलुवालिया म्हणाले.

### * विजया राजाध्यक्ष यांना 'विंदा जीवनगौरव' पुरस्कार

पुण्यातील साहित्य संमेलनात तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी दिलेला शब्द पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रिमंडळाने पाळला असून, ज्येष्ठ लेखिका आणि साक्षेपी समीक्षिका विजया राजाध्यक्ष यांना यंदाचा विंदा जीवनगौरव पुरस्कार हा एक लाख रुपये रोख आणि मानपत्र असणारा पुरस्कार साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात प्रदान केला.

निवडणूक लढवून साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळविण्यास तात्त्विक विरोध असणारे अनेक लेखक साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या या पदापासून वंचित राहिले. बा. भ. बोरकर, श्री. ना. पेंडसे आदी अनेक जण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नाहीत. त्यामुळे शासनाच्या वतीने विंदांच्या नावे दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव पुरस्काराच्या निमित्ताने दरवर्षी एका साहित्यिकाचा साहित्य संमेलनात गौरव होणार आहे. या पुरस्कारासाठी शासनाने एप्रिल महिन्यात समिती गठित केली होती.

१९९१ मध्ये 'मर्ढेकरांची कविता-स्मरण आणि संदर्भ' या पुस्तकासाठी विजयाबाईंना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. पुन्हा मर्ढेकर, शोध मर्ढेकरांचा, बहुपेडी विंदा खंड १ आणि २, प्रभाकर पाध्ये वाङ्मयदर्शन आदी त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. इंदूर येथे २००१ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

## * वाग्यज्ञे पुरस्कार

कला जीवनाचे सौंदर्य वाढविते. जगण्याचे बळ देते. यासाठी माणसाचे मन कलासक्त, बुद्धिनिष्ठ असले पाहिजे, असे मत ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर यांनी व्यक्त केले.

साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान व पुणे महापालिका यांच्या वतीने साहित्यिक कलावंत संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी 'वाग्यज्ञे पुरस्कार' ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबुडकर आणि ज्येष्ठ गायिका सुलोचना चव्हाण यांना प्रदान करण्यात आला. अकरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ व शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते.

संमेलनाध्यक्ष फ. मुं. शिंदे, स्वागताध्यक्ष दिलीप बराटे या वेळी उपस्थित होते.

पणशीकर म्हणाले, ''लावणीला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम सुलोचनाबाईंनी केले. लावणी वाङ्मयाकडे थोडेसे तिरकेपणाने बघण्याची नागर संस्कृती होती. त्या काळात जाहीर कार्यक्रम तिकीट लावून केले. ते सर्वदूर पोचवले. लावणीसारखा शृंगारिक प्रकार गाताना त्यांच्या खांद्यावरचा पदर कधी ढळला नाही. त्यांचे कुंकू कधी लहान झाले नाही. अशी सोज्वळ लावणी गायिका झाली नाही. जगदीश खेबुडकरांनी व्यंकटेश माडगूळकरांची परंपरा पुढे चालविली आहे.''

चव्हाण म्हणाल्या, ''पुणेकरांच्या पावतीशिवाय कलाकार होत नाही. पुणेकरांनी माझ्यावर गौरवाचा वर्षाव केला. मी हिंदी चित्रपटातूनही गाणे गात होते. खेबूडकरांनी पहिली लावणी लिहिली. मीही लावणी गाण्यास याच लावणीपासून सुरुवात केली. त्यापुढे हिंदीऐवजी लावणी गाणेच माझ्या जीवनाचे गणित झाले. या गाण्याला रसिकांनी उदंड साथ दिली.''

खेबुडकर म्हणाले, ''५१ वर्षांपूर्वी मी लिहिलेली 'मी आहे कोल्हापूरची लवंगी मिरची' ही लावणी सुलोचनाबाईंच्या गाण्यामुळे व प्रेक्षकांच्या आग्रहामुळे अजूनही ताजी आहे.''

## * पुणे मराठी ग्रंथालयाचे पुरस्कार

''पुस्तकाला मिळालेला पुरस्कार हा स्वल्पविराम असतो. समीक्षा हा अर्धविराम असतो आणि काळाच्या चाळणीतून जे साहित्य उतरणे हा पूर्णविराम असतो,'' असे मत डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे ना. ह. आपटे पुरस्कार डॉ. श्री. मा. भावे लिखित 'जीर्णोद्धार' या पुस्तकास, तर कै. ना. के. बेहेरे पुरस्कार 'लोकसत्ता'चे कार्यकारी संपादक गिरीश कुबेर यांच्या 'युद्ध जीवांचे' या पुस्तकास प्रदान करण्यात आला. पाच हजार रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्री. मा. भावे यांनी म्हटले, जुने ग्रंथ शोधून त्याकडे लक्ष द्या. नवे देऊळ बांधण्यापेक्षा जुन्या देवळाचा 'जीर्णोद्धार' करण्याचे पुण्य मोठे असते. कुबेर यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे ग्रंथ आपल्याला खऱ्या अर्थाने 'विश्वनागरिक' करतात; 'जीर्णोद्धार' म्हणजे महाराष्ट्राच्या सव्वाशे वर्षांचा वाङ्मयीन प्रवास आहे. असे कुलकर्णी म्हणाले.

गिरीश कुबेर म्हणाले, वाचकांकडून आलेला हा पुरस्कार असल्यामुळे त्याचा आपल्याला विशेष आनंद आहे. जागतिक उलाढालींचे संदर्भ साहित्यात सहसा येत नाहीत. 'युद्ध जीवांचे' ही एक खरीखुरी कथा आहे. याचा विषय जितका महत्त्वाचा तितकाच नाट्यपूर्ण आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ यांनी केले.

*** डॉ. अरुणा ढेरे यांना डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान प्रदान**

''साहित्य ही माणसाला माणूस बनविणारी गोष्ट आहे. चैतन्यशील बनविणारी संकटे आणि मनुष्यमैत्रीचे मर्म दाखवणाऱ्या अडचणी असाव्यात. जातिवंत लेखकाला संकटांचे भय वाटता कामा नये.'' अशी भावना प्रसिद्ध कवयित्री-लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केली.

नागपूर येथील डॉ. अनंत व लता लाभसेटवार प्रन्यास आणि अमेरिका येथील डॉ. लाभसेटवार प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ समीक्षक डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांच्या हस्ते डॉ. ढेरे यांना डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान प्रदान करण्यात आला. या वेळी परचुरे प्रकाशनतर्फे डॉ. लाभसेटवारलिखित 'घरट्यापलीकडे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

पुरस्कार निवड समितीचे डॉ. सुनीलकुमार लवटे, अनिल मेहता, लता लाभसेटवार, डॉ. कल्याणी दिवेकर आणि विजय ढवळे उपस्थित होते.

डॉ. ढेरे म्हणाल्या, ''हा पुरस्कार म्हणजे पडझड सुरू असतानाच्या गोंधळातून घातल्या गेलेल्या दिलाशाची हाक आहे. जातिवादाची, संकुचित भूमिकांची पडझड झाली हे योग्यच आहे. पण या साऱ्यांमध्ये चांगल्या गोष्टींचीही पडझड होत आहे.




## माय कझिन रेशेल

**डॅफने द्यू मोरियेर** अनु. स्नेहल जोशी

आकर्षक पण अनाकलनीय आणि गूढ अशी स्त्री आणि
दोन इंग्लिशमन्सची ही प्रेमकहाणी वाचून ठरवा...
ती देवदूत होती की सैतान?

**३००रु. पोस्टेज ३०रु.**

साहित्यालाच नव्हे तर जगण्यालासुद्धा विक्रयमूल्य आले आहे. आपल्याला एकत्र बांधणारे कोणतेच सूत्र नाही याची जाणीव होते. उदार समन्वयशील, विधायक बंडखोर आणि सत्वशील परंपरांचा वेध घेत लेखनातून संवेदनांचा चेहरा पाहण्याची उर्मी आहे. जगण्याला बळ देणाऱ्या प्रत्येकाला हा पुरस्कार मी अर्पण करते.''

डॉ. बांदिवडेकर म्हणाले, ''इंग्रजी माध्यमात शिकणारी आमची मुले मराठी विसरत चालली आहेत. परदेशात मात्र मराठी भाषेचे जतन होत आहे. या विसंवादाला पायबंद बसण्याची आवश्यकता आहे.''

डॉ. लवटे, डॉ. दिवेकर, ढवळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. लाभसेटवार यांनी प्रास्ताविक केले. विनिता आपटे यांनी सूत्रसंचालन केले. लता लाभसेटवार यांनी आभार मानले.

### * पं. श्रीकांत देशपांडे यांना 'दि म्युझिक फोरम'चा पुरस्कार

अभिजात संगीतातील योगदानाबद्दल 'किराणा' घराण्याचे प्रसिद्ध गायक पं. श्रीकांत देशपांडे यांना उस्ताद फैयाज अहमद खाँ आणि उस्ताद नियाज अहमद खाँ मेमोरियल ट्रस्टतर्फे पुरस्कार देण्यात आला.

भारतीय संगीतात मोलाचे योगदान देणाऱ्या कलावंतांना हा पुरस्कार 'दि म्युझिक फोरम'तर्फे दिला जातो. या निमित्ताने एक चर्चासत्रही आयटीसी संगीत रिसर्च अॅकॅडमीच्या वतीने झाले. 'अॅप्रोचेस टू मेलडी, ऱ्हिदम अँड लँग्वेज' या विषयावर मान्यवरांनी आपले निबंध सादर केले.

पं. देशपांडे यांनी 'किराणा' घराण्याच्या सरस्वतीबाई राणे, पंडित भीमसेन जोशी आणि फिरोज दस्तूर यांच्याकडे संगीताचे शिक्षण घेतले. देशातील अनेक संगीत परिषदांमध्ये त्यांचे गायन झाले आहे.

### * रवींद्र शोभणे यांना शांताराम कथा पुरस्कार

मराठी कथालेखनातील सन्मानाचा 'शांताराम कथा पुरस्कार' यावर्षी कथा-कादंबरीकार रवींद्र शोभणे यांना देण्यात आला.

ज्येष्ठ कथाकार शांताराम (प्रा. के. ज. पुरोहित) यांनी आपल्या अमृत महोत्सवानिमित्त हा पुरस्कार सुरू केला असून दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकामधील एका कथेची निवड या पुरस्कारासाठी केली जाते. यावर्षी 'लोकमत' दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या शोभणे यांच्या 'भळभळून वाहणारी गोष्ट' या कथेची निवड झाली. यापूर्वी हा पुरस्कार गौरी देशपांडे, आशा बगे, भारत सासणे, सानिया, प्रकाश नारायण संत आणि मिलिंद बोकील यांना मिळालेला आहे.

रोख अडीच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून १४ जानेवारी रोजी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात पुरस्कार प्रदान

करण्यात आला.

*** पत्रकार संघाचे पुरस्कार**

'लोकसत्ता'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक मुकुंद संगाराम, उपनिवासी संपादक महेंद्र पंढरपुरे तसेच आत्माराम नाटेकर यांना मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वतीने ६ जानेवारी रोजी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

मुकुंद संगोराम यांना उल्लेखनीय स्तंभलेखनाबाबतचा प्रमोद नवलकर पुरस्कृत भ्रमंती मानचिन्ह हा पुरस्कार देण्यात आला.

प्रादेशिक वृत्तसंकलनासाठीचा तुकाराम कोकजे स्मृती पुरस्कार पंढरपुरे यांना, तर सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पत्रकारितेत प्रदीर्घ कार्य केल्याबद्दलचा समतानंद अनंत हरी गद्रे पुरस्कार नाटेकर यांना देण्यात आला.

अन्य पुरस्कारप्राप्त पत्रकारांमध्ये प्रसाद काथे (एनडीटिव्ही), सुरेश भटेवरा (महाराष्ट्र टाइम्स), संजय जाधव (प्रहार), दीप्ती राऊत (आयबीएन लोकमत), प्रमोद चंचुवार (प्रहार), प्रवीण धोपट (आपलं महानगर, महाराष्ट्र माझा), राजेश जोष्ठे (लोकमत) यांचा समावेश होता.

*** प्राज महा-इंट्राप्रेन्युअर पुरस्कार**

जैवइंधन आणि अभियांत्रिकी क्षेत्रात आघाडीवर असणाऱ्या प्राज इंडस्ट्रिजने विविध उद्योगांमधील उद्यमशील व्यक्तींचा बहुमान करण्यासाठी सुरू केलेले प्राज महा-इंट्राप्रेन्युअर पुरस्कार यावर्षी महिन्द्रा अँड महिन्द्राचे संचालक अरुण नंदा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी प्राज इंडस्ट्रिजचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन बाबर, सिम्बायोसिसच्या संचालिका डॉ. विद्या येरवडेकर आणि टाटा इंडस्ट्रिजचे व्यवस्थापकीय संचालक किशोर चौकर आदी उपस्थित होते.

संस्थांतर्गत कार्यरत असताना उद्योजकीय मानसिकतेतून व गुणवत्तेतून प्रेरणादायी वाटचाल करणाऱ्या उद्योग व स्वयंसेवी क्षेत्रातील मान्यवरांची निवड करताना सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचे सहकार्य घेतले गेले.

ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. भटकर यांना लाइफ टाइम ॲचिव्हमेंट पुरस्काराने गौरविण्यात आले. अबायोकर बिन्झेल प्रॉडक्शन (इंडिया) लिमिटेड संचालक उदय गोडबोले, किर्लोस्कर ब्रदर्सचे जागतिक विपणन आणि धोरण विभागाचे उपाध्यक्ष आणि कार्पोरेट प्रमुख अविनाश पुरंदरे आणि नागपूर येथील मोरारजी टेक्सटाईल लिमिटेडच्या मनुष्यबळ विकास विभाग व्यवस्थापक मंदाकिनी अवसरमोल यांना उद्योग आणि व्यवसाय विभागातील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

समाजसेवी संस्था, निमसरकारी संस्था आणि विश्वस्त संस्था पुरस्कार विभागात नगर येथील स्नेहालय संस्थेचे मानद संचालक डॉ. गिरीश कुलकर्णी, बॉम्बे मदर्स अँड चिल्ड्रेन्स वेल्फेअर सोसायटीचे संयुक्त मानद सचिव डॉ. माधव साठे तसेच पुण्यातील चैतन्य संस्थेच्या संयुक्त संचालिका कल्पना पंत यांना महा-इंट्राप्रेन्युअर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

*** कलागौरव पुरस्कार**

पिंपरी-चिंचवड येथील कलारंग सांस्कृतिक कला संस्थेतर्फे कलागौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले. पहिला शाहीर विठ्ठल उमप पुरस्कार लोकप्रिय गायक आनंद शिंदे यांना देण्यात आला आहे.

आशा काळे (ज्येष्ठ अभिनेत्री), अतुल परचुरे (नाट्य अभिनेता), स्मिता तांबे (युवा अभिनेत्री), किशोरी शहाणे (उत्कृष्ट अभिनेत्री), स्वप्नील जोशी (युवा अभिनेता), रवी जाधव (उत्कृष्ट दिग्दर्शन), फुलवा खामकर (नृत्यदिग्दर्शन), अजित परब (संगीत) यांचा पुरस्कार्थींमध्ये समावेश आहे. याखेरीज, वैशाली पळसुले, अब्दुल लतीफ मोहम्मद सय्यद, सुवर्णा बाग, अजित देशपांडे आणि स्नेहल सोमण यांना स्थानिक पुरस्कार चिंचवडच्या रामकृष्ण मोरे नाट्यगृहात सहा जानेवारीला पाणीपुरवठा मंत्री लक्ष्मण ढोबळे, ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, महापौर योगेश बहल यांच्या हस्ते देण्यात आले.

*** ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांना सु. ल. गद्रे पुरस्कार**

मराठी कवितेला नव्या जाणिवांनी आणि रानातल्या हिरव्या बोलीने संपन्न करणारे ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांना सु. ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार ९ जानेवारी रोजी देण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

*** सहकारमहर्षी पुरस्कार**

'सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठान'तर्फे दरवर्षी देण्यात येणारे 'सहकारमहर्षी' साहित्य पुरस्कार महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते-पाटील, खा. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते सोनाली कुलकर्णी यांना 'सो कुल' या लेखसंग्रहासाठी, नागपूरच्या रवींद्र शोभणे यांना 'पांढर' या शेतकरी जीवनावरील कादंबरीसाठी तर, मुंबईच्या अरुण शेवते यांना 'ऐवज' या पुस्तकासाठी देण्यात आले. तसेच वसईचे फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना आशय या दिवाळी अंकातील वाङ्मयीन योगदानासाठी सहकारमहर्षी जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.

### * 'सावित्री पुरस्कार'

बुलढाणा येथील विलासराव देशमुख शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देण्यात येणारे राज्यस्तरीय सावित्री पुरस्कार २०१० जाहीर करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते नसीमा हुरजूक, उद्योगिनी सुप्रिया पाटील, पत्रकार सुजाता आनंदन, समाजसेविका सुनीता तगारे, पत्रकार मृणालिनी नानिवडेकर, सामाजिक कार्यकर्ते स्नेहलता कोल्हे, समाजसेविका स्मिता कोल्हे यांना पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष विश्वनाथ माळी यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

एप्रिलमध्ये बुलढाणा येथे केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून पुरस्काराचे स्वरूप २१ हजार रुपये रोख, मानचिन्ह व साडीचोळी हे आहे.

विश्वनाथ माळी यांनी सांगितले की, दरवर्षी ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी हे पुरस्कार जाहीर केले जातात. हे पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे.

### * महाराष्ट्र फाऊंडेशनचे पुरस्कार

अमेरिकेत स्थानिक झालेल्या महाराष्ट्रीय व्यक्तींनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाउंडेशन या संस्थेचे २०१० सालचे पुरस्कार जाहीर झाले.

साहित्यातील ललित ग्रंथाचा पुरस्कार जी. के. ऐनापुरे यांच्या 'रिबोट' कादंबरीला, अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार '... आणि दोन हात' या डॉ. वि. ना. श्रीखंडे यांच्या आत्मचरित्राला आणि वैचारिक ग्रंथ पुरस्कार 'साम्राज्यवाद विरोध आणि जातीविनाश' या आनंद तेलतुंबडे यांच्या ग्रंथाला देण्यात आला आहे.

मुस्लिम प्रबोधन चळवळीतील कार्यकथन मांडणाऱ्या सय्यदभाई यांच्या 'दगडावरची पेरणी' या पुस्तकाला विशेष ग्रंथ पुरस्कार जाहीर झाला आहे. २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

आशुतोष पोतदार यांच्या 'आनंदभोग मॉल' या नाटकाला रा. शं. दातार नाट्यपुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कारही २५ हजार व सन्मानचिन्ह असा आहे.




## भावकल्लोळ

**के.सत्यनारायण** अनु. प्रा.एन.आय.कडलास्कर

मंड्या, बेंगळुरू व आसपासच्या ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्था आणि त्यात मुरलेले धार्मिक व पारंपरिक संस्कार के. सत्यनारायण यांच्या हृदयस्पर्शी कथा

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

परिवर्तनाच्या चळवळीतील लिखाण, संघटन व कृतिशीलता लक्षात घेऊन चंद्रकांत केळकर यांना एक लाखाचा विशेष पुरस्कार, तसेच स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबवणारे कोल्हापूरचे जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनाही विशेष पुरस्कार देण्यात आला आहे.

समाजकार्यासाठीच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी नागनाथ नायकवडी तर साहित्य जीवनगौरव पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार-विचारवंत अरुण टिकेकर यांची निवड झाली आहे. दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. नाटकासाठीही यंदा प्रथमच पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

समाजकार्याचा पुरस्कार अकोल्याचे सत्यपाल महाराज यांना, असंघटित कष्टकऱ्यांसाठी कार्य केल्याबद्दल पुण्याचे ॲड. बस्तू रेगे यांना व सामाजिक प्रश्न पुरस्कार मुंबईचे हरीश सदानी यांना जाहीर झाला आहे. ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

ठाण्याचे निलेश निमकर यांना आदिवासी भागात शैक्षणिक कार्य केल्याबद्दल २५ हजार रुपयांचा युवा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला आहे.

या पुरस्कारांच्या निवडीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या विविध समित्यांनी शिफारस केलेल्या तीन नावांतून अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनच्या निवड समितीतील सुनील देशमुख, अरुंधती विनोद, सुनीता धुमाळे, दिलीप चित्रे, विद्युल्लेखा अकलूजकर, शोभा चित्रे व रजनी शेंदुरे यांनी अंतिम निवड केली.

२६ जानेवारी रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर व ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. सुनील देशमुख यांनी दिलेल्या देणगीतून १९९४ सालापासून हे पुरस्कार दिले जातात.

### * डॉ. मो. स. गोसावी साहित्य पुरस्कार

संगमनेर येथील सर डी.एम.पेटिट विद्यालय येथे डॉ. मो. स. गोसावी साहित्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. हा कार्यक्रम जाणीव ग्रुप आणि स्वामी विवेकानंद वाचनालय संगमनेर यांनी आयोजित केलेला होता.

''लेखकांचे साहित्यामध्ये मौलिक योगदान आहे, आणि आता समाजाला दिशा देण्याचे महत्त्वाचे काम करण्याची वेळ आणि जबाबदारी साहित्यकारांवर आलेली आहे'' असे प्रतिपादन आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

यावेळी अजित वंजारे (हिमालयातील वाळवंट), अभिमन्यू सूर्यवंशी (नियतीच्या वाटा), अरुण बारस्कर (पत्रकारितेचा आसूड), अपर्णा घाटे (संवेदना), डॉ. नीलकंठ मालाडकर (प्रीत रंगली सागरी), महादेव गायकवाड (निळ्या वाटा), डॉ. संध्या

भराडे (श्रावणसरी), नामदेव कांबळे (कृष्णार्पण), मंजिरी सरदेशमुख (काव्यमंजिरी), डॉ. उषा खंडारे (शिक्षणातील आव्हाने), बा. ल. शुक्ल (गप्पा आजोबांशी), अशोक आहेर (चाकरी) यांना पुरस्कार देण्यात आले.

*** विद्रोही कवीचा सन्मान**

मराठी साहित्यातील कथा-कादंबऱ्या-कवितांचे अन्य भारतीय भाषांत अनुवाद फारच कमी होतात. हिंदी, कन्नड, मल्याळी या भारतीय भाषांतील अभिजात साहित्याच्या मराठी अनुवादाचेही प्रमाण महाराष्ट्रात अत्यल्प आहे. भारतीय भाषांतील उत्कृष्टसाहित्य कलाकृतींचा गौरव करावा, असे साहित्य संमेलनाच्या संयोजकांनाही सुचत नाही. या पार्श्वभूमीवर चेन्नईच्या 'बुकसेलर्स अँड पब्लिशर्स ऑफ साऊथ इंडिया' या तमिळ भाषेतील प्रकाशन संस्थेने मात्र तमिळेतर साहित्यिकांना पुरस्कार देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

अर्जुन डांगळे यांना यंदाचा पुरस्कार देण्यात आला.

डांगळे यांचे वडील उमाजी डांगळे हे रिपब्लिकन पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते होते. माटुंग्यातल्या लेबर कँपमधल्या झोपडीवजा घरातच अर्जुन डांगळे यांचे बालपण गेले. आचार्य अत्रे, अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल यांच्यासह अनेक नेते त्यांच्या घरी येत असत. बालपणीच त्यांच्यावर आंबेडकरी आणि विद्रोही विचारांचे संस्कार झाले. पुढे अर्जुन डांगळे दलित पँथरच्या चळवळीतही उतरले. सोसाव्या लागणाऱ्या यातना, दु:खे, अवहेलना या साऱ्यांचे जळजळीत दर्शन त्यांच्या कवितांतून घडायला लागले. नामदेव ढसाळ, राजा ढाले आणि डांगळे यांच्या कविता त्या काळात प्रचंड गाजल्या. 'छावणी हालते आहे' या त्यांच्या कवितासंग्रहाने क्रांतीचे तत्वज्ञान मांडले. प्रस्थापितावर थेट हल्ले चढवणारी आणि सामाजिक न्यायासाठी हाक घालणारी त्यांची कविता लोकप्रिय ठरली. दलित पँथरच्या चळवळीतही डांगळे आघाडीचे शिलेदार होते. या चळवळीने काही काळ महाराष्ट्रातल्या राजकीय चळवळीला हादरेही दिले होते. 'पॉयझन्ड ब्रेड' या त्यांनी संपादित केलेल्या दलित साहित्यविषयक ग्रंथाचा जागतिक पातळीवर सन्मान झाला. दक्षिण आफ्रिकेचे तेव्हाचे अध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी १९१८ मध्ये डांगळे दक्षिण आफ्रिकेत गेले तेव्हा आपल्या आत्मचरित्राची प्रत सही करून दिली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षाचे स्वार्थांध राजकारणी नेत्यांमुळे तुकडे तुकडे झाले. हा पक्ष नामधारी झाला. तेव्हा महाराष्ट्रातल्या सर्व दलित संघटनांची भारिप-बहुजन महासंघाच्या झेंड्याखाली एकजूट उभारण्यातही डांगळे आघाडीवर होते. आता ते रामदास आठवले यांच्या गटाच्या रिपब्लिकन पक्षाचे प्रवक्ते आहेत. पण क्रांतीच्या विचारांची त्यांच्यातली धग मात्र कायमच आहे.

### * सुरेश भटेवरा यांना एकमत पुरस्कार

'महाराष्ट्र टाइम्स'चे दिल्लीतील विशेष प्रतिनिधी सुरेश भटेवरा यांना सुशिलादेवी देशमुख राज्यस्तरीय एकमत पुरस्कार लातूरमध्ये प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे यंदा १२वे वर्ष होते.

केंद्रीय अवजड उद्योग मंत्री विलासराव देशमुख, राज्याचे सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील आदी यावेळी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक मीडियाचे वाढते प्रस्थ लक्षात घेऊन त्याच्याशी स्पर्धा करण्यासाठी प्रिंट मीडियालाही आता बदल स्वीकारावे लागतील, असे मत देशमुख यांनी व्यक्त केले.

'माझ्या पत्रकारितेच्या कारकीर्दीत आजवर मी सतत वेगळे लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. दिल्ली बहोत दूर है... असे नेहमी संबोधले जाते. मात्र त्यात काही तथ्य नाही. दिल्ली ही सत्तानगरी आहे, हे लक्षात घ्यायलाच हवे. दिल्ली नेहमी महाराष्ट्राच्या दुस्वास करते, असा आरोपही सातत्याने केला जातो. मात्र आपण दिल्लीवर पक्की मांड ठोकली तर महाराष्ट्रही दिल्लीवर, देशावर राज्य करू शकतो,' असे मत भटेवरा यांनी व्यक्त केले. माध्यमाकडून काही प्रमाद घडत असले तरी सर्वकाही बिघडले आहे, असे नक्कीच नाही. माध्यमे देशाचे चित्र बदलू शकतात; फक्त यासाठी सचोटी आणि प्रामाणिक पत्रकारितेची गरज आहे. चळवळीतून पत्रकारितेत आलेले तरुण चांगले काही घडवू शकतात. त्यामुळे पालकांनी मुलांना पत्रकारितेत पाठवले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

एकमत पुरस्काराची मिळालेली रक्कम भटेवरा नाशिकच्या एच पी टी कॉलेजच्या वृत्तपत्र विद्या विभागाला देणार आहेत. रकमेच्या व्याजातून दरवर्षी या विभागातून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याला बक्षीस देण्यात येणार आहे.

### * कवी अनंत फंदी पुरस्कार

संगमनेर येथील इतिहास संशोधन मंडळातर्फे दिला जाणारा 'कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार' सातारा येथील प्रा. डॉ. नलिनी महाडिक यांच्या 'मराठी कादंबरीचे अंतरंग' या समीक्षा ग्रंथाला जाहीर झाला आहे.

सोलापूर येथील डॉ. अशोक गायकवाड यांचे 'आरक्षण आणि जागतिकीकरण' आणि रत्नागिरी येथील ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या 'साप आपला सोबती' या कलाकृतींचीही निवड या पुरस्कारासाठी झाली आहे.

पुरस्कारासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा राज्यातून सुमारे साडेतीनशे पुस्तके आली होती. २,१११ रुपये, सन्मानचिन्हे, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### * सायक्लो उत्कर्ष पारितोषिक

विद्यार्थ्यांसाठी त्याचे घर हेच विद्यापीठ आहे. आपला पाल्य जीवनात यशस्वी होण्यासाठी पालकांनी कुलगुरूची भूमिका पार पाडावी, असे आवाहन सोलापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विवेक घळसासी यांनी केले.

सातारा येथील सायक्लो उद्योग समूहातर्फे 'सायक्लो उत्कर्ष पारितोषिक' देऊन या वर्षी १३८ विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. शाहू कलामंदिरमध्ये झालेल्या या समारंभात श्री. घळसासी प्रमुख पाहुणे होते. सायक्लो उद्योगसमूहाचे अध्यक्ष पांडुरंग शिंदे, सौ. प्रमिला शिंदे, सायक्लो ट्रान्समिशनचे संचालक राहुल शिंदे या वेळी उपस्थित होते.

श्री. घळसासी म्हणाले, ''स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना घडविण्याची फार मोठी जबाबदारी पालक व शिक्षकांवर आहे. शालेय विकासाबरोबरच सामाजिक विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत.''

गेल्या सहा वर्षांत ११५१ विद्यार्थ्यांना उत्कर्ष पारितोषिकाने गौरविले असल्याचे पांडुरंग शिंदे यांनी सांगितले. या उपक्रमात आतापर्यंत गौरविलेल्या विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचा मागोवा घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### * आनंद पाळंदे यांना 'दुर्गसाहित्य पुरस्कार'

''एक इतिहासप्रेमी व्यक्ती आणि एक इतिहास संशोधन संस्था यांच्या सान्निध्यात राहिल्यामुळेच आपले सह्याद्री आणि हिमालयातील गिरिभ्रमण अधिक डोळस होत गेले,'' असे श्री. पाळंदे म्हणाले.

गोनीदा दुर्गप्रेमी मंडळाच्या वतीने दुर्गसाहित्य पुरस्कार ५ फेब्रुवारी २०११ रोजी किल्ले राजमाची येथे द्वितीय दुर्गसाहित्य गिरीप्रेमी मंडळाचे संस्थापक सदस्य आनंद पाळंदे यांना संमेलनात दिला गेला.

उत्तर काशी येथे पाळंदे यांनी गिर्यारोहणाचा प्राथमिक अभ्यासक्रम पूर्ण केला. हिमालयातील अनेक गिर्यारोहण मोहिमांचे यशस्वी नेतृत्व केले. १९७७-८६ या कालावधीत त्यांनी हिमालयातील कैलास, शितीधार, रुदुगैरा, थेलु, लिओ, पार्गियाल, बिधान पर्वत, देवबन या मोहिमांमध्ये भाग घेतला. दुर्गभ्रमण, गिर्यारोहण यावर त्यांनी मराठी दैनिके, साप्ताहिके व मासिकांमधून सातत्याने लेखन केले आहे.

पाळंदे यांच्या 'डोंगर-यात्रा' या पुस्तकास न. चिं. केळकर पुरस्कार, श्रीकृष्ण भिडे पारितोषिक, महाराष्ट्र सेवासंघ यांचा साहित्य पुरस्कार मिळाला आहे.

### * सर्वोत्तम सामाजिक चित्रपटाचा पुरस्कार 'पांगिरा'

समाजिक विषयावरील सर्वोत्तम चित्रपटाचा पुरस्कार राजीव पाटील दिग्दर्शित 'पांगिरा' या चित्रपटाला २३ जानेवारी रोजी नाशिकच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीत

झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

विश्वास पाटील यांच्या गाजलेल्या 'पांगिरा' या कादंबरीवर चित्रपट निघाला असून या चित्रपटाने आजवर दहा पुरस्कार मिळवले आहेत.

विशेष म्हणजे 'पांगिरा'चा विषय वैश्विक असल्याने 'पांगिरा' तेलगू भाषेत डबही केला जातोय. संजय कृष्णाजी पाटील यांनी पटकथा-संवाद लेखन केले आहे. 'पांगिरा'चे दिग्दर्शन राजीव पाटील यांचे आहे. सामाजिक विषय अत्यंत संवेदनशीलपणाने हाताळणारा दिग्दर्शक अशी त्यांची ओळख आहे.

### * प्रा. चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार

उजळाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील प्रा. चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालयातर्फे राज्यस्तरीय वाङ्मयीन पुरस्कार स्पर्धा घेण्यात येते. यावर्षी 'आदिपर्व' (लेखिका - डॉ. प्रमिला जरग) या कादंबरीला १२ जानेवारी रोजी ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या शुभहस्ते पुरस्कार देण्यात आला.



**मा. सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते डॉ. प्रमिला जरग यांना पुरस्कार देण्यात आला. छायाचित्रात कोल्हापूरचे उपजिल्हाधिकारी श्री. आबवणे आणि वाचनालयाचे अध्यक्ष श्री. राजाराम माने**

❒

# वाचकांचा प्रतिसाद



श्री. अशोक पाध्ये

स.न.वि.वि

आपले 'जिना' हे अनुवादित पुस्तक अगदी मनोभावे वाचले. अनुवाद करणे किती कठीण असते हे वाचताना पदोपदी जाणवले. पुस्तक वाचताना आपण त्या इतिहासात प्रत्यक्ष वावरत आहोत असे वाटले.

डॉ. रसिक मुथा

महात्मा सोसायटी, कोथरुड, पुणे ४११०२९.

मेहता मराठी ग्रंथजगत,

आपला दिवाळी अंक वाचला, सवडीनं वाचला, दिवाळी अंक खूपच आवडला. दिवस कॉलेजचे .. जडणघडणीचे... वाचताना जणू काही मीच माझे कॉलेजचे दिवस जगत होते असं वाटलं. यातील चार लेखकांनी माझं लक्ष विशेष वेधून घेतले. ते म्हणजे उत्तम कांबळे, मंगेश कश्यप, डॉ.आनंद पाटील आणि माधुरी शानभाग. तसे तर सर्वच लेख छान आहेत. परंतु विविध परिस्थितीत जडणघडण झालेल्या वरील चारही व्यक्ती या समाजातील अनेक घटकांचं प्रतिनिधित्व करतात असं वाटतं.

या शिवाय खांडेकरांचा पत्रसंवाद हा डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा लेखही माहितीपूर्ण वाटला.

अनघा कुलकर्णी

४,जयती, संगम सोसायटी, सातारा रोड, पुणे ४११ ०३७.

# श्रद्धांजली

*** स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी**

आपल्या अलौकिक स्वरांनी सहा दशकांहून अधिक काळ रसिकांवर मोहिनी घालणारे, ख्याल गायकीचे अनभिषिक्त सम्राट आणि 'माझे माहेर पंढरी...' सारख्या अभंगांमुळे घराघरात पोहोचलेले किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक स्वरभास्कर पं.भीमसेन जोशी यांचे २४ जानेवारी रोजी सकाळी देहावसान झाले. ते ८८ वर्षांचे होते. मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात, शासकीय इतमामाने वैकुंठ स्मशानभूमीत सायंकाळी त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

गुरु सवाई गंधर्व यांच्याकडून अत्यंत कष्टाने किराणा घराण्याच्या गायकीचे धडे घेतल्यानंतर पंडितजींनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताची पताका जगभर फडकावली. आपल्या गायनाने असंख्य रसिकांशी नाते जोडणाऱ्या पंडितजींनी सवाई गंधर्वांच्या स्मृत्यर्थ स्मारक आणि महोत्सव सुरू करून अभिजात कलेचे जतन करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

*** नटश्रेष्ठ प्रभाकर पणशीकर**

'तो मी नव्हेच' मधील पंचरंगी भूमिकेने उभ्या महाराष्ट्रात नावाजलेले ख्यातनाम अभिनेते प्रभाकर पणशीकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन कन्या आणि एक चिरंजीव असा परिवार आहे.

पणशीकर यांना ३० डिसेंबरला एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचाराला ते फारसा प्रतिसाद देत नव्हते. त्यांची प्रकृती गंभीर होत गेली आणि त्यातच त्यांचे रात्री सव्वानऊच्या सुमारास निधन झाले. त्यांचे मागे प्रसिद्ध गायक रघुनंदन हे त्यांचे चिरंजीव आणि अभिनेत्री जान्हवी या कन्या आहेत.

पणशीकर यांच्या इच्छेनुसार नेत्रदान करण्यात आले.

'नाट्यसंपदा' ही स्वत:ची नाट्यसंस्था त्यांनी स्थापन केली. ते १९६२ पासून रंगभूमीवर कार्यरत होते. 'इथे ओशाळला मृत्यू' मध्ये त्यांनी साकारलेला औरंगजेब रसिकांच्या चांगलाच लक्षात राहिला. त्याखेरीज 'थँक यू मिस्टर ग्लाड', 'अश्रूंची झाली फुले', 'जिथे गवतास भाले फुटतात', 'भटाला दिली ओसरी' या नाटकांमधील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. त्यात सर्वात कळसाची भूमिका ठरली ती 'तो मी

नव्हेच' या नाटकातली. या नाटकात त्यांनी पंचरंगी भूमिका केली. त्यांनी साकारलेला लखोबा लोखंडे अनेक दशके रंगभूमी गाजवत राहिला.

### * अभिनेत्री नलिनी जयवंत

जुन्या जमान्यातील प्रसिद्ध अभिनेत्री नलिनी जयवंत (वय ८४) यांचे २४ डिसेंबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. अशोककुमार, देव आनंद आणि दिलीपकुमार यांची नायिका म्हणून गाजल्या होत्या. 'काला पानी' या चित्रपटासाठी फिल्मफेअरच्या उत्कृष्ट सहअभिनेत्री पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

पती प्रभू दयाल यांच्या निधनानंतर चेंबूरमधील आपल्या बंगल्यात गेली अनेक वर्षे त्या एकाकी राहात होत्या. 'राधिका' या १९४१ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटापासून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली आणि त्यांच्या अप्रतिम अभिनयाच्या जोरावर हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. कसदार अभिनयामुळे त्यांना अशोककुमार, देव आनंद आणि दिलीपकुमारसारख्या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांबरोबर काम करता आले. दिलीपकुमार, नर्गिस यांच्यासोबत 'अनोखा प्यार'मध्ये त्यांनी केलेल्या अभिनयाने चित्रपट रसिकांची वाहवा मिळविली होती. अशोककुमारसोबत केलेले 'समाधी', 'सरगम', 'मिस्टर एक्स', 'काफिला', 'मुकद्दर' हे त्यांचे चित्रपट चांगलेच गाजले.

बहन, जलपरी, शिकस्त, जादू, महबूबा, राजकन्या, रेल्वे प्लॅटफॉर्म, सलोनी, बॉम्बे रेसकोर्स या चित्रपटांतील भूमिकांमुळे हिंदी चित्रसृष्टीतील आघाडीच्या नायिकांमध्ये त्यांची गणना होत होती. 'फिल्मफेअर'ने १९५० मध्ये घेतलेल्या एका सर्वेक्षणात हिंदी सिनेसृष्टीतील सर्वात सुंदर नायिकेचा मान त्यांना लाभला. १९८३ मध्ये प्रदर्शित झालेला 'नास्तिक' हा त्यांचा शेवटचा चित्रपट.

आयुष्याच्या पूर्वार्धात प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या नलिनी जयवंत यांचा उत्तरार्ध अतिशय कष्टप्रद गेला.

### * शिक्षणतज्ज्ञ, निवृत्त प्राचार्य डॉ. द. बा. पोंक्षे

शिक्षणतज्ज्ञ व निवृत्त प्राचार्य डॉ. द. बा. पोंक्षे (वय ७८) यांचे ४ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी व तीन मुले असा परिवार आहे. ज्ञानप्रबोधिनी प्रशालेचे प्रायार्य विवेक पोंक्षे यांचे ते वडील होत.

डॉ. पोंक्षे गेली ५० वर्षे शिक्षणक्षेत्राशी संबंधित होते. धुळ्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य होते. पुणे विद्यापीठ, बालभारती, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अशा संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. शैक्षणिक मानसशास्त्र, भूगोलाचे अध्यापन, गणिताचे अध्यापन या पुस्तकाचे त्यांनी लेखन केले आहे.

लोकसंख्या शिक्षण व भूगोलाचे अध्यापन हे त्यांचे अभ्यासाचे विषय होते.

महाराष्ट्र राज्य भूगोल मंडळ व धुळे यथील सावरकर साहित्य सभा या संस्थांच्या उभारणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ते प्रसिद्ध होते.

*** ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. प्रल्हाद वडेर**

ज्येष्ठ साहित्यिक, व्यासंगी समीक्षक डॉ. प्रल्हाद वडेर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक विवाहित मुलगा व दोन विवाहित कन्या असा परिवार आहे. जागृत वाचक, मौज प्रकाशनचे समीक्षक म्हणून डॉ. वडेर यांचा लौकिक होता. 'ना. सी. फडके जीवन आणि साहित्य' या विषयावर त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती. मूळ बेळगावजवळच्या निपाणी भागातले असलेल्या डॉ. वडेर यांनी सुमारे तीस वर्षे गोव्यात मराठीचे अध्यापन केले. कोल्हापूर येथे त्यांनी इंग्रजी विषयाच्या अध्यापनाला प्रारंभ केला. त्यानंतर दक्षिण गोव्यातील मडगाव येथील पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयात ते इंग्रजीचे 'ट्यूटर' म्हणून रुजू झाले आणि नंतर मराठी व्याख्याते झाले. गोवा विद्यापीठात मराठी विभागप्रमुखपदही त्यांनी सांभाळले होते.

*** लेखक, दिग्दर्शक दिनकर जोशी**

भांडारकर संस्थेवर सिनेमा बनवून आंतरराष्ट्रीय ओळख मिळवणारे लेखक, दिग्दर्शक दिनकर जोशी यांचे नुकतेच निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या मागे चार मुलगे, सुना असा परिवार आहे.

जोशी यांचा जन्म २१ ऑगस्ट १९२१ ला जळगाव जिल्ह्यात झाला. त्यांनी नाशिक, पुणे येथे इंटर पर्यंत शिक्षण घेतले. पुढे त्यांनी प्रभात स्टुडिओमध्ये असिस्टंट म्हणून काम करायला सुरुवात केली. त्यानंतर स्नेहप्रभा स्टुडिओत सचिव म्हणून जबाबदारी सांभाळली. त्याचप्रमाणे त्यांनी अशोककुमार, दिलीपकुमार, मेहबूब स्टुडिओचे मालक मेहबूबखान यांचे सचिव म्हणूनही काम पाहिले. अशोक कुमार आणि पद्मिनी यांना घेऊन त्यांनी दोन चित्रपट काढले. तसेच 'पुत्र व्हावा ऐसा', 'प्रेमकविता' हा बंगाली, तर 'जय सिध्दी माँ' हा गुजराथी सिनेमा काढला. भांडारकर संस्थेवर त्यांनी बनवलेल्या शॉर्टफिल्मने त्यांना खरी ओळख मिळवून दिली.

*** प्रसिद्ध गीतकार, लेखक मा. दा. देवकाते**

लेखक व गीतकार मारुती दाजी देवकाते उर्फ मा. दा. देवकाते यांचे पुण्यातील राहत्या घरी अल्प आजाराने निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, तीन मुली नातवंडे असा परिवार आहे. ते मराठी चित्रपट व्यवसायात कथा, पटकथा, संवाद, गीतलेखक म्हणून ४० वर्षे कार्यरत होते. तसेच अखिल भारतीय

मराठी चित्रपट महामंडळाचे १९७५ पासून सभासद होते.

देवकाते यांनी १५० वर मराठी चित्रपटांसाठी पटकथा, संवाद व गीतलेखन केले. त्यांनी कथा व कादंबरीलेखनही केले. 'जन्म हा तुझ्यासाठी', 'पांडोबा पोरगी फसली', 'डाळींबी', 'जय तुळजाभवानी', 'पटलं तर व्हय म्हणा', 'सूनबाई ओटी भरुन जा', 'भामटा', 'भटकभवानी', 'भन्नाट भानू', 'पैजेचा विडा', 'हळद रुसली, कुंकू हसलं', 'सौभाग्यकंकण', 'थापाड्या', 'रंगू बाजारला जाते', 'दैवत असे' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट. या चित्रपटांसाठी त्यांनी कथा-पटकथा व संवादलेखन केले. 'भाग्यवती मी या संसारी', 'जवळ ये लाजू नको'(कृष्णधवल) या अनुक्रमे १९७१ व १९७६ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटांसाठी त्यांनी गीतलेखन केले होते.

❒

## सभासदांना सूचना

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

**वाचकमित्रहो,**

**आपल्या** अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

# बालनगरी

## चित्र रंगवा



## केलयं कोणी?




सोनेरी किरणांची
अलवार साखळी
मखमली कळीची
उमलते पाकळी
आत कशा दडल्यात
मधाच्या खाणी!
ठेवल्यात कोणी?
ठेवल्यात कोणी?

जांभळ्या डोंगराला
नदीचा वळसा
छुमछुमता बांधलाय
पायाला चाळसा
रिणीझिणी रिणीझिणी
वाजतात गाणी
गायलीत कोणी?
गायलीत कोणी?

गुलाबी थंडीची
लपेटून शाल
चंदेरी संध्येची
झाकेदार चाल!
हारात झगमगतो
चंद्राचा मणी
ओवलाय कोणी?
ओवलाय कोणी?

**मीरा सिरसमकर**
डी-१२, पाटील रिजन्सी,
एरंडवणे, पुणे ४११ ००४.
मो. ९२२६१९६३७१



The Secret Seven
द सीक्रेट सेव्हन
द सीक्रेट सेव्हन
सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
शाब्बास, सीक्रेट सेव्हन
रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
आगे बढो, सीक्रेट सेव्हन
सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
सीक्रेट सेव्हनची सरशी
सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
सीक्रेट सेव्हन समोर कोडं
सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
'गुणवान' सीक्रेट सेव्हन
सीक्रेट सेव्हनला धक्का
सावधान! सीक्रेट सेव्हन
सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत

## धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
## १५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

**या धमाल साहसी मालिकेतली आम्ही प्रकाशित केलेली पुस्तकं**

या पुस्तकात आपल्याला भेटणार आहेत
पीटर, जेनेट, जॅक, पॅम, बार्बरा, कोलिन
आणि जॉर्ज.
हे सर्वजण आहेत सात गुप्तहेर आणि
स्कँपर- एकदम खास स्पॅनिअल कुत्रा!
कोणत्याही रहस्याचा छडा लावण्यासाठी
एका पायावर तय्यार!

**एनिड ब्लायटन**
**अनु. प्रियंका कुलकर्णी**



**किंमत प्रत्येकी ८०रु.**
**संपूर्ण संचाची किंमत १२००रु.**
**ग्राहकांसाठी संपूर्ण संचाची किंमत ९९९रु.**
**पोस्टेज संपूर्ण संचासाठी ४०रु.**

# ओळखा पाहू



जनस्थान पुरस्काराचे मानकरी आणि
नामवंत नाटककार

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ मार्च २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल एप्रिल २०११च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

‘डिसेंबर’ अंकातील ‘ओळखा पाहू’चे उत्तर

नुकताच यांना ‘गदिमा’ पुरस्कार जाहीर झाला - मधु मंगेश कर्णिक

स्पर्धेचे विजेते - कस्तुरी झांबरे - विश्रामबाग, सांगली

रजनी दैठणकर - ठाणे, शंकर चिमोटे - नागपूर, प्रमोद मांडे, भीमराव गुंडे - सोलापूर, जगन्नाथ दुर्गुळे - नेर्ले, मयूर फणसे - भोर, पल्लवी अंबाडे - भुसावळ, स्नेहल फणसे, माधवी काळे, डॉ. मंजिरी खरे, शि. वा. आठवले, रा. द. ढुमणे - पुणे, वैशाली कुऱ्हेकर, डॉ. सुशीला पाटील, मुकुंद पांडे, यशोधन पांडे, सुयश पांडे - अमरावती, महेश कागले - घोसरवाड, सतीश म. गुप्ते - बोरिवली (प), डॉ. मधुकर भिडे - श्रीरामपूर, स्वरूप सावंत - कुडाळ, शंकर माने - कोल्हापूर, श्रीपाद वरडे, लीला गांधी, रूद्र विध्वंस - अहमदनगर, पूजा कडगे, मृदुला कुलकर्णी, जाई काळे, प्रदीप झगडे - वर्धा


**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**


**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची**
**वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची**
**वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची**
**वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा' आणि 'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!

पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला-एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट-ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.










**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**


**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Feb. 2011

**नवीन**

# स्पर्श




बाळाच्या गालांचा स्पर्श सृजनाचा; तर रात्रीच्या अंधारात होणारा थंडगार स्पर्श अंगावर भीतीचा काटा फुलविणारा, असे अनेक अर्थ आणि स्पर्शांच्या छटा उलगडून सांगितल्यानंतर लेखिका अखेर मृत्यूसमयीच्या थंड स्पर्शांपर्यंत येते आणि आयुष्यभर हवाहवासा वाटणारा आणि नवरसांच्या विविध संवेदना जागवणारा आपल्या माणसांचा स्पर्श मृत्यूसमयी मात्र नकोसा होतो, हे भीषण वास्तव मांडून जाते.

लेखिकेला वाटते, की आपल्या अनुभवांची भर घालून मुलांना अनुभवांची शिदोरी देणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. कारण बाहेर मिळणाऱ्या अनुभवांची अनेक उत्तरे या शिदोरीतही असतात.

एकूणच, मनाच्या तरल अवस्थेत सांगोपांग विचार करून मांडलेले विचार या ललित लेखनात आहेत.

**लेखक– डॉ. विनीता परांजपे । किंमत – ₹ ९०/– । पोस्टेज – ₹ २०/–**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

प्रति,
____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.